प्रकरण १ ले

भारतातील सामाजिक चळवळी
आणि
मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाची पूर्वपिठीका

प्रस्तावना - सामाजिक चळवळ किंवा आंदोलन ही समाजशास्त्राच्या अभ्यासविषयातील एक मूलभूत आणि विस्तृत शाखा आहे.विद्यमान समाजव्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांमधून चळवळ निर्माण होत असते.

चळवळीचा संबंध समाजव्यवस्थेतील आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात बदल घडवून आणण्याशी असतो. सामाजिक संस्था अथवा सामाजिक जीवनात काही नवीन सुव्यवस्था निर्माण करणे या उद्देशाने करण्यात आलेले सामूहिक स्तरावरचे प्रयत्न म्हणजे चळवळ होय. असे प्रयत्न सर्व समाजांमध्ये व देशामध्ये भूतकाळात झालेले असतात व वर्तमानकाळातही सुरू असतात. म्हणून चळवळी हे समाजजीवनाचे अविभाज्य अंग होय असे म्हणता येते.

बदलत्या सामाजिक व्यवस्थेबरोबर समाजात कोणते नवीन बदल घडून येतात आणि त्यासाठी कोणती कारणे जबाबदार ठरतात व समाजावर या बदलाचे काय परिणाम होतात इत्यादींशी सामाजिक चळवळ निगडित असते.

सामाजिक चळवळीचा उदय हा समाजातील लोकांच्या आंतरक्रियात्मक प्रक्रियांमधून होत असतो. 'सामाजिक चळवळ' ही संकल्पना वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे उपयोगात आणली आहे. समाजात व्यक्ती जीवन जगत असताना तिच्या जीवनात अनेकदा नैराश्य येते. समाजातील अनेक लोकांना त्या नैराश्याची जाणीव होण्यास सुरुवात होते तेव्हाच समाजातील अशा व्यक्ती संघटितपणे आपली सामाजिक ध्येये सामाजिक चळवळीच्या रूपाने साकार करू पाहतात. ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींचा एक गट निर्माण होतो. या गटाची सुरुवातीची सदस्य संख्या कमी असली तरी ती अल्पकाळातच वाढू शकते. सामूहिकपणे प्रयत्न करण्याच्या या प्रक्रियेत असंख्य लोक सहभागी होत जातात व निश्चित ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करतात. या प्रयत्नाला कधी संपूर्ण समाजाचा पाठिंबा मिळतो तर कधी विरोध होतो.

सामाजिक चळवळीचा अर्थ (Meaning of Social Movement)

सामाजिक चळवळीचा अर्थ वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे स्पष्ट केला आहे. 'चळवळ' व 'आंदोलन' या जवळपास समान स्वरूपाचा अर्थ व्यक्त करणाऱ्या संज्ञा आहेत. प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ हेबर्ले (Heberle) यांनी सामाजिक चळवळीबाबत पुढील मत व्यक्त केले आहे.

"A Social Movement commitement to change and the raison detre of its organization are founded upon the conscious volition, normative, commitment to the movement aim or beliefs , and on active participation on the part of followars or members ." [1]

समाजातील सामाजिक संघटना या सामूहिक ध्येयाच्या पूर्ततेसाठी चळवळीचा मार्ग शोधून काढतात. समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी या संघटना स्वत:वर जबाबदारी घेतात आणि संघटनेतील सभासदांना किंवा सामाजिक चळवळीत सहभागी होणाऱ्या लोकांच्या मदतीने आपली जबाबदारी पार पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात.

वरील व्याख्येत हेबर्ले यांनी सामूहिक ध्येयाच्या पूर्ततेसाठी सामाजिक संघटना आणि त्याचा क्रियाशील भाग या घटकांवर भर दिला आहे.

एम. एस. ए. राव (M. S. A. Rao) यांनी सामाजिक 'चळवळ'ही संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते,

"A social movement is an organized attempt on the part of a section of society to bring about either partial or total change in society through collective mobilization based on an ideology"[2]

सामाजिक चळवळ ही संघटनात्मक प्रक्रिया आहे की, जी समाजातील एका गटाला आंशिक किंवा संपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी विचारप्रणालीच्या आधारे सामूहिकपणे प्रयत्न करते.

वरील व्याख्येत एम.एस.ए.राव यांनी चळवळीसाठी विचारप्रणाली आवश्यक असते या घटकांवर भर दिलेला आहे.

हर्बर्ट ब्लुमर (Herbert Blumer) यांच्या मते, सामाजिक चळवळ म्हणजे

"Collective enterprises to establish a new order of life."[3]

नवीन जीवनपध्दतीच्या प्रस्थापनेसाठी केलेला सामूहिक उद्योग म्हणजे सामाजिक चळवळ होय.

थेडोरसन आणि थेडोरसन (G. A. Thedorson and A. G. Thedorson) यांनी चळवळ ही संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

"An important part of collective behaviour in which large number of people are organized or alerted to support and bring about or to resist social types of social movements, participation in social movement is for the most people only informal or indirect, usually large number of sympathizers identify with and support the any format organizations, associated with the movements."[4]

सामूहिक वर्तनाचा महत्त्वाचा भाग म्हणजे समाजातील लोकांना मोठ्या प्रमाणात संघटित करून समाजात नवीन बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे किंवा पाठिंबा व्यक्त करणे. समाजातील बहुसंख्य लोक चळवळीत सहभागी न होता अप्रत्यक्षपणे वा अनौपचारिकपणे चळवळीस आपला पाठिंबा व्यक्त करतात.

समाजातील बहुसंख्य लोक सामाजिक चळवळीस मोठ्या प्रमाणात पाठिंबा व्यक्त करून त्याबद्दलच्या आपल्या सहानुभूतीची ओळख करून देतात. सामाजिक चळवळीशी संबंधित असणाऱ्या संघटनांमध्ये सहभागी न होता ते आपला पाठिंबा त्या कार्यक्रमाला देतात. क्रांतिकारी चळवळी आणि सुधारणावादी चळवळी हे चळवळींचे इतर प्रकार आहेत, असे मत जॉर्ज थेडोरसन आणि ए. जी. थेडोरसन यांनी व्यक्त केले आहे.

वरील व्याख्येत जी. ए. थेडोरसन आणि ए. जी. थेडोरसन यांनी सामाजिक चळवळीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींवर भर दिला आहे. समाजातील लोकांना ज्या ज्यावेळेस समाजात बदल घडवून आणावा वाटतो त्या त्यावेळेस समाजातील व्यक्ती संघटित होतात. समाजातील बहुसंख्य लोक, जे कोणत्याही संघटनांचे सभासद नसतात असे लोकही अप्रत्यक्षपणे त्या चळवळीला आपला पाठिंबा व्यक्त करतात तसेच चळवळीच्या कार्यक्रमाला आपला पाठिंबा जाहीर करतात.

सिग्मंड न्यूमन (Sigmand Newman) या समाजशास्त्रज्ञांने चळवळीची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट *केली आहे,*

"A concerted action or agitation with some degree of continuty of a group which, fully or loosely organized, is united by more or less definite aims, follows a designed programme , and is directed at a change or to counter movement at the preservation of patterns and institutions of the existing society."[5]

समाजातील जे सामाजिक गट असतात ते गट कमी किंवा अधिक संख्येने संघटित झालेले असतात. त्यांची सामूहिक अशी उद्दिष्टे असतात, काही निश्चित असे कार्यक्रम असतात. त्यानुसार ते समाजात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. समाजव्यवस्थेतील सामाजिक संघटना आणि संस्था यासाठी प्रयत्न करतात. समाजातील लोकांनी घेतलेला एकमुखी निर्णय

हा गटाचे सातत्य व निश्चित वर्तनबध्द कायम ठेवण्यास मदत करतो आणि सतत त्यात प्रक्रिया घडवून आणण्यास कारणीभूत ठरतो.

सामाजिक संघटनांची बांधणी आणि ध्येय यासाठी निश्चित कार्यक्रम असतो. यावर सिग्मंड न्यूमन यांनी भर दिला आहे. समाजव्यवस्थेत मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी 'सामाजिक चळवळ' हे महत्त्वाचे साधन आहे. सामाजिक चळवळी ज्याप्रमाणे समाजाला उपयुक्त ठरतात. त्याप्रमाणे काही सामाजिक चळवळी समाजाला घातक ठरतात.

असे असले तरी सामाजिक चळवळीमुळे समाजात मूलभूत स्वरूपाचा बदल घडवून आणता येतो हे नाकारता येत नाही. समाजातील सामाजिक संघटना या समाजाच्या सेवेसाठी कार्य करीत असतात. मग त्या संघटना औपचारिक स्वरूपाच्या असोत किंवा अनौपचारिक स्वरूपाच्या असोत. समाजात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी सामाजिक चळवळी या किती मोठ्या प्रमाणात फायदेशीर ठरतात आणि त्यासाठी सामाजिक संघटनांना काय करावे लागते हे वरीलप्रमाणे सिग्मंड न्यूमन यांनी स्पष्ट केले आहे.

लुंडबर्ग यांच्या मते, " सामाजिक चळवळ म्हणजे समाजव्यवस्थेतील सामाजिक संबंधाची पध्दती किंवा सदस्यांमधील परस्परक्रियांची पद्धती यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी केलेला सामूहिक प्रयत्न होय."[६]

वरील सर्व व्याख्येत सामाजिक चळवळींमुळे समाजात बदल घडून येतो असे दिसून येते. या बदलासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते. चळवळींना कधी समाजातील लोकांचा पाठिंबा मिळतो तर कधी विरोध होतो.

चळवळीच्या उगमासबंधीचे सिद्धांत (Theories of Social Movement)

सुरुवातीस कल्पना व विचार हे केंद्र मानून सामाजिक चळवळीचा अभ्यास होत असे. अलीकडे समाजशास्त्रीय संशोधनामुळे सामाजिक चळवळीच्या अभ्यासात संरचानात्मक व मानसशास्त्रीय बाबींकडे लक्ष देण्यात येत आहे. चळवळीच्या सिद्धांतामध्ये

१) तणाव (Strain)

२) पुनरुज्जीवीकरण (Revitalization)

३) सापेक्ष वंचितता (Deprivation)

या संकल्पनांच्या संदर्भात विविध सामाजिक, सांस्कृतिक चळवळींच्या उदयासंबंधी पुढीलप्रमाणे विश्लेषण केले आहे.

१) तणाव (Strain) - या संकल्पनेबाबत स्मेल्सर (Smelser) यांनी पुढील मत व्यक्त कले.

"Structural strain as the underlying factor leading to collective behaviour. Structural strain occurs at different level of norms, values, mobilization and situational facilities. While strain provides the structural condition, the crystallization of a generalized belief marks the attempt of persons under strain to asses their situation, and to explain the situation by creating or assembling a generalized belief. Both strain and generalized belief require preciptating factor to trigger of a movement." [7]

स्मेल्सरच्या मते, रचनात्मक तणाव हा चळवळीतील कृती किंवा सामूहिक कृती घडवून अणणारा अंतर्गत घटक असतो व एखाद्या उपव्यवस्थेत तणाव नसलेली अशी सामाजिक चळवळ असूच शकत नाही. कारण असे तणाव सामूहिक कृतीला जन्म देणारे घटक असतात.

हा सिद्धांत रचना - कार्यात्मक स्पष्टीकरणात मोडतो. समाजरचना चळवळीच्या रचनेवर व उदयावर विविध पध्दतीने परिणाम घडविते. त्यात भूमिका, मूल्ये, जमवाजमव, परिस्थितीजन्य सुविधा यासारख्या घटनांचा समावेश होतो. या घटनेला स्मेल्सर रचनात्मक उपयोगिता म्हणतात. समाजातील उपव्यवस्था या परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी असतात. त्यामुळे एखाद्या उपव्यवस्थेत जरी तणाव असला तरी संपूर्ण समाजावर त्याचे परिणाम घडून येतात.

२) पुनरुज्जीवीकरण (Revitalization) - अँथनी वॉलेस (Wallace AFC) यांनी या सिध्दांताबाबत पुढीलप्रमाणे मत मांडले आहे,

"According to this theory social movements is developed out of a deliberate, organized and conscious effort on the part of members of a society to construct a more satisfying culture. Revilalization is, thus a cultural change phenomenon, the persons involved in this process must perceive their culture as a system and they must fell that this cultural system is not satisfactory , and they must innovate a new cultural system. The revitalization movement occurs under two conditions high stress for individual members of the society , and disillusionment with a distorted culture. " [8]

अधिक समाधानकारक संस्कृती निर्माण करण्यासाठी समाजातील काही सदस्यांनी जाणीवपूर्वक, हेतूपूर्वक केलेले संघटित प्रयत्न म्हणजे पुनरुज्जीवीकरण अशी व्याख्या अँथनी वॉलेस करतात त्याचे दोन प्रकार ते पाडतात. मूलवाद - ही नकारात्मक संकल्पना आहे. परक्या व्यक्तीस किंवा संस्कृतीस स्वीकारण्यास नकार देणे अथवा प्रभुत्व गाजविणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकाला

स्पष्टपणे झिडकारणे म्हणजे मूलवाद. पुनरुज्जीवनवाद- ही होकारात्मक संकल्पना आहे. आधीच्या कालखंडातील सामाजिक सद्‌गुणाचे पुनरुज्जीवन करणे, पुन्हा आनंदमय काळाकडे जाणे म्हणजे पुनरुज्जीवनवाद होय. या प्रकारात मूकसंमती गृहीत धरलेली आहे. अशा सामाजिक परिवर्तनास समायोजन साधणाऱ्या व अनुकरणातून बरोबरी करणाऱ्या किंवा वरचढ होण्याचा प्रयत्न असणाऱ्या प्रक्रिया सुचित केलेल्या असतात.

३) सापेक्ष वंचितता (Deprivation) ही संकल्पना विविध विचारवंतांच्या विचारात आढळून येते. एम.एस.ए. राव (M.S.A. Rao) यांच्या मते,

"The relative deprivation theory offers a more satisfactory explanation of the genesis of social movements for it is pivoted around conflict and cognitive change motivating people and mobilizing them around certain interests and issues. Secondly, it offers thebest explanation for the chage - orientitaion of movement rather than to looking at movements as adaptive mechanisms restoringfunctional unity and equilibrium. However the relative deprivation theory needs refinement in two directions. First, it is necessary to make the concept sociologically more relevant by eschewing individual and psychic deprivations It is necessery to notethatdeprivations in the religious sphere are as important as those in the spheres of economic, education and politics."[9]

सापेक्ष वंचिततेचा सिध्दांत हा वैचारिक, सामाजिक चळवळीचे अधिक समाधानकारक स्पष्टीकरण देतो. म्हणून ही एक शास्त्रशुध्द चळवळ असतानाही सभोवतालचा संघर्ष अणि आकलनात्मक बदल लोकांना उत्तेजित करतो आणि संघटित करतो. त्याच्याच जोडीला लोकांच्या अभिरुची आणि विशिष्ट .मुद्दे असतात. दुसरे म्हणजे सापेक्षवंचिततेचा सिध्दांत उद्‌बोधन चळवळीबद्दल फार चांगले स्पष्टीकरण देतो. त्याच्यापेक्षाही या चळवळीकडे पाहताना स्वीकारणीय यंत्रणा व कार्यात्मक एकात्मता यात समतोल दिसून येतो. तथापि या सिध्दांताला दोन चांगल्या मार्गांची गरज आहे. प्रथमत: ही संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या जास्तीत जास्त अनुकूल करणे गरजेचे ठरते. वैयक्तिक व शारीरिक वंचिततेला दूर करून समाजशास्त्रीय संकल्पना जास्तीत जास्त योग्य करणे गरजेचे आहे ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. की, धार्मिक क्षेत्रामधील वंचितता जितकी महत्त्वाची आहे तितकीच आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रामधील वंचितता महत्त्वाची आहे.

"मर्टन (१९५०) आणि रुन्सीमन (१९६६) यांनी विधायक संदर्भ समूहाच्या जीवनपद्धतीच्या संदर्भात इतर गटात होणाऱ्या सामाजिक गतीशिलतेच्या अभ्यासाकरिता या संकल्पनेचा वापर केला आहे.

संकल्पना म्हणून सापेक्ष वंचिततेचा वापर करण्याचे श्रेय अॅबर्लेकडे (१९६६) जाते. 'न्याय अपेक्षा आणि वस्तुस्थिती यामधील नकारात्मक भेद म्हणजे सापेक्ष वंचितता' अशी व्याख्या ते करतात.

मार्क्सने सापेक्षवंचितेचा संबंध उत्पादन व्यवस्थेतील कामगारांचे परात्मीकरण, वर्गीय जाणीव, वर्गसंघर्ष याच्याशी जोडून वर्ग विहीन समाजव्यवस्थेसाठी कामगारांकडून होणारी क्रांती म्हणून सापेक्ष वंचिततेकडे पाहिले आहे."[१०]

एम. एस. ए. राव चळवळीच्या उदयासाठी पुढील घटक आवश्यक मानतात.

"The participants in a movements especially among the backward classes in India view their depgrivation in different areas such as, relegious, economic, education and political - as interrelated, for they are different manifestations of inequalities and discriminations. The leaders of a movement simultaneously open up multiple fronts to attack the monopoly of the upper castes in various fields."[11]

भारतातील मागासवर्गीयांच्या चळवळीच्या उदयाचे कारण सापेक्ष वंचितता हेच आहे. प्रामुख्याने धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय जीवन हेही सापेक्ष वंचिततेशी संबंधित आहे असे राव यांचे मत आहे. तसेच आपण काहीतरी करू शकू ही जाणीव सामाजिक चळवळीच्या उदयासाठी आवश्यक असते. त्यामागे त्या नेत्यांना झालेले वस्तुस्थितीचे आणि स्वसामर्थ्याचे भान असते.

काही इच्छित स्थान न मिळता इतर लोकांच्या राहणीमानाच्या तुलनेत हीनं सामाजिक स्थान मिळण्याने बहुसंख्य लोकांना आपण नागविले जात असल्याची भावना निर्माण होणे म्हणजे सापेक्ष वंचितता.

"ज्या ज्यावेळेस समाजात अशांततेची परिस्थिती निर्माण होते त्या त्यावेळेस सामूहिक कृतीद्वारे किंवा सामूहिक वर्तनाद्वारे व्यक्ती आपले सामूहिक उद्दिष्ट किंवा ध्येय प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असतात. चळवळ ही समाजातील गैरव्यवहार सुचित करीत असते. पिळवणूक, भेदभाव, विषमता सामाजिक तणाव हे घटक चळवळीचे उद्दीपक (Conducive) घटक असतात. तथापि सामाजिक विषमता हीच सामाजिक चळवळीला जन्म देत नाही. त्यासाठी भेदभाव केला जात असल्याची वंचिततेची जाणीव अत्यंत आवश्यक असते. ती भावना किंवा जाणीव मोठ्या समुदायाला काहीतरी हालचाल करावयास भाग पाडते. एका अर्थाने ती

प्रेरकशक्ती असते. आता ही भावना कोणामध्ये असते तर समाजाचा खूप मोठा भाग असणाऱ्या मध्यमवर्गीयांत आणि चळवळीचे नेते बनू इच्छिणाऱ्या बुध्दिजीवींमध्ये असते. विचारशील व्यक्तीच्या द्वारा चळवळी निर्माण होतात.

न्याय मिळविण्यासाठी आणि नागवणूक थांबविण्यासाठी माणसाने जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न चळवळीत असतात. रचनात्मक घटकानुसार चळवळी निर्धारित होतात. स्वत:हून कार्य करण्याची प्रवृत्ती तिच्यामध्ये दिसून येते. माणसाला प्रिय वाटणारी उद्दिष्टे मिळविण्यासाठी चळवळी निर्माण होतात. किंबहुना चळवळ ही अशा प्रकारची यंत्रणा आहे की, जिच्यामार्फत नागवणुकीस बळी पडलेला समाज शक्तिप्रदर्शन करू शकतो. सामाजिक चळवळीत व्यक्तिगत प्रयत्नापेक्षा सामूहिक कृती आवश्यक असते. जेव्हा ही सामूहिक कृती टिकते आणि बऱ्याच मोठ्या समुदायास जागृत करते तेव्हाच ती सामाजिक चळवळीचे रूप धारण करू शकते.''[१२]

सामाजिक चळवळीचे वर्गीकरण (Classification of Social Movement)

चळवळीचे वर्गीकरण करण्यासाठी एखादा विशिष्ट असा निकष उपलब्ध नाही. त्यामुळे चळवळीवरील साहित्यामध्ये अभ्यासकांनी अनेक प्रकारे वर्गीकरण केले असल्याचे आढळते. वर्गीकरणासाठी त्या त्या सामाजिक चळवळीची पायाभूत वैशिष्ट्ये विचारात घ्यावी लागतात. सामाजिक चळवळीचे वर्गीकरण साधारणत: स्थान, विचारप्रणाली,परिणाम, चळवळीचा रचनाकाळ, सदस्य संख्या आणि व्यापकता यानुसार पुढीलप्रमाणे केले जाते.

अ) व्यक्तीच्या सामाजिक स्थानावरून म्हणजे भाषा, धर्म, संप्रदाय, वंश, जात, व्यवसाय (उदा. शेतकरी, कामगार), आदिवासी, विद्यार्थी, स्त्री या घटकांनुसार सामाजिक चळवळीचे वर्गीकरण केले जाते.

ब) सामाजिक परिवर्तन या निकषाच्या आधारे सुधारणावादी, रूपांतरवादी आणि क्रांतिवादी असेही वर्गीकरण करता येते.

क) विचारप्रणाली हा निकष मानल्यास निदर्शनात्मक, बंडखोर आणि पुनरुज्जीवीकरणात्मक असे वर्गीकरण करता येते.

ड) चळवळीच्या परिणामानुसार जसे अनुयायांची संख्या, चळवळीचा कालावधी, चळवळीचा सामाजिक सहभाग असेही वर्गीकरण करता येते.

याव्यतिरिक्त चळवळीचा अभ्यास करणाऱ्या अनेक अभ्यासकांनी चळवळीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आढळते.

टर्नर आणि किलीयन यांच्या मते, मूल्य, सत्ता व सहभाग.

गसफिल्डच्या मते, असहयोग, विरोध, सुधारणा आणि क्रांती.

एम. एस. ए. राव सुधारणावादी, क्रांतिवादी आणि परिवर्तनवादी असे प्रकार सांगतात.

स्मेल्सर हे मूल्यसंकल्पना व गुणवैशिष्ट्य असे दोन प्रकार सांगतात. मूल्याधिष्ठित चळवळ ही प्रचलित मूल्याचा आधार घेत नवीन क्रांतिकारी परिवर्तनवादी मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करते तर गुणवैशिष्ट्याधित चळवळ ही प्रचलित सर्वमान्यतांचा आधार घेत

नवीन गुणवैशिष्ट्ये निर्माण करण्याची कृतीप्रवण चळवळ करते.

पार्थ मुखर्जी सामाजिक चळवळीने अपेक्षित असलेल्या सामाजिक बदलाच्या गुणात्मकतेनुसार संचयवादी, पर्यायवादी आणि परिवर्तनवादी असे प्रकार सांगतात.

टी. के. ओमेन सामाजिक चळवळीचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगतात - भावनाधिठित, आदर्शवादी, विचारप्रणालीवर अधिष्ठित व संघटनावादी.

ब्लुमरने सामाजिक चळवळीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

सामान्य सामाजिक चळवळी, मूलभूत सामाजिक चळवळी, अर्थपूर्ण व सूचक सामाजिक चळवळी.'' [१३]

चळवळीचे एकूण किती प्रकार आहेत हे सांगणे अवघड बाब आहे. कारण कोणतीही चळवळ ही काळाच्या ओघात नवनवीन गुणवैशिष्टये प्राप्त करीत जाते. म्हणून तिचे वर्गीकरणही चळवळीच्या विकासकाळातील बदलाच्या स्वरूपानुसार बदलत जाते.

विविध विचारवंतांनी केलेल्या सामाजिक चळवळीच्या प्रकाराचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

''१) सुधारणावादी चळवळी - संपूर्ण समाजव्येवस्थेत बदल घडवून आणणे शक्य नसल्यामुळे समाजव्येवस्थेत काही भागांमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या चळवळी.

२) क्रांतिकारी चळवळी - विद्यमान समाजव्यवस्था अयोग्य किंवा असमाधानकारक आहे असे समजून तिच्यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या चळवळी.

३) प्रतिगामी चळवळी - परिवर्तनास विरोध करणाऱ्या चळवळी अथवा परंपरागत जीवनपद्धतीची पुन्हा स्थापना करणे या उद्देशाने निर्माण झालेल्या चळवळी.

४) आदर्शवादी चळवळी - आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने निर्माण झालेल्या चळवळी.

५) वर्गचळवळी - समाजव्यवस्था आणि व्यावसायिक संबंधातून संघटना निर्माण होतात. या संघटना आपल्या सभासदांच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी आणि त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी चळवळी करतात.

६) वांशिक चळवळी - विशिष्ट वांशिक व सांस्कृतिक लक्षणे असणाऱ्या समूहाशी संबधित असलेल्या चळवळी.

७) निषेध चळवळी - या चळवळी सामान्यपणे स्थानिक प्रादेशिक क्षेत्रापुरत्याच मर्यादित

सामाजिक चळवळीमध्ये विचारप्रणालीची भूमिका / स्थान (Ideology) :

वैचारिक बैठक किंवा विचारसरणी हा सामाजिक चळवळीतील महत्त्वाचा घटक असतो. एम.एस.ए. राव यांच्या मते,

"सामूहिक कृती करणारी इतर कुठलीही संघटना आणि सामाजिक चळवळ यात भेद करणारी विचारप्रणाली (Ideology) हा आवश्यक घटक आहे. कोणत्याही सामाजिक चळवळीला एखादी विचारप्रणाली असणे अनिवार्य असते. विचारप्रणाली चळवळीला दिशा देत असते. कुठल्याही चळवळीचा महत्त्वाचा भाग असणारी विचारप्रणाली ही सामूहिक कृतीला अर्थ देणारी व अपेक्षित परिणाम निश्चित करणारी आवश्यक बाब आहे." [१५]

"विचारप्रणाली चळवळीची धारक प्राणशक्ती असते. कारण ती चळवळीचे उद्दिष्ट ठरविते, पार्श्वभूमी तयार करते, लोकांना कृतिशील बनविते, नवी मूल्ये देते." [१६]

कुठल्याही सामाजिक चळवळीला प्रभावी नेतृत्व नसेल तर व्यापक विचारप्रणालीची किंवा निश्चित कृती कार्यक्रमाची आवश्यकता असते. विचारप्रणाली एका बाजूला संबंधित गटाच्या संरचनात्मक घटकावर तर दुसऱ्या बाजूला साधनसामुग्री व जाणिवेच्या पातळीवर आधारलेली असते. विचारप्रणाली घेऊनच एखादी चळवळ सुरू होते असे नाही तर चळवळीच्या विकासप्रक्रियेतही एखादी चळवळ आपली विचारप्रणाली बनवू शकते.

विचारप्रणालीमुळे किंवा समान विचारामुळे एकत्र आलेली नेतेमंडळी समाजातील दुरिताविरुद्ध, अनिष्ट चालीरीतीविरुद्ध लक्ष देण्यासाठी आणि तक्रारी, गाऱ्हाण्यांची पुनर्मांडणी करण्यासाठी संघटनात्मक साधने निर्माण करतात. एखाद्या संघाप्रमाणे (Association) किंवा मंडळाप्रमाणे (Club) सामाजिक चळवळ संघटित नसली तरी तिच्यात किमान संघटनात्मकता असली पाहिजे. त्यामुळे काही विशिष्ट व्यक्तींना चळवळीचा प्रवक्ता अथवा प्रतिनिधी म्हणून वावरता येणे शक्य होते. कुठलीही सामाजिक चळवळ म्हणजे कुठल्याही दिशेने कोणतेही साधन वापरून परिवर्तन घडवून आणण्यासाठी हेतूत: केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा असते. हिंसा, क्रांती या घटकांचा त्यात समावेश होतो. सामाजिक गतिमानता आणि बदल हे निदर्शणे, असंतोष, आक्रमण आणि बंडखोरी यांच्या माध्यमातून येतात. विद्यमान मूल्ये आणि मानदंडामध्ये संपूर्णपणे किंवा अंशत:तरी परिवर्तन घडविणे हाच सामाजिक चळवळीचा हेतू असतो.

सामाजिक चळवळीच्या अभ्यासाची पार्श्वभूमी :

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतीय समाजशास्त्रात सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र दुर्लक्षित राहिले. १९७० पर्यंत या विषयाची फारशी दखल घेतली गेली नाही. १९७० नंतर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून चळवळीचा अभ्यास करण्याकडे संशोधकांचा कल असलेला दिसून येतो.

१९६० च्या दशकात भारतासह सर्व जगात अत्यंत वादळी सामाजिक चळवळी आकार घेत होत्या. आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील खालावत जाणारी परिस्थिती, गरीब - श्रीमंतांमधील

दरी यासारख्या कारणांनी वेगवेगळ्या चळवळींना जन्म दिला. त्यात कामगार, स्त्रिया, विद्यार्थी सर्वच ओढले गेले. स्वातंत्र्यानंतर तिसऱ्या दशकात म्हणजे १९७० नंतर भारतात सामाजिक चळवळींकडे समाजशास्त्रज्ञांचे लक्ष गेले. १९६८ ते १९७७ च्यादरम्यान सामाजिक चळवळीचा अभ्यास झाला. समाजशास्त्रीय संशोधनात चळवळींचे क्षेत्र तसे उपेक्षितच होते. त्यावर अत्यंत कमी प्रमाणात संशोधन झाले. समाजशास्त्रात जे काही संशोधन झाले ते बहुधा धर्म, जात, आदिवासी आणि शेतकरी चळवळ यावरच होते. १९८० पासून समाजातील ज्वलंत विषयांवर संशोधन करण्याकडे समाजशास्त्रज्ञांचा कल वाढत असलेला दिसून येतो.

सामाजिक चळवळीच्या अभ्यासपद्धती :

चळवळीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी पुढील तीन पद्धतींचा वापर केला जातो.

अ) संरचनात्मक कार्यात्मक पद्धती (Structural Functional approach)

ब) मार्क्सवादी पद्धती (Marxian approach)

क) सांकल्पनिक पद्धती (Conceptual approach)

अ) संरचनात्मक कार्यात्मक पद्धती :

संरचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोन हा समाजशास्त्राच्या अभ्यासात वापरला जाणारा महत्वाचा दृष्टीकोन आहे. हा दृष्टीकोन एखाद्या समाजाचा वास्तवस्थितीत किंवा प्रत्यक्ष स्थितीत अभ्यास करण्यावर भर देतो; परंतु या पध्दतीवर खूप आक्षेप आहेत. संरचनात्मक कार्यात्मक पद्धती चळवळीच्या अभ्यासास तितकीशी उपयुक्त होऊ शकत नाही असे विचारवंताचे मत आहे. कारण सामाजिक परिवर्तनाच्या काळात चळवळीचे मुल्यमापन फक्त समायोजन साधणारी यंत्रणा या दृष्टीकोणातूनच केले गेले.

या बाबात टी. के. ओमेन यांनी तीन मूळ दोष स्पष्ट केले आहे ते म्हणतात,

"या दृष्टीकोनात, १) वंचिततेचा मूळ उगम स्पष्ट केलेला नसतो.

२) व्यक्तीपेक्षा समाजश्रेष्ठतेच्या दृष्टीकोनातून पाहिल्याने मानव हा समाजनिर्मित घटक आहे असे गृहीत धरून मानवाच्या सृजनशीलतेकडे दुर्लक्ष केलेले दिसते.

३) या दृष्टीकोनातील विश्लेषणात्मक घटक 'भूमिका' हा चळवळीच्या विश्लेषणाच्या दृष्टीने अनुपयोगी ठरतो. "[१७]

ब) मार्क्सवादी अभ्यासपध्दती :

मार्क्सवादी दृष्टीकोनातून समजातील स्थित्यंतराचा अभ्यास केला जात असला तरी एम.एस.ए. राव यांनी या दृष्टीकोनावर काही मर्यादा पडतात असे म्हटले आहे. *त्यांच्यामते,*

"१) क्रांतीकारी वर्गीय गटावर जात, वंश, धर्म आणि इतर वांशिक बंधनांचे लांच्छन लादलेले आढळते. शिवाय वर्गीय स्थिती काळानुसार बदलू शकते आणि वर्गीय विचारप्रणालीच्या विरोधात नवा प्रवाह उभा राहू शकतो.

२) वर्गीय ध्रुविकरणाअभावी वर्गीयगट जातीय गुणधर्मांनी भ्रष्ट झालेले असतात.
३) भारतीय समाजाच्या संदर्भात उत्पदनातील बहूविध प्रकारामुळे व पध्दतीमुळे भांडवलशाही, वेतन, श्रमीक/मजुरवर्ग आणि घरगुतीश्रमीक अशी निखालस गटवारीता उदयास येण्यास अडथळा निर्माण करतो. ही गटवारी स्त्रियांच्या व पुरुषांच्या भूमिकांच्या विश्लेषणाची मध्यवर्ती महत्त्वाची घटक असते.'' [१८]

क) सांकल्पनिक अभ्यासपध्दती :

वरील दोन्ही अभ्यासपध्दतीतील दोष टाळण्यासाठी एम.एस.ए. राव यांनी सांकल्पनिक अभ्यासपध्दती तयार केली आहे. भारतीय समाजाची जात, वर्ग, धर्म, वंश यांची क्लिष्ट सामाजिक, अर्थिक रचना स्पष्ट करण्यासाठी त्यांनी ही पध्दती तयार केली आहे. राव यांनी सुचविलेल्या अभ्यासपध्दतीवरही ओमेन यांनी आक्षेप घेतला आहे. ओमेनच्या मते,

''राव यांनी सुचविलेल्या वर्गीकरणाच्या योजनानुसार अनेक सांकल्पनिक आणि सैध्दांतिक प्रश्न स्पष्ट होतीलच असे नाही.'' [१९]

सामाजिक परिवर्तनात एक प्रभावी प्रक्रिया म्हणून चळवळीला स्थान प्राप्त झाल्यामुळे व प्रस्तुत संशोधनाचा विषय हा चळवळीशी संबंधित असल्यामुळे चळवळीचे ऐतिहासिक व वास्तविकतेच्या संदर्भात विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दलित चळवळीचा उगम :

दलित चळवळीचा उगमच मुळात सापेक्ष वंचिततेतून झाला आहे. वरील तिनही सिध्दांतांपैकी 'सापेक्ष वंचिततेचा' सिध्दांत इथे लागू पडतो. समाजातील इतर समूहांचा विचार करता आपण नागवले जात आहोत, आपली पिळवणूक होत आहे, आपण वंचित ठेवले जात आहोत ही जाणीव दलितांना अस्वस्थ करीत होती असे आढळते.

१) सापेक्ष वंचितता, २) निषेधात्मक विचारप्रणाली ३) विरोधी संदर्भ गट आणि ४) दलित या संकल्पना दलित चळवळीचे विश्लेषण करताना महत्त्वाच्या ठरतात.

सापेक्ष वंचिततेच्या संकल्पनेत पिळवणूक, नागवले जाणे व वंचित ठेवले जाणे या भावना समाविष्ट होत्या.

'निषेधात्मक विचारप्रणाली' ही हिंदू समाज व जातीव्यवस्थेच्या विरोधात होती.

अस्पृश्य आणि पद्दलितांना दिल्या जाणाऱ्या यातनामय वर्णभेदाच्या, जातीभेदाच्या अनुभवाने दलितांमध्ये नैराश्य पसरले. सर्व सवलती मिळणाऱ्या त्यांच्या 'विरोधी संदर्भ गटाचा' म्हणजेच हिंदू समाजाचा सुस्थित सामाजिक दर्जा पाहता नैराश्याची तीव्रता जाणवायला सुरुवात झाली.

दलित :

प्रचीनकाळी दलितांना अतिशूद्र, पंचम इत्यादी म्हटले जात होते. १९३१ च्या जनगणनेत त्यांचा उल्लेख 'बाह्य जाती' (out-caste) असा करण्यात आला. त्यांना 'बहिष्कृत जाती' असेही म्हटले गेले. महात्मा गांधींनी त्यांच्यासाठी 'हरिजन' हा शब्द वापरला. भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्यानुसार प्रस्तुत जातींची एक सूची तयार करण्यात आली. तेव्हापासून मागासलेल्या अशा जातींकरिता 'अनुसूचित जाती' (Scheduled caste) हा शब्द प्रयोग करण्यात आला. भारताच्या राज्यघटनेत अनुच्छेद ३४१ प्रमाणे स्वतंत्ररित्या अशी सूची समाविष्ट केलेली आहे. घटनेच्या या कलमानुसार भारतातील जातींचा अनुसूचित जातींमध्ये समावेश करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

१९८१ च्या यादीनुसार महाराष्ट्रात अनुसूचीत जातींची एकूण संख्या ५९ इतकी आहे. दलित पँथर चळवळीचे एक नेते नामदेव ढसाळ यांनी 'दलित' शब्दाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते,

"अनुसूचित जाती, जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी हे सर्व दलित होय."[२०]

दलित साहित्याचे अभ्यासक डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'दलित' शब्दाविषयी आपले विचार मांडले. त्यांच्या मते,

"Dalit is not a caste, Dalit is a symbol of change and revolution. The Dalit believes in humanism. He rejects the existence of God, rebirth, soul, sacred books, that teach discrimination, fate and heaven, because these have made him a slave. He represents the exploited men in his Country, Dalitness is essentially a means towards achieving a sense of cultural identity. The inferiority complex (to be Dalit) has now disappeared. Now Dalitness is a source of confrontation. This change has its essence in the desire for justice for all mankind." [21]

'दलित' ही जात नसून बदलाचे, क्रांतीचे प्रतीक आहे. ते फक्त मानवतावादावर विश्वास ठेवतात. त्यांनी देवाचे अस्तित्व, पुनर्जन्म, आत्मा, भेदभाव वाढीस लावणारा पवित्र ग्रंथ, स्वर्ग - नरक या कल्पना झुगारून दिल्या. कारण दलितांना या देशात गुलामासारखी वागणूक देऊन त्यांचे शोषण केले गेले. आता दलित स्वतःची सांस्कृतिक ओळख करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यातील न्यूनत्वाची भावना नाहीशी होत आहे. दलित सर्व मानवजातींसाठी सामाजिक न्यायाची मागणी करीत आहेत. अशा प्रकारचे व्यापक विचार त्यांनी व्यक्त केले आहेत.

बाबूराव बागुल यांनी 'दलित' शब्दाविषयी पुढील मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, *"दलित हा अन्यायाविरुध्द, अत्याचाराविरुध्द, पिळवणूक आणि छळवणुकीविरुध्द न्याय मागणारा आहे. तो संपूर्ण समाजपरिवर्तन मागणारा आहे. म्हणजेच तो सर्वंकष क्रांतीचा जयघोष करणारा आहे. तो समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व आणि सम्यक क्रांतीचा पुरस्कर्ता आहे."* [२२]

अशा प्रकारे 'दलित' ही संकल्पना व्यापक अर्थाने उपयोगात आणली जात असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

प्रस्तुत अभ्यास दलित चळवळीशी सबंधित असल्यामुळे दलित चळवळीचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. परंतु दलित चळवळीचा अभ्यास करण्याअगोदर भारतीय समाजातील जातीव्यवस्था अभ्यासणे महत्त्वाचे असल्यामुळे येथे जातीव्यवस्थेचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

जातीव्यवस्था (Caste system) :

'जात' हा भारतीय समाजव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असून ती एक प्राचीन सामाजिक संस्था आहे. आजपर्यंत अनेक समाजशास्त्रज्ञांनी व मानववंशशास्त्रज्ञांनी भारतीय जातीचा अभ्यास केला व जातीविषयी विचार व्यक्त केले आहेत. त्यामध्ये इबेटसन (१८८०), नेसफिल्ड (१९८५), सेनार्ट (१९८६), ओल्डेनबर्ग (१९८७), डालमन (१८९९), सर हर्बर्ट रिस्ले (१९०१), जॅकसन (१९०७), श्री. व्यंकटेश केतकर (१९०९), वि.रा. शिंदे १९११, डॉ. आंबेडकर १९१३, रामप्रसाद चंदा (१९१६), स्लेटर (१९२४), पी. व्ही. काणे १९३०, ब्लंट (१९३१), डॉ. जी. एस. घुर्ये (१९३२), होकार्ट (१९३८), गिल्बर्ट (१९४८), डॉ. इरावती कर्वे (१९५१), डॉ. मुजुमदार (१९५२), यांचा समावेश आहे. यांनी जातीचा सखोल अभ्यास करून जातीच्या उत्पत्तीविषयी सिद्धांत मांडले.

जातीच्या उत्पत्तीबाबतचे काही विचार :

पाश्चात्त्य लोकांनी जातीबद्दल व्यक्त केलेले सर्वात जुने मत ख्रि. पु. तिसऱ्या शतकातील मॅगेस्थेनिस यांचे आहे,

"आंतर्विवाह आणि प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय असणे ही दोन लक्षणे त्यांनी सांगितली आहेत." [२३]

डॉ. जी. एस. घुर्ये जातीव्यवस्थेला ब्राह्मणनिर्मित व्यवस्था मानतात त्यांच्या मते,

"जातीव्यवस्था इंडोआर्यन संस्कृतीमधील ब्राह्मणांचे अपत्य आहे. ते अपत्य गंगा नदीच्या खोऱ्यात वाढले व नंतर भारताच्या इतर भागात स्थलातंरित झाले." [२४]

अशा प्रकारचेच मत ॲबे डुबॉयस (Abbe Dubais,) इबेटसन (Ibetson) यांनी व्यक्त केले.

श्री. व्यंकटेश केतकर यांनी जातीची दोन लक्षणे सांगितली आहेत,

"१) जातीचे सदस्यत्व हे जातीत जन्मल्यामुळे लाभते. २) जातीच्या बाहेर विवाहसंबंध जोडण्यास सक्त मनाई असते." [२५]

त्रि. ना. अत्रे यांनी 'गावगाडा' या पुस्तकात जातीच्या उत्पत्तीबद्दल पुढील मत व्यक्त केले आहे.

"व्यवसायामुळे जाती निर्माण झाल्या की, जातीमुळे व्यवसाय निर्माण झाले हे सांगणे कठीण असले तरी वर्णाप्रमाणे जाती - जातीचेही विवक्षित धंदे व आचार पडत गेले आणि ते जातीधर्म म्हणून ज्या त्या जाती पाळू लागल्या. जातीतल्या काही लोकांनी काही धंद्यातून किंवा मूळ धंद्याच्या घाणेरड्या किंवा त्रासदायक भागातून अंग काढून घेतले. तसे ज्यांनी केले नाही त्यांच्या कमी दर्जाच्या पोटजाती बनल्या. वर्णातून ज्या कारणांनी जाती निघाल्या त्याच कारणांनी जातीतून पोटजाती निघाल्या." [२६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढील मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते,

"बहिर्गट विवाहबंधनावर अंतर्गट विवाहबंधनाचे वर्चस्व निर्माण होणे म्हणजे जात होय." [२७]

जात हा बंदिस्त वर्ग आहे. त्यात दर्जा उंचवायला वाव नाही व तो अतंर्विवाही समूह आहे जातीच्या वरील वैशिष्टयांवरून जात हा अत्यंत गुंतागुंतीचा प्रकार आहे असे दिसते. ती केव्हा सुरू झाली हे सांगणे कठीण असले तरी अनेक अभ्यासकांनी जातीचा अभ्यास करून जातीच्या उत्पत्तीबाबतचे सिध्दांत मांडले आहेत.

जातीच्या उत्पत्तीचा प्राचीन आधार म्हणजे ऋग्वेदातील 'पुरुषसुक्त' यातील श्लोकांच्या आधारे ब्रम्ह्याच्या मुखातून ब्राह्मण, बाहूमधून क्षत्रिय, जांघेतून वैश्य व पायातून शूद्राची निर्मिती झाली आहे.

वैदिक काळातील समाज हा चार वर्णांमध्ये विभागलेला होता. या चार वर्णांची कर्तव्ये अधिकार, व्यवहार, उच्च-नीचत्व, परपंरावलंबित्व व परस्परपूरकत्व या गोष्टींचा विचार करून धर्मशास्त्रकारांनी जी एक सामाजिक चौकट निर्माण केली तिला 'चातुर्वर्ण्य' असे नाव आहे.

आरंभीच्या काळात समाजात चारच वर्ण होते. हे चार वर्ण पुढे जाती बनल्या.

मनुच्या मते,

"या चार वर्णातील अनुलोम व प्रतिलोम विवाहातून असंख्य जाती निर्माण झाल्या." [२८]

स्मृतिकारांच्या मते,

"काही जाती संकरातून निघाल्या व त्यांना मूळ दोन जातींमधला दर्जा मिळाला. हे मत मानववंशशास्त्रज्ञांनी सुध्दा मान्य केले. पण त्यांच्या मते अशा जातींची संख्या अत्यल्प आहे. त्यांच्या मते एका मोठ्या गटाचे लहान लहान भाग होऊन अनेक जाती बनल्या." [२९]

प्रत्येक जातीच्या हातात काहीना काही व्यवसाय आहे. सर्व कामे एकट्याने होणार नाहीत म्हणून ती कामे एकमेकांत वाटून घेतली. तीच कामे वंशपरंपरागत घरातच चालू राहिली. त्या व्यवसायावरून जाती निर्माण झाल्या.

जातीच्या निर्मितीचे कारण आर्थिक निकष देण्यात येऊन त्याचे समर्थन केले गेले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासंदर्भात म्हणतात,

"जाती पद्धतीने घडविलेले श्रमविभाजन हे निवडीवर आधारलेले नाही. व्यक्तिगत भावना, व्यक्तिगत आवड यांना त्यात कसलेही स्थान नाही. ते दैववादाच्या तत्त्वावर आधारलेले आहे." [३०]

भारतातील अस्पृश्यता आणि जाती कशा अस्तित्वात आल्या यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील निष्कर्ष काढले आहेत.

१) "शूद्र सूर्यवंशातील आर्य जातीचे होते.

२) एकेकाळी आर्य समाजव्यवस्थेत फक्त तीनच वर्ण होते.

३) शूद्रांचा वेगळा वर्ण नव्हता. हिंदी आर्य समाजात तो क्षत्रिय वर्णच होता.

४) शूद्र राजे व ब्राह्मण यांच्यात सातत्याने झालेल्या संघर्षात ब्राह्मणांवर अनन्वित अत्याचार झाले.

५) शूद्रांनी आपल्यावर अत्याचार व जुलूम केले ही जाणीव ब्राह्मणाच्या अंत:करणाला एकसारख्या टोचण्या देत होती म्हणून ब्राह्मण शूद्रांचा द्वेष करू लागले. द्वेषामुळेच शूद्रांचे उपनयन करण्याचे ब्राह्मणांनी नाकारले.

६) शूद्रांना उपनयन नाकारल्यामुळे शूद्र आपल्या मूळच्या क्षत्रिय पदापासून दूर फेकले गेले. सामाजिक दृष्टीने त्यांची अधोगती झाली. त्यामुळे त्यांचा दर्जा वैश्यांच्या खालचा झाला आणि त्याप्रमाणे त्यांचा स्वतंत्र चौथा वर्ण निर्माण झाला." [३१]

वरील विवेचनावरून असे म्हणता येते की, जातीच्या निर्मितीस वेगवेगळे घटक कारणीभूत आहेत. काहींनी वर्णातून जाती निर्माण झाल्याचे म्हटले तर काहींनी व्यवसायातून जाती निर्माण झाल्याचे म्हटले. वर्णसंकरातून आणि अनुलोम व प्रतिलोम विवाहातून पोटजाती निर्माण झाल्या. अशा प्रकारे भारतीय समाजात जातीसंस्थेचा उदय झाला. जातीसंस्थेतच अस्पृश्यतेच्या उदयाचे मूळ रुजलेले दिसते. अस्पृश्यतेचे विवेचन पुढीलप्रमाणे

अस्पृश्यता (Untouchability) :

अस्पृश्यता ही जातीसंस्थेतून उदयास आली. अस्पृश्यतेचे स्वरूप प्राचीन आणि मध्ययुगीन काळात भिन्न होते. तसेच ते आधुनिक काळातही भिन्न आहे.

भारतातील अस्पृश्यतेचा अभ्यास आजपर्यंत अनेक समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञांनी केलेला आहे. त्यामध्ये स्टेन्ले राईस, जी. एस. घुर्ये, डी. एन. मुजुमदार, डॉ. हटन, रामशरण शर्मा, विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रमुख आहेत.

अस्पृश्यतेचा उदय केव्हा झाला याबाबत विचारवंतांमध्ये मतभिन्नता आहे.

अस्पृश्यतेची निर्मिती कशी झाली याबाबत घुर्ये म्हणतात.

"इंडोआर्यन लोकांनी येथील मूळ लोकांना खालचा दर्जा दिला. एवढेच नाही तर त्यांना दास व गुलाम म्हणून वागविले. तसेच त्यांना धार्मिक विधीसारख्या पवित्र बाबींपासून दूर ठेवले. अशा पवित्र-अपवित्रतेच्या कल्पनेतूनच अस्पृश्यता उदयास आली." [३२]

अशा प्रकारचेच मत स्टॅन्ले राईस (१९३७), डॉ. डी. एन. मुजुमदार (१९५२), डॉ. हटन (१९६३) यांनी व्यक्त केले आहे.

श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते,

"मल आणि मृत यासंबंधीचे धंदे अस्पृश्यतेच्या चालीला कारणीभूत आहेत. मनुष्याचे प्रेत, मृत जनावरे, मलमुत्रादीशी संबंध वा कुजलेल्या पदार्थांशी संबंध असलेले धंदे करणारे लोक अस्पृश्य मानले गेले. मलामध्ये काहीतरी पाप आहे आणि ते पाप मलातून स्पर्श करणाऱ्यात शिरते म्हणून त्या पापाच्या भीतीने मलाशी संबंध असलेल्या धंद्यातले लोक अस्पृश्य मानले गेले." [३३]

इथे अस्पृश्यता व्यवसायातून उदयास आल्याचे दिसून येते.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या ग्रंथात असे मत व्यक्त केले की,

"अस्पृश्यता ही एक स्वतंत्र मानवी संस्था आहे. तिचा उदय मानवी जातीच्या अगदी प्रारंभिक स्थितीतच झाला असला पाहिजे. वर्णद्वेष व जातीमत्सर यामुळे अस्पृश्यता रूढ झाली. उत्तर भारतात आर्यांचा जम हळूहळू बसू लागल्यावर त्यांनी यथानुक्रम ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी व्यवस्था लावली आणि ज्यांच्या गुणकर्मांचा तिटकारा वाटला अशा जातींना दूर ठेवले. पुढे अर्थशास्त्राच्या पायावर आर्यांमध्ये निरनिराळ्या वृत्तींचा, धंद्यांचा विकास झाला. तसतशी वर्णद्वेषात, वृत्ती-मत्सराची भर पडली व पूर्वीच दूर ठेवलेल्या जातीत वृती बहिष्कृत लोकांची भर पडून अस्पृश्यतेचा विकास झाला." [३४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या संदर्भात सखोल संशोधन करून (The Untouchable 1948) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी अस्पृश्यतेच्या उदयाचे महत्त्वपूर्ण सिध्दांत मांडले ते असे -

१) "अस्पृश्य आणि सवर्ण यांच्यामध्ये वंशभेद नाही.

२) अस्पृश्यतेचा उदय होण्यापूर्वी हिंदू लोक आणि अस्पृश्य यांच्यातील मूळभेद, टोळ्यांमध्ये संघटित असलेले लोक (Tribesmen) आणि बाह्य आक्रमणांमुळे पराभूत होऊन वाताहत झालेले लोक (Broken man) अशा स्वरूपाचा होता. या इतस्त: विखुरलेल्या जित लोकांनाच पुढे काळाच्या ओघात अस्पृश्य समजण्यात येऊ लागले.

३) अस्पृश्यतेला जसा वंशभेदाचा आधार नाही तसाच तिला उद्योगाचाही आधार नाही.

४) अस्पृश्यतेच्या उगमाची दोन कारणे आहेत .

अ) ब्राहमण लोक बौध्दांचा जसा तिरस्कार व द्वेष करीत होते तसाच तिरस्कार व द्वेष या जित लोकांचाही होत होता.

ब) इतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग केल्यानंतरही या जित लोकांनी गोमांस भक्षण सुरूच ठेवले.

५) अस्पृश्यतेच्या उगमाचा शोध घेताना 'अस्पृश्य' आणि 'चांडाळ' या शब्दांची परस्पर गल्लत होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सर्व सनातनी हिंदू लेखकांनी 'अस्पृश्य' आणि 'चांडाळ' या शब्दांना परस्परांचे पर्याय मानले आहेत. असे करणे चुकीचे आहे. अस्पृश्य लोक चांडाळ लोकांहून वेगळे आहेत.

६) चाडांळांचा वर्ग धर्मसूत्राच्या काळामध्ये निर्माण झाला; परंतु अस्पृश्यांचा वर्ग त्यानंतर कितीतरी उशिरा निर्माण झाला.'' [३५]

अस्पृश्याच्या उत्पत्तीविषयी डॉ. आंबेडकर यांनी दुसरी एक कल्पना मांडली आहे. ते म्हणतात,

''आजचे अस्पृश्य हे पूर्वी बौध्द होते. ब्राहमणांकडून पराजीत झालेल्या बौध्द जमातींपैकी जे एकटेदुकटे असे राहिले होते. ते आताच्या अस्पृश्यांचे पूर्वज म्हणता येईल. बौद्ध धर्मानुसार ते गोहत्या करीत नसत; परंतु मृत गायीचे मांस खात असत. तेव्हाचे ब्राह्मण हे गोमांस खात असत शिवाय यज्ञात गायीचा बळी ही देत असत. बौद्ध धर्मात गोहत्या किंवा बळी देण्याच्या पद्धतीला स्थान नव्हते. साहजिकच अनेकांना बौद्ध धर्माची श्रेष्ठता पटली आणि ते ब्राहमणप्रणीत धर्म सोडून बौध्द धर्माकडे जाऊ लागले. ब्राह्मण घाबरले आणि बौद्ध धर्मावर मात करण्याकरिता गोहत्या व गोमांस खाणे हे त्यांनी निषिध्द मानले आणि गोमांस खाणाऱ्यांना अस्पृश्य ठरविले.'' [३६]

अस्पृश्यता नेमकी केंव्हा उदयास आली याबाबतही वेगवेगळ्या विचारवंतांमध्ये मतभिन्नता आहे.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मते,

''अस्पृश्यता ही आग्नेय आशियातील देशांमधून आर्यपूर्व संस्कृतीमध्ये दक्षिणेकडे प्रथम आली असावी. कारण उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतात अस्पृश्यता तीव्र स्वरूपात आढळते. पूर्वी दक्षिण हिंदुस्थानचा समुद्रमार्गाने आग्नेय आशियातील देशांशी संबंध असावा.'' [३७]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

''अस्पृश्यतेच्या उदयाचा कालखंड अदांजे इ.स. ४०० हा निश्चित केला.'' [३८]

डॉ. रामशरण शर्मा यांच्या अभ्यासातून *''अस्पृश्यतेचा उदय मौर्यपूर्व काळाच्या उत्तरार्धात झाला असे आढळते.''* [३९]

अशा प्रकारे अस्पृश्यतेच्या उदयाच्या कालखंडाबाबत वेगवेगळ्या विचारवंतांमध्ये मतभिन्नता आढळते.

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	वर्ष	एकूण लोकसंख्या महाराष्ट्र	अनुसूचित जातींची लोकसंख्या	एकूण लोकसंख्येतील प्रमाण
१.	१९६१	३,९५,५३,७१८	२२,२६,९१४	५.६३%
२.	१९७१	५,०४,१२,२३५	३०,२५,९६१	६.००%
३.	१९८१	६,२७,८४,१७१	४४,७९,७६३	७.१४%
४.	१९९१	७,८९,३७,१८७	८७,५८,०००	११.१%
५.	*२००१	९,११,१६,०००	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही

(*२००१ जनगणनेमध्ये जात ही माहिती विचारण्यात आलेली नाही. त्यामुळे ती माहिती उपलब्ध नाही.)

वरील माहितीवरून महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची लोकसंख्या १९६१ मध्ये ५.६३% होती. ती वाढत जाऊन १९७१ मध्ये ६.००% इतकी झाली. त्यात आणखी वाढ होऊन १९८१ मध्ये ७.१४ % इतकी तर १९९१ मध्ये हेच प्रमाण ११.१ % इतके होते. २००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या उपलब्ध न झाल्याने १९९१ ची लोकसंख्याचे प्रमाण मानावी लागेल. या लोकसंख्येची सद्य:स्थिती पुढील प्रमाणे -

अस्पृश्यांची सद्य:स्थिती :

"अस्पृश्यतेचे अस्तित्व हे ग्रामीण भागात अजूनही काही प्रमाणात आढळते. व्यक्तीला तिच्या जातीनुसारच स्थान प्राप्त होते व त्याच्या आधारेच तिचे सर्व सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. अस्पृश्यांची वस्ती स्पृशांच्या वस्तीपासून दूर अंतरावर असते. अस्पृश्यांना गावातील स्पृश्य वस्तीत असलेल्या सार्वजनिक किंवा खाजगी विहिरीवर पाणी भरता येत नाही. गावाला नदीच्या पाण्याचा पुरवठा असल्यास नदीच्या प्रवाहाच्या खालच्या बाजूला अस्पृश्यांचा पाणवठा असतो." [४०]

गोविंद गारे व शिरूभाऊ लिमये यांनी महाराष्ट्रातील २०६ गावांची पाहणी करून ग्रामीण भागात अस्पृश्यता किती प्रमाणात आहे याविषयी पुढील निष्कर्ष काढले. *"निम्याहून अधिक गावांत सार्वजनिक विहिरी किंवा पाणवठे यांचा अस्पृश्यांना वापर करता येत नव्हता. दलितांचे पाणवठे नदीच्या खालच्या बाजूस होते. १२६ गावांत सार्वजनिक देवालयात प्रवेश नव्हता. १३२ गावांत न्हावी दलितांचे केस कापीत नव्हते.*

४० गावांत दलित विद्यार्थ्यांना सवर्णीयांपासून दूर बसवण्यात येई. शाळेतील अस्पृश्यता ही शिक्षकांकडून पाळली जात होती. २०३ गावांतील ग्रामपंचायती आणि ग्रुप ग्रामपंचायतींपैकी ७५ ग्रामपंचायती व ७७ सहकारी सोसायट्यांतून दलितांना समान संधी दिली जात नव्हती. जातीची रूढी कोणी झुगारून दिली तर त्या दलितांची आर्थिक कोंडी करण्याचे प्रयत्न ३० गावांत झालेले आढळले.''[४१]

ग्रामीण भागात अनेक बाबतीत अस्पृश्यता पाळली जात असल्यामुळे अस्पृश्यांना अनेक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हाल सोसावे लागले; परंतु आज स्वातंत्र्यानंतर कायद्याने अस्पृश्यता रद्द ठरविली आहे. तसेच अस्पृश्यता कोणत्याही स्वरूपात पाळणे हा कायद्याने दखलपात्र गुन्हा ठरविला आहे. याचा परिणाम म्हणून कोणीही सार्वजनिकरीत्या अस्पृश्यतेचा पुरस्कार किंवा प्रचार करत नाही. शहरात सार्वजनिक अस्पृश्यता पाळणे कठीण आहे. ग्रामीण भागातही काही अस्पृश्यांच्या बाबतीत काही नियम शिथिल झालेले दिसून येतात; परंतु गावातच राहून गावातील पारंपरिक किंवा खालच्या दर्जाचे व्यवसाय करीत असलेल्या अस्पृश्यांच्या बाबतीत पारंपरिक अस्पृश्यता पाळली जाते असेच दिसते.

अस्पृश्यतेमुळे कनिष्ठ अस्पृश्य जातींचे जीवन असह्य बनले. त्यांना तत्कालीन समाजव्यवस्थेत हीन दर्जा मिळाला.

भारत देश स्वतंत्र होऊन अर्धशतक लोटले तरी अस्पृश्यता अजूनही अस्तित्वात आहे असे चित्र दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्याचा ठराव १९७८ मध्ये विधिमंडळात पास केला. त्यावेळी या ठरावाच्या निषेधार्थ स्पृशांनी अनेक ठिकाणी दलित वस्तीवर हल्ले केले. त्यांची घरे जाळली व त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला होता.

मराठवाड्यातील उस्मानाबाद तालुक्यातील सारोळा या गावातील सवर्णांनी एक महिना दलितांवर बहिष्कार टाकला होता. तसेच नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील कोंढा या गावी १९८८ पासून मिळालेल्या गायरान जमिनीवर पीक घेत असल्यामुळे १९९६ मध्ये सहा दलितांना मारहाण करून त्यांच्या शेतातील उभी पिके कापून टाकली, त्यांची घरे पेटवून दिली व त्यांचे संसार उद्ध्वस्त केले.

दिनांक २४/४/२००२ रोजी लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील नदीहत्तरगा येथील सार्वजनिक ठिकाणी दलितांना पाणी भरण्यास मनाई करून मारहान करण्यात आली.

वरील उदाहरणांवरून आजही अस्पृश्यता अस्तित्वात असलेली दिसून येते. कायद्याने अस्पृश्यता नष्ट झालेली असली तरी सवर्णांच्या मनातून अस्पृश्यता नष्ट झाल्याशिवाय ती संपणार नाही असे म्हणावे लागेल.

अनेक शतकापासून अस्पृश्यांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठेपासून वंचित रहावे लागले आहे या वंचिततेतूनच दलित चळवळीचा उगम झाला.

दलित चळवळ :

दलित चळवळीचे धागेदोरे हे भारतातील भूतकाळातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेशी निगडित आढळतात. या चळवळीतून उच्चवर्णीयांच्या अमानुष छळास छेद देण्याचा संदेश दारोदारी पोहोचविण्याची भरीव कामगिरी दलित चळवळीच्या प्रणेत्यांनी केलेली दिसते. महाराष्ट्रातील दलित चळवळीचे प्रमुख सूत्रधार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ठरत असले तरी त्यांच्यापूर्वी काहींनी सुरू केलेली चळवळ दुर्लक्षिता येण्यासारखी नाही. म्हणून दलित चळवळीचे तीन टप्प्यात वर्गीकरण करता येते.

१) आंबेडकरपूर्व दलित चळवळ.
२) आंबेडकरकालीन दलित चळवळ.
३) आंबेडकरानंतरची दलित चळवळ.

१) आंबेडकरपूर्व दलित चळवळ :

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात अनेक सामाजिक चळवळी झाल्या; पण त्या सर्व उच्च जातीतील काही प्रश्नांशी निगडित होत्या. भारतातील दलित चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात महात्मा ज्योतीबा फुले यांनी केली. त्यांनी पुण्यात १८५१ साली महारमांगांच्या मुलांसाठी शाळा काढून अस्पृश्यांच्या मुला-मुलींना शिक्षणाची दारे खुली करून समाजात क्रांतीचे बीजारोपण केले. त्यानंतर १८५६ साली धारवाड येथे एका महार मुलाला शाळेत प्रवेश नाकारण्यात आला तेव्हा त्याच्या पालकाने न्याय मिळवण्यासाठी मुंबई शिक्षण विभाग, कोलकात्यातील मध्यवर्ती ब्रिटिश अधिकारी यांच्याकडे दाद मागितली. ही घटना अस्पृश्यांच्या चळवळीतील महत्त्वाची घटना म्हणावी लागेल; परंतु ही घटना वैयक्तिक होती.

समाजासाठी कार्य करण्याची सुरुवात कोकणातील गोपाळनाक विठ्ठलनाक वलंगकर या निवृत्त हवालदाराने केली. त्यांनी अस्पृश्यांच्या जागृतीचे फार मोठे कार्य केले. त्यांनी 'अनार्य दोष परिहार मंडळी' ही संस्था स्थापन केली व त्याद्वारे दलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला.

"१८९०-९१ पासून महार फलटणीवर बंदी घालण्यात आली होती ती उठविण्यात यावी व तिचे पुनर्गठन करण्यात यावे म्हणून १८९४ मध्ये ब्रिटिश शासनास त्यांनी विनंती केली. तसेच त्यांनी १८९५ मध्ये पुणे येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात महारांसाठी विविध सवलतींची मागणी केली. 'विटाळ विध्वंसका' मार्फत त्यांनी अस्पृश्योधाराचे आटोकाट प्रयत्न केले." [४२]

गोपाळबाबा हे कीर्तन करून अस्पृश्य लोकांवर हिंदूंनी कशी बंधने घातली याचे विवेचन करीत. त्यांच्या 'विटाळ विध्वंसक' या पुस्तकात त्यांनी आपल्यावर कसा अन्याय होतो हे सांगून जातीचे राज्य कसे चालत आहे, आपल्याला माणूस म्हणून स्थान नाही या जाणिवेणे देशातंराची इच्छा व्यक्त केली आहे. तसेच त्याकाळच्या दीनबंधू, सुधारक या पत्रात सामाजिक

व धार्मिक प्रश्नांबरोबरच आत्मकर्तव्याची जाणीव करून देणारे विपुल लेखन केले आहे.

त्यांच्या कार्यावरून दलित चळवळीचे अभ्यासक रावसाहेब कसबे यांनी,

"गोपाळबाबा हे अस्पृश्यातील सामाजिक चळवळीचे पहिले समाजसुधारक, समाजचिंतक, पहिले पत्रकार म्हणून त्यांना मानाचा मुजरा करावा लागतो" असे गौरवोद्गार काढले." [४३]

पुण्यातील शिवबा जानबा कांबळे यांनीही अस्पृश्य समाजात जागृतीची चळवळ चालविली होती. त्यांनी, १९०४ मध्ये पुणे येथे 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशी हितचिंतक मित्र समाज' ही संस्था स्थापन केली व 'श्री सच्चीदानंद' वाचनगृह उघडले. १९०८ साली त्यांनी 'सोमवंशी मित्र' हे पत्र काढून समाज जागृतीपर लेखन केले. 'सोमवंशी मित्र' हे दलितांचे पहिले पत्र होय. त्यांनी समाजात असलेल्या देवदासी आणि पोतराज या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. गावोगाव सभा घेऊन त्यांनी अस्पृश्यांना समानतेसाठी लढण्याची आणि सरकारात व सैन्यात अस्पृश्यांचा शिरकाव झाला पाहिजे यासाठी अथक प्रयत्न केले.

अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी ते संघटना स्थापन करून परिषदांचे अयोजन करत व त्यातून अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपायोजनांचा आराखडा तयार करून सरकारकडे पाठवीत. अस्पृश्यांना सरकारी नोकरीत संधी द्यावी ही त्यांची प्रमुख मागणी होती. १९२९ च्या पुण्यातील पर्वती सत्याग्रह मोहिमेतही ते आघाडीवर होते.

"त्यांच्या कार्याची दखल घेऊन बडोद्याचे महाराज श्री सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना बडोद्यास बोलावून अस्पृश्यात जागृती करण्याच्या त्यांच्या कार्याचे कौतुक केले." [४४]

अस्पृश्यात जागृती करण्याचा प्रयत्न करणारी आणखी एक व्यक्ती म्हणजे किसन भागुजी बंदसोडे (१८७९ ते १९४६) यांनी १ ऑक्टोबर १९०३ रोजी (१ ऑक्टोबर १९०१ विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, पृ.२२) 'सन्मार्ग बोधक निराश्रित समाज' या संस्थेची स्थापना केली. अज्ञान निर्मूलन व अस्पृश्यता निवारण हे या संस्थेचे प्रमुख कार्य होते. त्यांनी मोहप्पा या त्यांच्या गावी वाचनालय सुरू केले. तसेच अस्पृश्यांना उद्योगप्रवण करण्यासाठी उद्योगशाळा सुरू करून हातमागावर लुगडी, धोतर, कापड तयार करण्यासाठी प्रवृत्त केले. विविध सभा आयोजित करून समाजप्रबोधनाचे कार्य केले. तसेच अस्पृश्यातील आत्मसन्मान जागृत करण्यासाठी ते घरोघर फिरले. स्वत:चा छापखाना काढून अस्पृश्यात जागृती करण्यासाठी

पुस्तिका, पत्रके छापायचा उद्योग त्यांनी केला. १९१२ साली 'निराश्रित हिंद नागरिक' नावाचे वृत्तपत्र त्यांनी काढले. १९१३ साली कालिचरण नंदागवळी व किसन फागुजी बंदसोडे यांनी संयुक्तरीत्या 'विटाळ विध्वंसक' हे पत्र काढले.

"किसन फागुजी बंदसोडे यांनी आपल्या पत्नी तुळसाबाई यांनाही सामाजिक कार्यात आणले होते. १९१३ साली महार समाजाच्या कार्यकारी मंडळाच्या त्या पहिल्या महिला सदस्य होत्या." [४५]

किसन फागुजी बंदसोडे यांनी १९१९ मध्ये त्यांच्या मोहपा गावी 'अंत्यज समाज' ही संघटना स्थापन करून सोमवंशी हितचिंतक समाजाच्या विचारपरंपरेचा प्रसार केला. निराश्रित हिंद नागरिक, विटाळ विध्वंसक, मजूर पत्रिका, चोखामेळा, केसरी, काळ, ज्ञानप्रकाश, दैनिक महाराष्ट्र इत्यादी वृत्तपत्रे व नियतकालिकांमध्ये विपुल लेखन करून व विचार व्यक्त करून अस्पृश्यांच्या प्रबोधनाचे कार्य केले. मजूर वर्गात जागृती करण्यासाठी त्यांनी १९१८ ते १९२२ या काळात 'मजूर पत्रिका' चालविली व नागपूरच्या एम्प्रेस मिलमध्ये कामगारांचा संप घडवून मिलमधील कामगारांच्या हितसंबंधाची जपवणूक केली.

त्यांनी समाजप्रबोधन करण्यासाठी तमाशा (लोकनाट्य) तसेच 'संत चोखामेळा' नावाचे नाटक लिहिले. त्यांनी संत चोखामेळा यांचे जीवनचरित्र लिहून त्यांच्या छापखान्यात १९४१ ला छापले.

किसन फागुजी बंदसोडे बरोबर सामाजिक चळवळीत भाग घेताना गोंदियाचे बाबा कालीचरन नंदागवळी व अमरावतीचे गणेश अक्काजी गवई हे दिसतात.

"त्याच कालखंडात विदर्भात अस्तित्वात आलेल्या महार सभेचेमहत्व लक्षात घेणे आवश्यक ठरते. १८-१२-१९१२ रोजी झालेल्या महार सभेच्या खास सभेत 'महार सभा नागपूर' या संस्थेची अधिकृत स्थापना करण्यात आली. या सभेत संस्थापक अध्यक्ष विठोबा रावजी हे उपस्थित होते. विठोबा रावजी हे सतत समाजजागृती करत फिरत असत. महार समाजात संघटना करणे व महारांची कामे युरोपीय अधिकारी व ख्रिस्ती मिशनरी यांच्याकडून करवून घेणे अशा प्रकारचे त्यांचे कार्य होते. १८-१२-१९१२ रोजी स्थापन झालेली महार सभेची कार्यकारिणी कमिटी एक अध्यक्ष, अकरा उपाध्यक्ष, एक सेक्रेटरी व ४६ सभासदांची होती.

नंतरच्या काळात किसन फागुजी बंदसोडे, गणेश अक्काजी गवई, कालीचरण नंदागवळी, शिवराम जानबा कांबळे, धूंडिराज नारायण गायकवाड (मुंबई), धरमदास (नाशिक), बापूजी पंडे चोखामेळा पुजारी (पंढरपूर) इ. मंडळी महार सभेच्या कार्यकारिणीवर होती." [४६]

यावरून एकूणच महाराष्ट्रभर सुरू असलेल्या अस्पृश्यांच्या सामाजिक चळवळींचा एकमेकांशी निकटचा संबंध असलेला दिसून येतो.

१९१४ नंतर दलित चळवळीत सहभागी झालेल्या विठोबा रावजी, भटकर, खापर्डे, गोडघाटे, सवाईतुल, कोटांगळे, एल. एन. हरदास, रेवारामजी कवाडे, इत्यादी कार्यकर्त्यांचा उल्लेख दलित चळवळीत महत्वाचा ठरतो.

आंबेडकरपूर्व काळातील दलित चळवळीत वरील सर्व समाजकार्यकर्त्यांनी अस्पृश्यांमध्ये आत्मसन्मान जागृत करण्याचा, अस्पृश्यांना शिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहित करण्याचा, अस्पृश्यातील पोटजातींना एकत्र बांधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

दलितांमधील शैक्षणिक वाटचाल :

अस्पृश्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य महात्मा ज्योतीबा फुले यांनी केलेले असले तरी अस्पृश्यांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा काढण्याचा प्रयत्न १९ व्या शतकातच सुरू केलेला दिसतो.

"१८७० च्या सुरुवातीस चंद्रपूर येथे अस्पृश्य समाजातील लोकांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा काढण्याचा प्रयत्न केला होता. १८८४ मध्ये अकोला येथे जानुजी खंडारे यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह उघडले होते. १८९० मध्ये नागपूर येथे महारांसाठी एक स्वतंत्र शाळा सुरू झाली होती."[४७]

"किसन फागुजी बंदसोडे यांनी १९०७ साली मुलींच्या शिक्षणासाठी शाळा स्थापण केली व मुलांच्या शिक्षणाकरिता वसतिगृह सुरु केले. कालीचरण नंदागवळी यांनीही १९०९ साली गोंदिया येथे शाळा सुरू केली."[४८]

अशाप्रकारे अस्पृश्यांचा शैक्षणिक विकास होण्याकरिता अस्पृश्य समाजातील काही कार्यकर्त्यांनी शाळा व वसतिगृह स्थापन करून अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाला हातभार लावला.

२. आंबेडकरांच्या काळातील दलित चळवळ :

महाराष्ट्रातील दलित चळवळीचा महत्त्वाचा टप्पा आंबेडकरांच्या काळातील असला तरी त्यांच्याआगोदर सुरू झालेल्या समाजकार्यामुळे समाजात जागृती झाली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे प्रामुख्याने तीन टप्पे करता येतात.

१) पहिल्या टप्प्यात त्यांनी १९२४ ते १९३० च्यादरम्यान सामाजिक सुधारणा, जातीयता व अस्पृश्यतेविरुध्द लढा या गोष्टींना महत्त्व दिले.

२) १९३० पासून राजकीय सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. त्यात सामाजिक, आर्थिक घटकांबरोबरच शिक्षणाला महत्त्व दिले.

३) तिसऱ्या टप्प्यात बुध्द धम्माचा स्वीकार करून अस्पृश्यांना हिंदू धर्माच्या जोखडातून मुक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात दिनांक १९-२० मार्च १९२७ च्यादरम्यान महाड येथे भरलेल्या बहिष्कृत परिषदेपासून झाली. या परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. या सभेतच महाड येथील चवदार तळ्याचे पाणी प्राशन करण्याच्या दलितांच्या हक्काची अंमलबजावणी करण्याचा ठराव झाला व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली त्याच दिवशी चवदार तळ्यातील पाणी प्राशन करून अस्पृश्यांनी आपला मानवी हक्क बजावला.

त्यामुळे चिडलेल्या सवर्णांनी अस्पृश्यांना मारहाण केली. तळे विंटाळले या भावनेने तळ्याचे शुध्दिकरण करण्यात आले व परिषदेच्या कार्यकर्त्यांवर खटले भरण्यात आले. अस्पृश्यांना झालेल्या मारहाणीचे वृत त्याकाळातील केसरी, चाबुकस्वार, भाला, कुलाबा समाचार इत्यादी वृत्तपत्रांनी उलटसुलट छापले. या सर्व वृत्तपत्रांशी वाड्युध्द करण्यासाठी व

सामाजिक जागृतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' पाक्षिक पुन्हा सुरू केले व सामाजिक समतेची लढाई गतिमान केली.

पुन्हा दिनांक २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे परिषद घेण्यात आली. या परिषदेची तुलना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फ्रान्समधील व्हर्साय येथे ५ मे १७८९ रोजी भरलेल्या परिषदेशी करून, 'आपल्याला फक्त सामाजिक व धार्मिक संघटना कशा होईल याचा विचार करावयाचा आहे. बेटीबंदीपासून ते भेटीबंदीपर्यंत वर्णाश्रम धर्माच्या चौकटीचे खिळे उडवून हिंदू समाजाचा एक वर्ण केला पाहिजे. याशिवाय अस्पृश्यता जाणार नाही व समताही प्रस्थापित होणार नाही.' असे उद्‌गार काढले.

या परिषदेने जन्मसिध्द मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिध्द केला. त्या जाहीरनाम्याच्या १७ व्या कलमातील पहिलेच कलम होते की, 'सर्व माणसे समान दर्जाची राहतील.' तसेच चार ठराव स्वीकृत करण्यात आले. त्यातील दुसरा ठराव 'मनुस्मृती दहनाचा' श्री. गंगाधर नीळकंठ तथा बापूसाहेब सहस्त्रबुध्दे यांनी मांडला व त्याला पा. ना. राजभोज व श्री. थोरात यांनी अनुमोदन दिले. सदरहू ग्रंथ 'धर्मग्रंथ' या पवित्र नावास शोभण्यास अपात्र आहे व ते मत व्यक्त करण्यासाठी व असल्या लोकविग्रही व माणुसकीचा उच्छेद माडंणाऱ्या धर्मग्रंथाचा ही परिषद दहनविधी करीत आहे. या ठरावाची अंमलबजावणी सभेतच झाली. मनुस्मृती दहन हा समतेच्या लढ्यातील ऐतिहासिक क्षण होय.

मनुस्मृती दहनानंतर सत्याग्रहाने माणुसकीचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी पर्वती देवालय प्रवेश सत्याग्रह करण्याचे ठरले.

"अस्पृश्यांना देवळे खुली करा ही मागणी सुरुवातीला २ नोव्हेंबर १९२७ रोजी पुणे येथे हिंदू धर्माच्या मंडळात श्री. पा.ना. राजभोज यांनी आपल्या भाषणात केली. पर्वतीवरील देवळात सत्याग्रह करून प्रवेश करण्याची मोहीम ९ ऑक्टोबर १९२९ रोजी सुरू झाली. सत्याग्रहाच्या पहिल्या तुकडीत न. वी. गाडगीळ, भुस्कुटे, राजभोज, कदम, लांडगे, घाडगे इत्यादी सत्याग्रही होते. ते महाद्वारापर्यंत पोहचले; पण ट्रस्टींनी मंदिरास आतून कुलूप लावले. त्यांना मारहाण करण्यात आली. पोलिसांनी मध्ये पडून दंगल नियंत्रणात आणली." [४९]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रहास पाठिंबा देताना म्हटले,

" देवदर्शनासारख्या साध्या गोष्टीही स्पृश्य बांधवांनी अस्पृश्य बांधवास नाकाराव्या यासारखी लाजिरवाणी दुसरी गोष्ट नाही." [५०]

मंदिर प्रवेश सत्याग्रहात नाशिकच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

"२ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरले. या सत्याग्रहात केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर कर्नाटक, गुजरातमधून अस्पृश्य जनतेचे लोंढेच्या लोंढे नाशिकला आले. १५ हजार सत्याग्रहींचा जमाव तेथे जमला होता. त्यात ५०० स्त्रियांचा सहभाग होता." [५१]

स॰ाग्रह, सभा ही मोहीम सतत सुरू होती. परंतु १९३४ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मंदिर प्रवेशापेक्षा राजकीय व शैक्षणिक कार्यावर दलित वर्गाने आपली शक्ती पणाला लावावी असा सल्ला दिल्यामुळे १९ मार्च १९३४ रोजी येणाऱ्या रामनवमीला सत्याग्रह करायचा नाही असे ठरले व काळाराम मंदिर प्रवेशासाठी चाललेली चळवळ मागे घेण्यात आली.

१३ ऑक्टोबर १९३४ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे भरलेल्या मुंबई इलाखा दलित परिषदेत डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराबाबत घोषणा केला की, 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' त्याबाबत महात्मा गांधी, राजेंद्र प्रसाद, बॅ. सावरकर यांनी आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा विचार सोडून द्यावा. आणखी काही काळ थांबावे अशी जाहीर प्रतिक्रिया व्यक्त करून सुचविले. तसेच धर्मांतर करणे ही कल्पना एम.सी. राजा, देवरूखकर, नारायणराव काजरोळकर, डॉ. सोळंखी, रावबहादूर, श्रीनिवासन, बापूसाहेब राजभोज या अस्पृश्यांच्या अन्य नेत्यांनाही मान्य नव्हती.

महाडचा चवदार तळे सत्याग्रह व काळाराम मंदिर सत्याग्रह या काळातील अनुभवावरून डॉ. आंबेडकरांनी राजकीय गोष्टीकडे लक्ष दिले. १५ ऑगस्ट १९३६ रोजी डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' (Independent Labour Party) स्थापन केली व त्या पक्षाची उद्दिष्टे व कार्यक्रमही जाहीर केला. केवळ अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या श्रमजीवी लोकांचेच नव्हे तर सर्वच मजुरांचे हित साधण्यासाठी व त्यांचे कल्याण करण्याकरिता स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करून पक्षाची घटना, ध्येय ठरविले होते.

"१९३५ च्या कायद्यानुसार मुंबई विधानमंडळ द्विगृही बनले होते. मुंबई विधान परिषदेतील सदस्य संख्या ३० असली तर विधानसभेत १७५ सदस्य असतील अशी तरतूद करण्यात आली होती. १७५ जागांपैकी ११५ सर्वसाधारण जागा होत्या तर मुसलमान, ॲंग्लोइंडियन, युरोपियन, भारतीय ख्रिश्चन, स्त्रिया , जमीनदार, व्यापारी, उद्योगपती, मजूर यांच्यासाठी ६०जागा राखीव होत्या. ११५ पैकी १५ जागा अस्पृश्यांसाठी राखीव होत्या."[५२]

सप्टेबर १९३६ मध्ये मध्यप्रांत वऱ्हाडातही डॉ. आंबेडकरांच्या अनुमतीने स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्यात आली. या प्रांतात अस्पृश्यांची संख्या जास्त असल्याने त्यांच्यासाठी २० जागा राखीव होत्या.

"फेब्रुवारी १९३७ मध्ये झालेल्या निवडणुका निकालात मुंबई इलाख्यातील १५ राखीव जागांपैकी ११ जागा स्वतंत्र मजूर पक्षाने जिंकल्या. मध्य प्रांतात फक्त ५ जागा स्वतंत्र मजूर पक्षाला जिंकता आल्या. सर्व प्रांतात काँग्रेस पक्ष विजयी झाला; परंतु मंत्रिमंडळ स्थापण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे कूपर-जमनादास मेहता यांचे मंत्रिमंडळ बनले."[५३]

"१७ सप्टेंबर १९३७ रोजी डॉ. आंबेडकरांनी महारवतनासंबंधीचे विधेयक व खोती पद्धती नष्ट करण्याचे विधेयक मुंबई विधानसभेत सादर केले."[५४]

१ जानेवारी १९३८ रोजी मुंबईत स्वतंत्र मजूर पक्षातर्फे वीस हजार शेतकऱ्यांचा मोर्चा आझाद मैदानावरून काढण्यात आला. मोर्चाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कॉंग्रेस मंत्रिमंडळात शेतकऱ्यांच्या चार मूलभूत मागण्या व तेरा तातडीच्या मागण्या सादर केल्या.

"दिनांक १२ व १३ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाड येथे जी.आय.पी. रेल्वेवरील अस्पृश्य कामगारांची परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली होती. या सभेतील भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्रजीत लिहून छापले. हेतू हा की, भाषणाच्या प्रती सरकारी अधिकारी, रेल्वेमंत्री व गव्हर्नर जनरल यांच्याकडे पाठविता याव्यात. म्हणजे त्यांना अस्पृश्य नोकरांची काय परिस्थिती आहे याबद्दलची कल्पना यावी व सदर बाबतीत सुधारणा करावी. सदर भाषणाचा सारांश डॉ. आंबेडकरांनी श्रोत्यांना मराठीतून सांगितला." [५५]

स्वतंत्र मजूर पक्षाने मध्यप्रांत व वऱ्हाडातील विडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठीही प्रयत्न केले.

१९३६ ते १९४२ पर्यंत स्वतंत्र मजूर पक्षाच्या निशाणाखाली पक्षनेते या नात्याने डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. शेतकरी, कामगार यांचे प्रश्न, त्यांचे हक्क यासाठी विधिमंडळात व विधिमंडळाबाहेर सतत लढा दिला आणि आक्रमक भूमिका घेतली. अस्पृश्य, कामगार, शेतकरी यांना संघटित करण्यासाठी परिषदा, मेळावे, सभा घेतल्या व जनमत जागृत केले.

आपल्या चळवळीला व्यापक अधिष्ठान लाभावे व सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा सर्वांगीन ती चळवळ समाजपरिवर्तनाच्या दिशेन प्रगत व्हावी असे आंबेडकराना वाटत होते.

३० मार्च १९४२ रोजी अस्पृश्य पुढाऱ्यांची दिल्लीत बैठक झाली व भारतीय अस्पृश्यांनी एकाच निशाणाखाली काम करावे असे ठरले. त्याकरिता अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना करण्यात आली.

१८ ते २० जुलै १९४२ रोजी अखिल भारतीय परिषदेचे अधिवेशन नागपूर येथे एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले. या अधिवेशनात विविध ठराव पास करण्यात आले. पाचवा ठराव अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना करण्याबद्दलचा होता. त्यात म्हटले होते की, दलित वर्गाची राजकीय चळवळ चालविण्याकरीता मध्यवर्ती राजकीय असण्याच्या हेतूने ही परिषद अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन स्थापन करण्याचा निर्णय घेते आणि दलित वर्गाच्या सर्व स्थानिक राजकीय संस्थांनी या मध्यवर्ती संघटनेत विलीन व्हावे व याच माध्यमातून कार्य करावे असे त्यांना आवाहन करते.

याचदरम्यान 'अखिल भारतीय महिला परिषद' नागपूर येथे भरविण्यात आली. परिषदेला वीस -पंचवीस हजारांपेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या. डॉ. आंबेडकरांनी दलित महिलांना जो उपदेश केला तो अत्यंत महत्त्वपूर्ण असा आहे. त्याच कालखंडात 'समता सैनिक दलाचे' पहिले अधिवेशन नागपूर येथे घेण्यात आले. या परिषदेलाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शन केले. अशा प्रकारे नागपूर येथे एकदाच तीन परिषदा पार पडल्या.

२ जानेवारी १९४३ रोजी मध्यप्रांत वऱ्हाड शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. अध्यक्ष म्हणून श्री. जी. टी. मेश्राम यांची निवड करण्यात आली.

२६ जानेवारी १९४४ रोजी कानपूर येथे शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अधिवेशन झाले.

२३/९/१९४४ रोजी मद्रास येथे शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत १२ ठराव कार्यकारिणीने मंजूर केले होते. त्यात अस्पृश्यांचे राजकीय अस्तित्व मान्य करणे, भारतीय घटनेला अस्पृश्य वर्गाची संमती पाहिजे, अस्पृश्यांसाठी स्वतंत्र वसाहती असाव्यात, अस्पृश्य वर्गाची शिक्षणाची सोय उदारपणे करून प्रांतिक व मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकात निश्चित रक्कम असावी, जातीय प्रतिनिधींसमोर जातीसंबंधीच्या प्रश्नांची चर्चा करावी, सर्व अल्पसंख्याकांना समान वागणूक द्यावी, मुस्लिम समाजाप्रमाणे अस्पृश्य वर्गाला प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळात स्थान द्यावे, स्वतंत्र मतदारसंघ द्यावा, सरकारी नोकरीत लोकसंख्येच्या प्रमाणात जागा द्याव्यात असे ठराव होते. हे ठराव वारंवार केले जात व त्यासाठी अनेक पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोलत असत.

आपल्या मागण्यांसाठी फेडरेशनने सार्वत्रिक सत्याग्रहाची मोहीम सुरू केली. सत्याग्रहात हजारो अनुयायांनी भाग घेतला. त्यामुळे अस्पृश्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगता आली.

"६ मे १९४५ रोजी शेड्युल्ड कास्ट फेडरशनच्या मुंबई येथील अधिवेशनात केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी त्यांना सोसाव्या लागणाऱ्या अडचणी व समाजातील वस्तुस्थिती याविषयी ऊपापोह केला." [५६]

१९४६ च्या प्रारंभी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. काँग्रेसने अस्पृश्यांसाठी राखून ठेवलेल्या जागांवर आपले उमेदवार उभे केले होते; शेड्युल्ड कास्ट फेडरेशननेही आपले उमेदवार उभे केले होते; पण ते सर्व पडले. १९४६ च्या निवडणुका जिंकल्यावर काँग्रेसने आपली प्रांतिक सरकारे एप्रिलमध्ये चालू केली. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा जाहीर स्फोट करण्याचा निर्णय बाबासाहेबांनी घेतला. कायदेमंडळाच्या बैठकी सुरू होतील तेव्हा अस्पृश्यांनी त्या मंडळासमोर सत्याग्रह सुरू करावा असे ठरविण्यात आले. १५/७/१९४६ ला पुण्यातील बैठकीवर मोर्चा नेऊन सत्याग्रह करण्याची चळवळ फेडरेशनने हाती घेतली. या चळवळीत भाग घेण्यासाठी मुंबई प्रांतातून अनेक लोक आपल्या स्वखर्चाने जेवणासाठी शिधासामुग्री घेऊन आले. हा सत्याग्रह आठ दिवस चालला.

"पुण्याप्रमाणेच मध्यप्रांत वऱ्हाडात नागपूर येथे, उत्तर प्रदेशात कानपूर येथे विधानमंडळांसमोर सत्याग्रह करण्यात आले. त्यात हजारो स्त्री-पुरुषांनी भाग घेऊन स्वत:ला अटक करवून घेऊन तुरुंगवास पत्करला." [५७]

"१९४० ते १९४६ या काळात क्रिप्स मिशन, कॅबिनेट मिशन, भुलाभाई लियाकत करार, वेव्हेल योजना इत्यादी अनेक राजकीय तोडगे सर्वमान्य करण्याचे प्रयत्न झाले. काँग्रेस, लीग आदी विविध पक्ष यांची रस्सीखेच चालू होती. पण यामुळे अस्पृश्यांचे हक्क व मागण्या डावलल्या जात आहेत म्हणून बाबासाहेब ब्रिटिश मुत्सद्यांशी, हिंदी नेत्यांशी बोलणी करत होते. सभा - परिषदांतून भाषणे करीत होते. एवढे जीवाचे रान करूनही अस्पृश्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत." [५८]

२९ ऑगस्ट रोजी मसुदा समितीची प्रमुख जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली. त्यामुळे घटनेचा मसुदा तयार करण्याचे, घटना समितीत चाललेल्या चर्चांना समर्पक उत्तरे देण्याचे, प्रत्येक कलमवार चर्चेला योग्य दिशा देण्याचे आणि आलेल्या दुरुस्त्यांचा विचार करून घटनेला अंतिम रूप देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व जीव ओतून केले.

४ नोव्हेंबर १९४८ रोजी सभागृहाबाहेर मसुदा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले,

"मसुदा समितीने 'सार्वभौम लोकशाही लोकसत्ताक राज्य' ही संकल्पना मान्य केली. सत्तेवर कोणत्या पक्षाने यावे हे भारतीय मतदारांनी ठरविले तरच घटना लोकशाहीच्या कसोटीस उतरेल." [५९]

घटना समिती असो अथवा घटना समितीबाहेर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीसंबधी मूलभूत विचार मांडले आहेत. 'एक माणूस एक मूल्य' या लोकशाहीच्या चिरंतन तत्त्वाचा त्यांनी आग्रह धरला होता. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे अशी घटनेत तरतूद केली. दलित जातीजमातींना राखीव जागा व सोयीसवलती देऊन समतेच्या लढ्यात आणले तसेच हिंदू समाज एकाच पातळीवर आणण्यासाठी 'हिंदू कोड बिल' तयार केले.

"'हिंदू कोड बिल' हे परिवर्तनासाठी टाकलेले पहिले पाऊल होते. बिलाचा मसुदा तयार झाल्यानंतर लोकसभेसमोर मांडण्याची परवानगी १२ ऑगस्ट १९४८ रोजी जवाहरलाल नेहरू व इतर पुढाऱ्यांनी दिली. पण जीर्णमतवादी सनातन्यांनी या बिलाविरुध्द जाहीर चळवळ सुरू केली. सदर विरोधकांना आंबेडकरांनी जाहीर सभांतून व खाजगी चर्चेतूनही उत्तरे दिली तरी ही विरोधकांनी वेगवेगळ्या हेतूंनी विधेयकाला विरोध केला." [६०]

"हिंदू कोड बिल पास झाले तर आपण राजीनामा देऊ असे शस्त्र राजेंद्रबाबूंनी उचलले. त्यांच्यापुढे पंडित नेहरूही हिंदू कोड बिलाबाबत गप्प राहिले. शेवटी हे बिल २६ सप्टेंबर १९५१ ला स्थगित झाले. हे सहन न होऊन आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला." [६१]

"१३ मे १९५२ च्या राज्यसभेच्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सदस्य म्हणून शपथविधी झाला आणि प्रिव्हिलेज कमिटीत त्यांची निवड झाली. १४ मे १९५२ ते डिसेंबर १९५६ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सात वेळा भाषणे केली. या कालखंडात गृहमंत्री डॉ. काटजू यांनी आंध्र प्रदेश निर्मिती बिल २ सप्टेंबर १९५३, अनटचेब्लिटी बिल १२ सप्टेंबर १९५४ ला मांडले. २ सप्टेंबर १९५४ ला राज्यसभेत अनुसूचित जाती, जमातीविषयक आयोगाचा अहवाल चर्चेला आला. त्यात डॉ. आंबेडकरांनी अनेक सूचना केल्या." [६२]

डॉ. आंबेडकरांचे मन राजकारणापासून उडत गेले. दलित जाती - जमातींना माणूस म्हणून सन्मानाने जगता यावे म्हणून नवी मूल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण केली पाहिजे आणि त्यासाठी महात्मा गौतम बुध्दाचे तत्त्वज्ञान स्वीकारले पाहिजे असे त्यांनी ठरविले व १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे विराट जनसमुदायाबरोबर आपल्या पत्नीसह बौध्द धम्माची दीक्षा ग्रहण केली. त्यावेळी केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले,

"मी आज माझ्या जुन्या धर्माचा त्याग करून पुन्हा जन्म घेत आहे. मी यापुढे समतेचा प्रचार करण्याठी आयुष्य वेचेन." [६३]

डॉ. आंबेडकरांनी पीपल्स 'एज्यूकेशन सोसायटी' या नावाची शिक्षण संस्था १९४६ साली स्थापन करून त्याअंतर्गत मुंबई व औरंगाबाद येथे महाविद्यालये काढून अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी काही वृत्तपत्रे काढली होती. त्यात मूकनायक, जनता, बहिष्कृत भारत, समता, प्रबुध्द भारत ही महत्त्वाची आहेत. या वृत्तपत्रांतून डॉ. आंबेडकरांनी स्वत: लेखन करून पक्षाची बाजू, अस्पृश्यांची बाजू पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. विरोधकांना धारेवर धरले. तसेच त्यांनी विपुल असे अभ्यासपूर्ण ग्रंथलेखन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमवेत अनेक कार्यकर्ते चळवळीत सहभागी झालेले दिसतात. त्यात बी. श्यामसुंदर, बी. एस. व्यंकटराव, एन. शिवराज, जे. एन. सुबय्या, बी. के. गायकवाड, पी. एन. राजभोज, बी. डी. खोब्रागडे, बी. एस. मोरे, बी. सी. कांबळे, एस. एन. शिवतकर, दत्ता कट्टी, जी. के. मांडे, हरदास आवळे, एन. एच. कुंभारे, व्ही. टी. परमार, पी. टी. बोराळे, डी. टी. रूपवते, शांताबाई दाणी, आर. एस. गवई, आर.आर. भोळे, आर. डी. भंडारे, के. बी. तळवटकर, बी. पी. मौर्य, पी. जे. रत्नम, ए. जी. पवार, दिघे, हरिहरराव सोनुले, बी. एच. वराळे, एम. बी. चिटणीस, शी. एम. अरूमगम आणि इतरांनी चळवळीत महत्त्वाची भूमिका पार पाडलेली दिसून येते.

पुढील भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतरच्या कालखंडातील दलित चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे.

३) डॉ. आंबेडकरांनंतरची दलित चळवळ :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून आर्थिक व राजकीय स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी नागपूर येथेच व्यापक व विशाल तत्त्वज्ञानावर नव्या रिपब्लिकन पक्षाची स्थापना करणार म्हणून घोषणा केली होती. तसेच या पक्षाचा मसुदाही तयार केला होता. त्याप्रमाणे त्यांच्या अनुयायांनी ३ ऑक्टोंबर १९५७ रोजी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून श्री. एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन केला. पक्षाचे अस्तित्व अस्पृश्य समाजापुरते मर्यादित न राहता ते सर्व भारतातील नागरिकास मोकळे ठेवून व्यापक केले.

१९५७ च्या निवडणुकी अगोदर रिपब्लिकन पक्ष संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सामील झाला. मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील सर्व मराठी भाषिकांच्या वेगवेगळ्या राज्यांसाठी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उदयास आली. या चळवळीच्या लढाऊ अवस्थेत महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, पांढरपेशा मध्यमवर्ग, व्यापार, उद्योगातील अत्यल्प असा मराठी धनिक वर्ग या चळवळीत सामील झाला. या आंदोलनात रिपब्लिकन पक्ष त्यांच्या अनुयायांसह उतरला होता.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ यशस्वी झाल्याने सत्ताधारी वर्गाने समितीचा राजकीय आशय आपल्या व्यासपीठावरून मांडायला सुरुवात केली. काही नेत्यांनी आपले पक्षीय नांगर हाकलल्यामुळे समिती फुटली व त्यांनी कष्टकरी जनतेचा विश्वासघात केला. त्याचा परिणाम समितीचा घटक असलेल्या रिपब्लिकन पक्षावर झाला. प्रजासमाजवाद्यांचे नेते नानासाहेब गोरे व रिपब्लिकन नेते अॅड. बी. सी. कांबळे कम्युनिस्टांच्या अरेरावीचे कारण दाखवून समितीबाहेर पडले. दादासाहेब गायकवाडांनी कम्युनिस्टांबरोबर सहकार्य चालूच ठेवले. या प्रश्नावर रिपब्लिकन पक्ष दोन गटात वावरू लागला.

"कॉंग्रेस सत्तेवर आल्यावर कुळ कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, तुकडे जोड कायदा असे अनेक कायदे मुंबई विधानमंडळाने मंजूर केले. पुढे 'कसेल त्याची जमीन' हा कायदा झाला. त्यातूनही काहींनी पळवाटा शोधल्या. या सर्व पार्श्वभूमीवर 'कसेल त्याची जमीन तर नसेल त्याचे काय?' हा प्रश्न घेऊन दादासाहेब गायकवाड पुढे आले. भूमिहीनांमध्ये दलित जातींचा भरणा बहुसंख्य असल्यामुळे रिपब्लिकन पक्षाने हा प्रश्न हाती घेतला आणि दलितांबरोबरच मराठी शेतकरी जातीतील भूमिहीनांसह देशव्यापी लढा उभा केला." [६४]

१९६७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत दादासाहेब गायकवाडांनी कॉंग्रेसशी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यातून पक्षात मतभेद झाले व दलित नेत्यांपैकी काही जण कॉंग्रेसमध्ये सामील झाले.

नेतृत्व, राजकीय कार्यक्रम आणि इतर पक्षांशी करावयाचे सहकार्य या मुद्यांवरून मतभेद होऊन रिपब्लिकन पक्षात फूट पडत गेल्याने रिपब्लिकन पक्षाला अपयश आले असे दिसते.

एका बाजूला आंबेडकरी चळवळीचा वारसा आणि दुसऱ्या बाजूला परिणामकारक

राजकारण करण्यात पक्षाला आलेले अपयश अशा कोंडीत सुशिक्षित दलित तरुण वर्ग सापडला. धर्मत्याग, शिक्षण, राखीव जागा इत्यादी सर्व घडूनही सामाजिक विषमतेचा अनुभव कमी झाला नाही. त्यामुळे राजकारणाइतकीच सांस्कृतिक चौकट बदलणे गरजेचे आहे याची जाणीव झालेल्या तरुण दलितांनी साहित्य निर्मिती करून सांस्कृतिक हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला व यातूनच महाराष्ट्रात दलित साहित्याची चळवळ उदयाला आली.

दलित साहित्य चळवळ :

दलित साहित्यातील आधुनिकतेचा प्रवाह सुरू झाला तो अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात यांच्यापासून त्यांनी त्यांच्या कथा व कादंबऱ्यांमधुन पद्दलितांची दु:खे वस्तुनिष्ठपणे मांडली आहेत.

दुसऱ्या पिढीतील लेखकांच्या लिखाणात आंबेडकरी विचासरणीतून प्राप्त विरोध व बंडखोरी प्रतीत होते. बाबूराव बागुल यांचा 'जेव्हा मी जात चोरली' व 'विद्रोहाच्या कवितां'नी बंडखोरीचा झेंडा फडकविला होता. केशव मेश्राम यांच्या 'हकीगत' आणि 'जटायू' या कथांतून अस्पृश्यांना गावकुसाबाहेर कसे हाकलले जाते ते कळते. बंधुमाधव, ना. र. शेंडे, अविनाश डोळस, योगिराज वाघमारे, सुखराम हिवराळे, पांडुरंग कदम, प्रकाश खरात, अमिताभ, धर्मराज निमकर, अर्जुन डांगळे, दया पवार, भीमराव शीरवाळे हे आणखी काही दलित लघुकथा लेखक होत.

दलित कवींनी त्यांच्या व्यथा कवितेमधूनही व्यक्त केल्या आहेत. त्यामध्ये दया पवार, माधव कोंडविलकर, यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, उमाकांत रणधीर, प्रल्हाद चेंदवणकर, वामन निंबाळकर, नरेश इंगळे, त्र्यंबक सपकाळे, शंकरराव खरात, विजय शिरसाट, नानासाहेब झोडगे, शरणकुमार लिंबाळे यांचा समावेश आहे.

काही प्रमुख नाटककार दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, रामनाथ चव्हाण, प्रभाकर दुपारे, भी. शी. शिंदे, टेक्सास गायकवाड आणि प्रेमानंद गज्वी हे आहेत.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या 'अस्मितादर्श' या त्रैमासिकाने दलित साहित्यिकांना चांगले व्यासपीठ मिळाले. त्यानंतर 'आम्ही' संपादक बाबूराव बागुल व 'विद्रोह' संपादक नामदेव ढसाळ या मासिकांमुळे हे व्यासपीठ अधिक प्रगल्भ बनले.

आत्मचरित्रे लिहिणाऱ्या लेखकाने तर दलित साहित्यामध्ये जाणीवांचे नवे दालनच उघडले.

दलितांचे ऐक्य घडवून आणण्यास आणि संघटनातील संपर्क साधन म्हणून दलित साहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

डॉ. पानतावणेंच्या मते,

"दलित साहित्य चळवळीची तीन प्रमुख तत्त्वे आहेत ती म्हणजे विद्रोह, विज्ञाननिष्ठा व विश्वात्मकता. दलितेतरामधील सहानुभूती जागृत करण्यात दलित साहित्य यशस्वी ठरले. मराठी भाषेतच नव्हे तर संपूर्ण भारतीय भाषांमध्ये दलित साहित्याने आपले एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. कारण ते बंडखोरीचे व क्रांतीचे साहित्य आहे." [६५]

दलित साहित्य हे १९७० च्या दशकाच्या आरंभकाळात दलित समाजाची जी आर्थिक कोंडी झाली होती त्याचीच परिणती होती. दलित पँथर चळवळ जोमात असतानाही अत्यंत प्रभावी साहित्य निर्माण झाले. या साहित्याचा उपयोग दलित जनतेत प्रखर सामाजिक, राजकीय जाणिवा निर्माण करणारे वैचारिक माध्यम म्हणून केला गेला.

एकूणच दलित चळवळीमध्ये साहित्य चळवळीचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे असे दिसून येते. साहित्यातून आपल्यावर झालेला अन्याय, वेदना, दुःख, विद्रोहाला वाचा फोडण्याचा प्रयत्न दलित साहित्यीकांनी केला.

दलित पँथर चळवळ :

"नेत्याच्या बेजबाबदार वर्तनामुळे अनुयायी वाऱ्यावर पडतात या अनुभवातून कार्यकर्ते अस्वस्थ होते. या अस्वस्थेमधूनच 'दलित पँथरचा' उदय झाला." [६६]

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मिळणाऱ्या विषमतेच्या वागणुकीबाबत अनुसूचित जातीमधील शिक्षित वर्ग जागृत झाला होता. आपला स्वतंत्र परिचय प्रस्थापित करण्याचे त्यांचे प्रयत्न चालले होते. घटनेने दिलेल्या आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील समान हक्कांचा ते पुकारा करू लागले. समान मानवी हक्काच्या मागण्यांनी संतप्त झालेल्या सनातन्यांनी दलितांना पारंपरिक खालच्या पातळीवर ठेवण्याचा दडपशाहीचा मार्ग अवलंबिला त्यामुळे दलित व उच्चवर्णीय यांच्यातील दरी वाढली. तसेच पंचायत राज्याच्या प्रयोगातून आणि विकास योजनांच्या राबवणुकीतून जो एक राज्यकर्त्यांचा नवा मग्रूर वर्ग गावोगावी पुढे येत होता त्याला दलितांनी स्वाभिमानी होऊन जगणे नामंजूर होते. पिढ्यान्‌पिढ्या दलितांनी जे दास्य निमूटपणे सहन केले ते तसेच कायम रहावे यासाठी दहशत, दंडेलीचे तंत्र त्या वर्गाने मोठ्या प्रमाणावर सुरू केले. त्यातून दलितांवर बहिष्कार टाकणे, चाबकाने फोडून काढणे, डोळे काढणे, जिभा छाटणे, खून पाडणे वा धिंड काढणे वगैरे प्रकार वाढत्या प्रमाणावर जागोजागी होऊ लागले. दलित स्त्रियांवरील बलात्काराच्या बातम्या वाढू लागल्या. १९७० च्या आसपास हे प्रकार विशेष गंभीर होते. पँथरच्या उदयाचे मुख्य कारण म्हणजे दलितांवरील वाढते अत्याचार होय.

महाराष्ट्रात दलितावर होणाऱ्या अत्याचारात वाढच होत गेली असे दिसते. १९७१ साली प्रसिद्ध झालेल्या इलाया पेरूमल समितीच्या अहवालात नमूद केलेल्या दलितांवरील अत्याचाराच्या घटना अशा होत्या -

"१. सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू देण्यास सक्त मनाई.
२. हॉटेलमध्ये ताटात / प्लेटमध्ये खाद्यपदार्थ देण्यास नकार.
३. नाव्ही व धोबी सेवा स्वीकारण्यास मनाई.
४. पंचायतीच्या बैठकीत दूरवर बसविणे किंवा वेगळी व्यवस्था करणे.
५. झोपडीत कोंडून कुटुंबास जाळणे.
६. नरबळी देणे.
७. दलित स्त्रियांची नग्न करून धिंड काढणे.

८. दलित स्त्रियांवरील बलात्कार.
९. जबरदस्त मारहाण व ठार करण्याची धमकी देणे.
१०.दलितांच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत मानवी विष्ठा, मृत जनावरे इ. घाण टाकणे.
११.उभी पिके नष्ट करणे.
१२.सार्वजनिक बहिष्कार टाकणे.
१३.रस्त्यावरून लग्नाची वरात नेऊ देण्यास बंदी करणे इत्यादी'' [६७]

'राज्यातील साखरसम्राट, मराठा व सवर्णांनी दलित अत्याचारात हिरीरीने भाग घेतला.' [६८]

''जात हा घटक निवडणुकीच्या राजकारणात महत्त्वाचा घटक बनला. नव्यानेच राजकीय व आर्थिक सत्ता प्राप्त झालेल्या आणि सामाजिक ज्येष्ठता अबाधित असलेल्या उच्च जातीमधील वाढती जातीयता आणि दलितांमधील प्राथमिक अधिकाराविषयीची वाढती जाणीव यामुळे या दोन गटात सतत संघर्ष सुरू असत.'' [६९]

''रिपब्लिकन पक्षाला भुमिहीनांसह अनुसूचित जातीतील कुठल्याही दलितांना एकत्र आणण्यात अपयश आले. पुढे या फाटाफूट झालेल्या दलितांचे अनेक गट, उपगट व छावण्या बनल्या. रिपब्लिकन पक्ष हा मते, मागण्या, राखीव जागा आणि सवलती यांच्या दुष्टचक्रात अडकला. पक्षाचे नेते भ्रष्ट आणि नीतिमत्तेची चाड न बाळगणारे झाले.'' [७०]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील असीम श्रध्दा, दलित समाजाविषयीचा अपार जिव्हाळा, सामाजिक विषमतेविरुध्द पेटून उठलेले दलित तरुण यामुळे 'दलित पँथर' ही संघटना थोड्याच काळात नावारूपाला आली. पँथरची बेदरकार भाषणे, गर्दी खेचणाऱ्या सभा, हाणामारी, मोर्चे, पोलिस केसेस यामुळे लोकांचे लक्ष दलित पँथरने खेचून घेतले.

दलित पँथरच्या स्थापनेनंतर पँथरने महाराष्ट्रामध्ये औरंगाबाद, मुंबई, पुणे, नाशिक इत्यादी ठिकाणी लढे उभारून दलित समाजातील विशेषत: तरूण मंडळींना दलित समाजातील प्रश्नांवर जागृत करण्याचा प्रयत्न केला.

मुंबई शहरात अनेक चळवळी उभारल्या. १९७४ च्या महाराष्ट्र लोकसभा निवडणुकीमध्ये पँथरच्या राजकिय पाठिंब्यामुळे विरोधी पक्षाचा उमेदवार काँग्रेसच्या उमेदवाराला हरवून निवडून आला.

औरंगाबादमधील दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाढीसाठीचा प्रश्न पँथरने यशस्वीरीत्या सोडविण्याचा प्रयत्न केला. १९७३-७४ मध्ये शिष्यवृत्तीवाढीसाठी दीड महिना विद्यार्थ्यांचे आंदोलन चालविले होते.

१९७८ साली दिल्लीमध्ये पँथरने मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नावर प्रंचड मोर्चा काढून दिल्लीतील सत्ताधारी जनता पक्षाच्या पुढाऱ्यांना नामांतर प्रश्नाची दखल घेण्यास भाग पाडले. संपूर्ण नामांतर आंदोलनात पँथरने महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे.

दलित पँथर चळवळीचे कार्यकर्ते नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, राजा ढाले, रामदास सोरटे, लतीफ खाटीक, अविनाश महातेकर, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अनिल कांबळे, अरुण काबंळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर, टी. एम. कांबळे या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी दलित पँथर चळवळ वाढविली असे म्हटले जाते; पण पुढे पँथरमध्ये फूट पडत जाऊन *एप्रिल १९७७ पर्यंत*

"१. राजा ढाले - मास मुव्हमेंट

२. अरुण कांबळे - महाराष्ट्र दलित पँथर

३. संगारे / महातेकर गट - दलित पँथर

४. नामदेव ढसाळ गट - दलित पँथर

असे गट पडले. प्रत्येक गटाने नेतेपणाच्या संघर्षामुळे तर कधी वैचारिक भेद झाल्यामुळे चळवळ अधिक फुटली. वैचारिक भूमिकेवरून फूट पडल्यानंतरही भिन्न भिन्न गट काम करीत राहिले." [७१]

१९८२ मध्ये मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई येथे दलित पँथरने पहिली परिषद घेतली. पाठोपाठ ठाणे, धुळे जिल्ह्यांतील विटाई, कोल्हापूर इ. ठिकाणी परिषदा पार पडल्या. नामांतराचा प्रश्न मंडल आयोगाच्या लढ्याशी जोडून नामांतर मंडल आयोग संयुक्त परिषदा पार पडल्या.

१९८२ सालीच मुंबईत बाबासाहेबांच्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात 'सम्यक समाज आंदोलन' स्थापन झाल्याची घोषणा प्रकाश आंबेडकरांनी केली.

सम्यक समाज आंदोलनाने भूमिहीन शेतमजुरांच्या प्रश्नांवर लढे दिले. लॉंगमार्च आयोजित करून साखर कारखान्याच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी केली. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जमीन, पाणी प्रश्नांवर मोठी चळवळ झाली. सरकारी जमीनी भूमिहीनांच्या नावे कराव्यात, पिण्याच्या पाण्याची कायमची सोय, पिकाला संरक्षित सिंचनाची व्यवस्था करणारे पाण्याचे सर्वंकष धोरण आखावे या कार्यक्रमावर ही चळवळ उभी राहिली; परंतु दलितांचे प्रश्न अजूनही सुटले असे दिसत नाही.

जातीव्यवस्थेची सर्वात जास्त तीव्र झळ नेहमीच अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातींना बसत आहे. त्यामुळेच दलित जातींच्या राजकारणात जातीविरोध, आपले सामाजिक स्थान उंचाविण्याचा प्रयत्न आणि उच्च जातींचा प्रतिकार या घटकांचे मध्यवर्ती स्थान असल्याचे दिसते.

दलित पँथरच्या याच काळात देशात व परदेशात इतर चळवळी चालु होत्या.

त्यापुढील प्रमाणे -

१९६७ मधील नक्षलवादी चळवळ :

आर्थिक आणि राजकीय पेचप्रसंग, संसदीय कामकाजाची धिमी व उदासीन गती आणि पीडितांमधील वाढत्या असंतोषाने बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आणि नक्षलवादी संघटनांच्या विद्रोहाचा जन्म झाला. उत्तर बंगाल, बिहार आणि आंध्र प्रदेशातील पीकतोडणी कामगार यांच्यात या संघटनेने मूळ धरले. या संघटनेतील काही सदस्य नंतर दलित पँथरमध्ये सक्रिय कार्यकर्ते बनले.

कर्नाटकातील भीमसेना चळवळ :

दलित नेता श्यामसुंदर यांनी ही चळवळ उभारली. कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यात २९ एप्रिल १९६८ रोजी ही चळवळ सुरू झाली.

भीमसेना चळवळीने स्थानिक आणि परिसरातील गावांतील हिंदूंमध्ये चांगलीच दहशत बसविली. विशेषत: सुशिक्षित जमीनदार तर पार हबकून गेले. 'अस्पृश्यांना काही धोका, इजा झाली. तर हिंसेचे उत्तर हिंसेनेच देण्यात यईल' असा नारा या चळवळीने दिला. श्यामसुंदर यांचे काम इतके प्रभावी आणि जोरदार होते की त्यांनी देशातील सर्व दलित चळवळी भारावल्या, प्रेरित झाल्या. दक्षिण भारतात तर भीमसेनेचा चांगलाच फैलाव झाला. शिवाय महाराष्ट्र,उत्तर प्रदेश, हरियाणा व पंजाबमध्येही ही चळवळ जाऊन पोहोचली. भीमसेनेने महाराष्ट्रातील दलित पँथरच्या उभारणीला सक्रिय पाठिंबा दिला.

अमेरिकेतील ब्लॅक पँथर चळवळ :

अमेरिकेच्या कॅलिफोर्निया प्रांतातील ऑकलंड येथे १९६६ मध्ये ह्यू. पी. न्यूटन आणि बॉबी जी. सील या निग्रो तरुणांनी 'ब्लॅक पँथर' या संघटनेची स्थापना केली. १९६६ ते १९७१ या कालखंडात 'ब्लॅक पँथर' कार्यरत होती. आपल्यावर झालेल्या अन्यायासाठी सत्ता, सपंत्ती आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी गोऱ्या अमेरिकनांच्या विरोधात ही संघटना कार्यरत होती.

अमेरिकेतही निग्रोंना गुलामांप्रमाणे वागविले जात होते. भारतातील अस्पृश्यांना सवर्ण हिंदूंकडून तशाच प्रकारची वागणूक मिळत असे. अमेरिकेतील निग्रो व भारतातील अस्पृश्य यांची स्थिती काही प्रमाणात सारखी दिसते. अमेरिकेतील निग्रोंनी त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी 'ब्लॅक पँथर' संघटना काढली. या संघटनेने त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार केला तसेच साहित्यही निर्माण केले.

तशाच प्रकारे महाराष्ट्रातील दलित पँथर चळवळीचे कार्य दिसते. या चळवळींनीसुद्धा अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. तसेच विद्रोही व स्फोटक साहित्य निर्माण करून निषेधभावना व्यक्त केल्या. महाराष्ट्रातील दलित पँथरचा जन्मच मुळात दलितांवर

होणाऱ्या अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी झाला. दलित पँथरचे कार्य जोमात असताना मुंबईची वरळी दंगल व मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन या दोन घटना महत्त्वाच्या ठरल्या. यातील मराठवाडा विद्यापीठ आंदोलनात देखील दंगली झाल्या. यात सरकारी मालमत्तेच्या नुकसानीबरोबरच दलितांचे जीवन उद्ध्वस्त झाले. त्याविषयीची माहिती पुढे नमूद केलेली आहे; परंतु त्यापुर्वी मराठवाड्यातील शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासने आवश्यक असल्यामुळे त्याचा आढावा इथे घेण्यात आला आहे.

मराठवाड्यातील उच्च शिक्षणाचा विस्तार :

मराठवाडा विभागात शिक्षणाची गंगोत्री आणणारे पहिले विद्यापीठ म्हणजे हैदराबादचे 'उस्मानिया विद्यापीठ'. या विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी हैदराबाद येथे एकच महाविद्यालय होते. हे महाविद्यालय मद्रास विद्यापीठाशी संलग्न होते. १९१८ मध्ये उस्मानिया विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर हैदराबाद येथे पदवीपर्यंत शिक्षण देणारी चार महाविद्यालये काढण्यात आली. तेथे माध्यम उर्दूच होते. पदव्युतर पातळीवर शिक्षणही हैदराबादमध्येच केंद्रित करण्यात आले. त्यामुळे अन्य भाषा बोलणाऱ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होत नसे. त्यामुळे लोकांच्या स्वतंत्र आंदोलनाचा शैक्षणिक प्रश्न हा एक अविभाज्य भागच होता. हैदराबाद सोशल सर्व्हिस लीगच्या वतीने १९१८, १९१९ व १९२० मध्ये तीन सामाजिक परिषदा आयोजित करण्यात आल्या. ज्यामध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण, मातृभाषा माध्यम, स्त्री शिक्षण, उच्च व तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था इ. मागण्या करण्यात आल्या. निजामी राजवटीने त्या झिडकारून टाकल्या.

१९४८ च्या पोलिस कारवाईमुळे मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रात नवे युग अवतरले. औरंगाबाद येथे सुरुवातीस फक्त एक शासकीय महाविद्यालय होते. औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' या संस्थेने १९५० मध्ये कला व विज्ञान या विषयाचे शिक्षण देणारे 'मिलिंद महाविद्यालय' स्थापन केले. त्याच काळात हैदराबाद मुक्ती आंदोलनाचे एक नेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड येथे महाविद्यालय सुरू केले. १९५४ मध्ये औरंगाबाद येथे शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरू झाले. १९५६ मध्ये जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटीने अंबाजोगाई येथे महाविद्यालय सुरू केले. परभणी येथील कृषी शाळेचे महाविद्यालयात रूपांतर करण्यात आले. १९५६ मध्ये औरंगाबाद येथे माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय सुरू झाले. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. याच काळात मराठवाडा विभागासाठी वेगळे विद्यापीठ असावे या मागणीने जोर धरला. या विद्यापीठाविषयी माहितीपुढील प्रमाणे -

मराठवाडा विद्यापीठ :

महाराष्ट्रात मराठवाड्याचे विलीनीकरण होण्यापूर्वी त्या भागातील सर्व महाविद्यालये ही हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाशी संलग्न होती. १९४८ साली मराठवाडा स्वतंत्र झाल्यावर मराठवाड्यातील जनतेला आपल्या अविकसितपणाची जाण आली. त्यातूनच

मराठवाड्यातील शैक्षणिक विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्याकरिता मराठवाड्याला स्वतंत्र विद्यापीठ असावे अशी मागणी पुढे आली. मराठवाड्यातील प्रमुख नागरिक, शिक्षणतज्ज्ञ, प्राचार्य आणि विधिमंडळाचे सदस्य यांनी निरनिराळ्या पध्दतीने या मागणीचा पाठपुरावा केला. जुलै १९५६ मध्ये संसद सदस्य, आमदार, शिक्षणतज्ज्ञ, प्राचार्य आदींचे शिष्टमंडळ हैदराबाद राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांना भेटले. त्याच काळात संयुक्त मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचीही या शिष्टमंडळाने भेट घेतली. शेवटी ९ जानेवारी १९५७ मध्ये मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळाने न्यायमूर्ती पाळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठवाडा विद्यापीठ समिती' स्थापण्याचा निर्णय घेतला. या समितीची स्थापना बॉम्बे सरकारने यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना २७ एप्रिल १९५७ रोजी केली होती. या समितीने मराठवाड्यातील आणि मराठवाड्याबाहेरील १८६ मान्यवरांच्या साक्षी नोंदवून त्यात मराठवाडा विद्यापीठाची भूमिका आणि रचना निश्चित केलेली आहे.

महाराष्ट्रातील ज्या नामांकित शिक्षणतज्ज्ञांनी व साहित्यिकांनी मराठवाड्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ हवे या कल्पनेला पाठिंबा दिला होता त्यात द. वा. पोतदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू जयकर, डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मंगलमूर्ती हे होते.

मराठवाड्यातील पाचही जिल्ह्यांत औरंगाबाद येथे फक्त एक इंटरमिजीएट महाविद्यालय होते. या पार्श्वभूमीवर औरंगाबाद येथे पदवी महाविद्यालय सुरू करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निर्णय क्रांतिकारक ठरला. खरे म्हणजे तीच मराठवाडा विद्यापीठ स्थापनेची मुहूर्तमेढ ठरते.

२३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ अस्तित्वात आले. नवीन विद्यापीठाच्या नामकरणासाठी पळणीटकर समितीने चर्चा केलेल्या नावांमध्ये मराठवाडा, औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान, दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन अशी स्थल व भूमी, राज्यवाचक नावे होती. व्यक्तिवाचक दोनच नावे होती ती म्हणजे एक शिवाजी व दुसरे डॉ. आंबेडकर. या नावांमधून 'मराठवाडा' या नावाची निवड केली. समितीने आपल्या निवडीविषयक अहवालात स्पष्टीकरण देताना सांगितले की, लोकांचा पूर्वीपासूनच विद्यापीठविषयक उल्लेख करताना 'मराठवाडा विद्यापीठ' असाच उल्लेख होत असल्यामुळे ते नाव कायम करण्यात आले. याशिवाय विद्यापीठाचे नाव असे असावे की, जे तेथील लोकांच्या मनाला, हृदयाला भावनिक पातळीवर आकृष्ट करू शकेल. या पार्श्वभूमीवर 'मराठवाडा विद्यापीठ' हे नाव रूढ झाले.

१९५८ साली विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर उच्च शिक्षणाचा प्रसार हा विद्यापीठापुढील महत्त्वाचा प्रश्न होता. प्रारंभीच्या काळी मराठवाडा विद्यापीठाशी फक्त ९ महाविद्यालये संलग्न झालेली होती. त्यातून ३०६९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. पदव्युत्तर शिक्षणाची सोय नव्हती. १९७८ सालापर्यंत या विभागातील एकूण ८३ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न होती.

या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी २७ मार्च १९७७ मध्ये चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रहास पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून महाड येथे एक सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळेस अनुसूचित जातीच्या आणि विशेषत: पँथरच्या नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्यात यावे अशी मागणी ठराव पास करून केली. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी ती मागणी मान्य केली.

२५ जुलै १९७७ रोजी मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणी समितीने त्यांच्या बैठकीत नामांतराच्या प्रस्तावाचा ठराव मांडला. त्यानंतर या मागणीसाठी मोर्चा, घेराव, बंद, निदर्शने इत्यादींचे आयोजन करण्यात आले. त्याच काळात फी वाढीविरुद्ध आणि काही शैक्षणिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने जी विद्यार्थी कृती समिती स्थापन झाली होती तिनेदेखील या चळवळीत सहभागी होण्याचे ठरविले. पँथरसह एका मोर्चाचे आयोजन केल्यानंतर श्रेयावरून समितीत फूट पडली व मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निमित्ताने फार मोठे आंदोलन उभे राहिले.

''या आंदोलनाच्या निमित्ताने पिढ्यान्‌पिढ्या दलितांबद्दल असलेल्या तिरस्काराचे आणि दलितांमध्ये झालेल्या जागृतीमुळे उद्‌भवलेला स्वाभिमान चिरडण्याचा प्रयत्न झाला.'' [७२]

या पूर्वीही मराठवाड्यात अनेक आंदोलने झाली. त्यापैकी १९७१ साली झालेले परभणी कृषी विद्यापीठ आंदोलन व १९७४ साली झालेले मराठवाडा विकास आंदोलन या दोन्हीही आंदोलनांपेक्षा हे आंदोलन वेगळ्या स्वरूपाचे होते.

मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा ठराव विधानसभेत ज्यावेळेस संमत करण्यात आला त्याच दिवशी म्हणजे २७ जुलै १९७८ पासून मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाने पेट घेतला. नामांतराची पहिली मागणी ते नामांतर आंदोलनातील दंगलीला सुरूवात हा घटनाक्रम पुढील प्रमाणे दिसतो.



नामांतर आंदोलनापुर्वी विद्यापीठ गेट

नामांतर आंदोलन घटनाक्रम एका दृष्टिक्षेपात

अ.क्र.	तारीख व वर्ष	स्थळ	मागण्या	व्यक्ती / संघटना
१	२६ जून १९७४	औरंगाबाद	मराठवाड्यातील दोन विद्यापीठांपैकी एकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे.	मराठवाडा रिपब्लिकन विद्यार्थी संघ अध्यक्ष मच्छिंद्र वाहुळ
२	१ मे १९७७	महाड	ठराव पास करून मागणी	दलित पँथर
३	७ जुलै १९७७	औरंगाबाद	जाहीर मागणी	दलित पँथरचे गंगाधर गाडे
४	१७ जुलै १९७७	औरंगाबाद	मराठवाडा विकास मागणीबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठाला द्यावे ही मागणी	सर्वपक्षीय विद्यार्थी संघटना
५	१८ जुलै १९७७	औरंगाबाद	मोर्चा काढून मागणी, एकूण अकरा मागण्या	सर्वपक्षीय विद्यार्थी कृती समिती
६	१८ जुलै १९७७	औरंगाबाद	विद्यापीठावर मोर्चा काढून नामांतराची मागणी, एकूण दोन मागण्या	बुक्टा
७	१८ जुलै १९७७	औरंगाबाद	वेगळे निवेदन. नामांतराची एक मागणी	दलित पँथर
८	१८ जुलै १९७७	औरंगाबाद	वेगळ्या नावाच्या मागणीचे २५ सह्यांचे निवेदन	
९.	१८ जुलै १९७७	औरंगाबाद	१०० सह्यांचे निवेदन नाव बदलू नये ही मागणी	
१०	१९ जुलै १९७७	बीड	विद्यार्थ्यांच्या इतर मागण्यांबरोबर नामांतराची मागणी	विद्यार्थी कृती समिती
११	१९ जुलै १९७७	जालना	विद्यार्थ्यांच्या मागण्या बरोबरच नामांतराची मागणी	विद्यार्थी कृती समिती
१२	१९ जुलै १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीस पांठिबा दिला	रिपब्लिकन पक्ष
१३	२१ जुलै १९७७	औरंगाबाद	मोर्चा काढून नामांतरास विरोध	इंजिनियरिंग, स. भु., देवगिरी, विवेकानंद महाविद्यालयांचे विद्यार्थी
१४	२२ जुलै १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी धरणे	दलित पँथर
१५	२३ जुलै १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी धरणे	दलित पँथर
१६	२४ जुलै १९७७	उस्मानाबाद	नामांतर विरोधासाठी हरताळ	नामांतरविरोधी
१७	२४ जुलै १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय	दलित पँथर बैठक

१८	२५ जुलै १९७७	औरंगाबाद	नामांतराच्या मागणीस पाठिंबा व निवेदन	मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य
१९	२६ जुलै १९७७	औरंगाबाद	मोर्चा काढून नामांतर मागणी	दलित पँथर
२०	३० जुलै १९७७	औरंगाबाद	मोर्चा काढून नामांतर मागणी	दलित पँथर
२१	२ ऑगस्ट १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी तीन हजारांचा मोर्चा	दलित पँथर
२२	२० ऑगस्ट १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी मोर्चा	दलित पँथर
२३	२६ ऑगस्ट १९७७	मुंबई	नामांतर मागणीसाठी बैठक	सामाजिक कार्यकर्ते व दलित पँथर नेते
२४	२ सप्टेंबर १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी मोर्चा	दलित पँथर
२५	३ सप्टेंबर १९७७	औरंगाबाद	निवेदनाद्वारे नामांतर मागणीस पाठिंबा दिला.	वैद्यकीय महाविद्यालयीन कृती समिती
२६	३ सप्टेंबर १९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीस पाठिंबा	सत्यशोधक व अन्याय निवारन संघटना
२७	८ सप्टेंबर १९७७	मुंबई	नामांतर प्रश्नाचा विचार करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली	मराठवाड्यातील आमदार व खासदार
२८	११ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतर विरोधासाठी बेमुदत संप करण्याची घोषणा	महाविद्यालयीन कृती समिती
२९	१७ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतरासाठी बैठक	मागासवर्गीय सुधार महासंघ
३०	१९ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतरास विरोध करण्यासाठी	महाविद्यालयीन कृती समिती मराठवाडा बंदचे आयोजन
३१	१९ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी बैठक	बुक्टा कार्यकारिणी
३२	२० सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी मोर्चा	दलित पँथर
३३	१३ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतरासाठी जनमत अनुकूल करून घेण्यासाठी मोर्चा	नागरिक विद्यार्थी कृती समिती
३४	२३ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतरासाठी मोर्चा काढून निवेदन दिले.	दलित युवक आघाडी

३५	२४ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतर मागणीसाठी ३० हजार सहभागांचा मोर्चा	नागरिक विद्यार्थी कृती समिती
३६	२४ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतराला विरोध करण्यासाठी साखळी उपोषण	विद्यार्थी कृती समिती
३७	१२ ते २६ सप्टेंबर१९७७	औरंगाबाद	नामांतराला विरोध करण्यासाठी काही व नांदेड महाविद्यालये बंद	विद्यार्थी कृती समिती
३८	२ ऑक्टोबर१९७७	मुंबई	चप्पल मोर्चा	दलित पँथर
३९	२५ जून १९७८	मुंबई	महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठाचे नाव न बदलण्याचा निर्णय	मुख्यमंत्री वसंतदादा पाटील
४०	जून शेवटचा आठवडा १९७८	मुंबई	काँग्रेस मंत्रिमंडळ बरखास्त	
४१	जुलै पहिला आठवडा १९७८	मुंबई	पु.लो.आ. चे सरकार सत्तेवर आले	शरद पवार मुख्यमंत्री झाले
४२	२६ जुलै १९७८	मुंबई	नामांतर प्रश्नावर चर्चा करण्यासाठी बैठक	मराठवाड्यातील विधान परिषदेचे सदस्य, कुलगरू व सर्व संघटनांचे नेते
४३	२७ जुलै १९७८	मुंबई	नामांतर ठराव पास केला	विधानसभा व विधान परिषद
४४	२८ जुलै १९७८	मराठवाडा	नामांतरास विरोध करण्यासाठी दंगल सुरू झाली.	

अ) नामांतर मागणीचा उगम आणि विकास :

नामांतर मागणीच्या उगमाचा शोध घेतला असता असे आढळून येते की,

* २६ जून १९७४ रोजी मराठवाडा रिपब्लिकन संघाने मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मराठवाड्यातील दोन विद्यापीठांपैकी एकास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे अशी मागणी केली होती.

या संघाचे अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र वाहुळ यांना याबाबत पोचही आलेली होती. या पत्रात म्हटले होते की, मराठवाड्यातील दोन विद्यापीठांपैकी एकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबाबत आपल्या सूचनेची नोंद घेतली आहे.

* १ मे १९७७ मध्ये चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रहास पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून महाड येथे सोहळा आयोजित करण्यात आला होता. तिथे दलित पँथरने ठराव पास करून ही मागणी केली.

* ७ जुलै १९७७ रोजी मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी जाहीर मागणी प्रथमत: नवस्थापित पँथरचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी केली. त्यात त्यांनी असे म्हटले होती की, 'मराठवाड्यात मिलिंद महाविद्यालय काढून डॉ. आंबेडकरांनी मराठवाड्यात शैक्षणिक क्रांतीचे बीजारोपण केले. त्यामुळे त्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्यात यावे.

* १७ जुलै १९७७ रोजी औरंगाबादच्या सरस्वती भुवन प्रांगणावर मराठवाड्यातील सर्वपक्षीय विद्यार्थी युवक संघटनांनी एकत्र येऊन विद्यार्थी कृती समिती स्थापन केली. या समितीची बैठक सायंकाळी सात वाजता बोलावण्यात आली होती. या बैठकीत युवक क्रांतीदल, युवक काँग्रेस, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जनता युवक आघाडी, समाजवादी क्रांतीदल, एस. एफ. आय, ए. आय. एस. एफ, दलित युवक आघाडी, युवा रिपब्लिकन, दलित पँथर, पुरोगामी युवक संघटना इत्यादींचे विद्यार्थी प्रतिनिधी सहभागी झाले होते. युक्रांदचे शशी अहंकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन बैठकीत पुढील मागण्यांचा विचार करून लढा देण्याचे ठरविण्यात आले. त्या मागण्या अशा -

"१) वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागा ७५% नी वाढवून द्या.

२) अभियांत्रिकी महाविद्यालयात इतर विद्यापीठांसाठी राखीव असणाऱ्या जागा रद्द कराव्यात.

३) दलितांसाठी असणाऱ्या ३४% जागा भरा.

४) बारावीला ए. टी. के. टी. द्या .

५) मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या इत्यादी मागण्यांचा समावेश होता." [७३]

यावरून असे म्हणता येते की, विद्यापीठ नामांतराची मागणी ही सर्वपक्षीय विद्यार्थी संघटनांनी एकत्र येऊन विद्यार्थी कृती समितीच्या नेतृत्वाखाली केली होती व त्यासाठी मराठवाड्यातील विद्यार्थी - युवकांनी एकत्र आंदोलन करायचे ठरविले होते असे दिसते.

* १८ जुलै १९७७ रोजी सर्वपक्षीय विद्यार्थी कृती समितीने विद्यार्थ्यांच्या वरील मागण्यांसाठी एक मोर्चा विद्यापीठावर नेला. विद्यापीठ कार्यकारिणीची बैठकही त्याच दिवशी होती. तसेच याच दिवशी महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती. त्यास १००% प्रतिसाद मिळाला.

* १८ जुलै १९७७ रोजी प्राचार्य संदानशिव यांच्या नेतृत्वाखाली मागासवर्गीय विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांचा मोर्चा विद्यापीठावर आला. या संघटनेनेही नामांतराची मागणी व ३४% राखीव जागा भराव्यात ही मागणी कार्यकारिणीकडे केली. याच दिवशी दलित पँथरने आपले स्वतंत्र निवेदन मोर्चाद्वारे गाडे यांच्या नेतृत्वाखाली दिले.

* १८ जुलै १९७७ रोजीच २५ वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या सह्यांचे निवेदन 'स्वामी रामानंद तीर्थ' यांचे नाव विद्यापीठाला द्यावे या मागणीसाठी विद्यापीठ कार्यकारिणीस देण्यात आले. तसेच नावात कोणताही बदल करू नये अशा शंभर सह्यांचे निवेदन कार्यकारिणीस देण्यात आले.

* १८ जुलै १९७७ रोजी विद्यापीठास 'मौलाना आझाद' यांचे नाव द्या अशी मागणी करणारे निवेदन अहमद रझा रझवी (औरंगाबाद), सिराज देशमुख (बीड), एस. एन. काद्री, मिर्झा शाहीर बेग यांच्या सह्यांनी दिल्याची बातमी 'मराठवाडा' दैनिकात प्रसिध्द झाली होती.

हे निवेदन वगळता कार्यकारिणीचा ठराव होइपर्यंत जाहीर वा उघड विरोध झाला नव्हता.

* १९ जुलै १९७७ रोजी रिपब्लिकन पक्षाचे बाबूलाल पंडित यांनी नामांतर मागणीसाठी पाठिंबा जाहीर केल्याचे संसदीय समितीच्या समोर सादर केलेल्या शासकीय अहवालात म्हटले आहे.

* १९ जुलै १९७७ रोजी विद्यार्थी कृती समितीने रामराव जाधव व माधव हातागळे यांच्या नेतृत्वाखाली परभणीत मोर्चा काढला होता. त्यांनी आपल्या मागण्यांसोबतच परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवा ही मागणी केली. तसेच बीड व जालना येथेही विद्यार्थी कृती समितीचा मोर्चा विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी निघालेला होता.

या सर्व मागण्यांचा व मोर्चाचा विचार करून विद्यापीठ कार्यकारिणीने नामांतराचा ठराव एकमताने पास केला. उर्दू व पाली, बुध्दिझमचे विभाग सुरू करण्याची मागणीही विद्यापीठ अनुदान मंडळाशी संपर्क साधून अमलात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील असे कार्यकारिणीने ठरविले होते.

"दलित पँथरने नामांतराचे श्रेय दलित विद्यार्थ्यांना प्रामुख्याने जाते असे उद्‌गार काढले आणि केवळ श्रेयावरून हिंदू विद्यार्थी बिचकले आणि संयुक्त नामांतराच्या मागणीपासून वेगळे होऊन त्यांनी नामांतरविरोधी भूमिका स्वीकारली." ७४

शिवाय त्यांच्या इतर मागण्या मागे पडल्या होत्या. वेगवेगळ्या संघटनांनी १७ जुलैच्या बैठकीत त्या मागण्या मांडल्या होत्या. चर्चेअंती या मागण्यांना संयुक्त रूप देण्यात आले होते. सर्व संघटनांनी संघटित होऊन, एकत्रित येऊन संयुक्तपणे या मागण्या पूर्ण करण्याचे निश्चित केले होते. मागण्यांचे जे निवेदन तयार करण्यात आले होते त्या निवेदनातील तिसऱ्या क्रमांकाची मागणी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे अशी होती. एकूण निवेदनात ११ मागण्या होत्या.

या ११ मागण्यांपैकी एकच मागणी मान्य होणे व त्याचे श्रेय दलित पँथरने स्वत:कडे घेणे यातून दलितेतर समाजातील विद्यार्थी विभक्त झाले आणि त्यांनी 'मराठवाडा विद्यार्थी कृती समिती' ची स्थापना केली. या समितीने नामांतराच्या विरोधी शक्ती एकवटली.

वरील श्रेयाच्या प्रश्नावरून दलितेतर समाजातील विद्यार्थ्यांनी नामांतरविरोधी भूमिका स्वीकारली. या विरोधाचे लोण सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले होते.

नामांतराचा प्रश्न धसास लावण्यासाठी आणि त्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यासाठी दलित संघटनेतर्फे 'विद्यार्थी नागरिक कृती समिती' स्थापन करण्यात आली व नामांतर आंदोलन दोन्ही बाजूंनी तापत गेले.

* २१ जुलै १९७७ रोजी नामांतरास विरोध करणारा पहिला संघटित मोर्चा औरंगाबाद येथील इंजिनियरिंग, सरस्वती भुवन, देवगिरी, विवेकानंद इत्यादी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी काढला.

* २२ जुलै १९७७ रोजी दलित पँथर नेते गंगाधर गाडे व प्रीतमकुमार शेगावकर यांनी समाजकल्याण कार्यालयासमोर नामांतराच्या मागणीसाठी चार तास धरणे धरली.

* २३ जुलै १९७७ रोजी गुलमंडी, औरंगाबाद येथे नामांतर मागणीसाठी दलित पँथरच्या वतीने धरणे धरण्यात आली.

याच दिवशी नव्यानेच तयार झालेल्या 'जनता मुस्लिम फोरम' ची बैठक औरंगाबादला झाली. या बैठकीत जनता पक्षाचे एस. एम. जोशी यांनी नामांतराच्या मागणीस जाहीर पाठिंबा दिला.

तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतदादा पाटील यांनी मात्र पूर्वी मान्यता दिलेल्या या ठरावास प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने काही ठोस पावले उचलली नाहीत. त्यामुळे या मागणीसाठी मोर्चा, घेराव, बंद इत्यादींचे आयोजन करण्यात आले.

* २४ जुलै १९७७ रोजी उस्मानाबादला नामांतरविरोधी मंडळींनी हरताळ पाळला.

* २४ जुलै १९७७ रोजीच दलित पँथरची बैठक औरंगाबादेत झाली व या बैठकीत नामांतर आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला.

* २५ जुलै १९७७ रोजी महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणमंत्री सौ. प्रतिभाताई पाटील यांच्याकडे मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वतीने एक निवेदन सादर करून विद्यापीठ नामांतराला आपला पाठिंबा व्यक्त केला. व नामांतराची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी अशी मागणी केली.

* २६ जुलै १९७७ रोजी दलित पँथरने मोर्चा काढून विभागीय आयुक्तांना निवेदन दिले व नामांतर तसेच दलित अत्याचाराची चौकशी करून गुन्हेगारांना शिक्षा करण्याची मागणी केली.

* ३० जुलै १९७७ रोजी मिलिंद परिसरातून शहरातून मोर्चा काढला गेला आणि तो भडकलगेटला सभेत रूपांतरित झाला.

* २ ऑगस्ट १९७७ रोजी दलित पँथरने अनेक जिल्ह्यांचे प्रतिनिधी बोलावून ३००० (तीन हजार) सहभागांचा मोर्चा काढला.

* २० ऑगस्ट १९७७ ला मुख्यमंत्री वसंतदादा पाटील औरंगाबादला आले असता प्रीतमकुमार शेगावकर यांनी ३०० (तीनशे) कार्याकर्त्यांचा मोर्चा सुभेदारी गेस्ट हाऊसवर नेला व मुख्यमंत्र्यांना नामांतराचे निवेदन दिले.

* २६ ऑगस्ट १९७७ रोजी तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मुंबईत मराठवाड्यातील सामाजिक कार्यकर्ते व दलित नेते यांची बैठक बोलावली. या बैठकीत दलित व दलितेतर अशा मराठवाड्यातील नेत्यांनी नामांतरास एकमताने अनुकूलता दर्शविली होती. त्यात स्वातंत्र्य सेनानी मा. श्री गोविंदभाई श्रॉफ व सहकाऱ्यांचा समावेश होता.

"दलित पँथरने आपले संघटन मजबूत करण्यासाठी नामांतर लढा तीव्र करण्यासाठी मराठवाडाभर आंदोलन, मोर्चाची कृती सुरू केली. याच काळात नामांतरविरोधी महाविद्यालयीन कृती समितीनेही आपले आंदोलन प्रतिक्रियारूप तीव्र केले. सप्टेंबर १९७७ मध्ये आंदोलन परस्पर बाजूंनी अधिक तीव्र झाले." [७५]

* २ सप्टेंबर १९७७ रोजी औरंगाबादला पँथरचा मोर्चा मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे या आणि इतर मागण्यांसाठी भडकल गेटपासून निघून तो विभागीय आयुक्त कार्यालयावर गेला. तिथे गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर, प्रकाश थोरात, लामतुरे यांनी नामांतराची खंबीर भूमिका मांडून मागण्यांचे निवेदन विभागीय आयुक्तांना सादर केले.

* ३ सप्टेंबर १९७७ रोजी वैद्यकीय महाविद्यालयीन विद्यार्थी कृती समितीने मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे असे निवेदन काढून या मागणीस पाठिंबा दर्शविला.

* ३ सप्टेंबर १९७७ रोजीच औरंगाबाद येथील सत्यशोधक व अन्याय निवारण संघटनेने मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे या मागणीस पाठिंबा दिला व विद्यापीठ कार्यकारिणीने विद्यापीठास डॉ.आंबेडकरांचे नाव देण्याचा ठराव मंजूर केल्याबद्दल कार्यकारिणीचे अभिनंदन केले.

* ८ सप्टेंबर १९७७ ला मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाड्यातील आमदार, खासदार आणि प्रमुख सामाजिक कार्यकर्ते यांची नामांतराच्या प्रश्नाच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक होऊन तिच्यातही नामांतराला अनुकूलता दर्शवून हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढावा असे मत व्यक्त करण्यात आले होते.

नामांतराबाबत शासकीय पातळीवरून अनुकूलता दिसताच सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या वरच्या मजल्यावर ११ सप्टेंबर १९७७ रोजी 'नामांतरविरोधी महाविद्यालयीन विद्यार्थी कृती समितीने बैठक घेतली व त्यात त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास १२ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत संप करण्याची घोषणा व आवाहन केले. वर्गावर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन छेडले गेले. या संघटनेच्या मागण्यांमध्ये

१) मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलू नये.

२) ई. बी. सी. मर्यादा वाढवावी.

३) १२ वीला ए.टी.के.टी. द्यावी आदींचा समावेश होता.

या महाविद्यालायीन कृती समितीचे संघटक म्हणून मोहन देशमुख, अशोक फटांगडे, शिवाजी ढगे, सुरेश अवचार, प्रदीप जोगाईकर, विद्याधर पांडे, एकनाथ पाथ्रीकर यांचा समावेश होता. यात उस्मानाबादचे राजा साळुंके व परळीचे अशोक देशमुख यांनी औरंगाबादबाहेरील नामांतरविरोधी विद्यार्थी आंदोलनास नेतृत्व दिले.

या समितीने नामांतराच्या ठरावास विरोध करून आपली शक्ती प्रगट करण्याच्या दृष्टीने महाविद्यालय बंदचे आवाहन केले. त्यामुळे मराठवाड्यातील काही महाविद्यालये १२ ते २६ सप्टेंबर १९७७ यादरम्यान बंद राहिली.

* १७ सप्टेंबर १९७७ रोजी मागासवर्गीय सुधार महासंघाने बैठक घेऊन नामांतराची भूमिका घेतली. बैठकीस प्राचार्य चिटणीस, प्रवीण वाघ, चिमणे यांनी मार्गदर्शन केले.

* १९ सप्टेंबर १९७७ रोजी नामांतर विरोधकांनी 'मराठवाडा बंद' घोषित केला व चक्री उपोषण केले. याच दिवशी कार्यकारिणीच्या बैठकीत अंबाजोगाई येथील सर्व स्तरातील सामाजिक, राजकीय व अन्य संघटनांनी नामांतराच्या प्रस्तावाला अनुकूल अशी भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

* २० सप्टेंबर १९७७ रोजी दलित पँथरच्या मोर्चावर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ दलित पँथरने सुभेदारी गेस्ट हाऊसवर मोर्चा नेला आणि मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांना मागण्यांचे निवेदन दिले. या मागण्यात विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे ही प्रमुख मागणी होती.

* २३ सप्टेंबर १९७७ रोजी नागरिक विद्यार्थी कृती समितीची स्थापना करण्यात आली. प्राचार्य म. भि. चिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेल्या या व्यापक व सर्वजातीय समितीत वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्रा. बापूराव जगताप व ज्येष्ठ पत्रकार बाबा दळवी हे कार्याध्यक्ष तर सुभाष लोमटे हे या समितीचे संघटक होते. यांच्याशिवाय तकी हसन, कवी फ.मुं. शिंदे, डी. एल. हिवराळे, प्रकाश वांगीकर, डॉ. शशी अहंकारी, प्रवीण वाघ यांचाही समावेश होता.

* २३ सप्टेंबर १९७७ रोजी नागरिक विद्यार्थी कृती समितीने समाजातील सर्व वर्गात सामंजस्याचे वातावरण निर्माण करण्यावर व नामांतरासाठी जनमत अनुकूल करून घेण्यावर भर दिला. सामाजिक व जातीय तणाव वाढवून हा प्रश्न अधिक चिघळेल अशी या संघटनेची भूमिका होती.

* २३ सप्टेंबर १९७७ च्या या उद्‌घाटनपर बैठकीस जनता पार्टी, दलित पँथर, सी. पी. आय., सी. पी. एम., रिपब्लिकन पक्ष, काँग्रेस, युक्रांद यांचे प्रतिनिधी हजर होते.

याच दिवशी दलित युवक आघाडीने नामांतराच्या मागणीसाठी मूकमोर्चा काढून मागण्याचे निवेदन दिले.

*२४ सप्टेंबर १९७७ रोजी औरंगाबाद येथे नामांतराच्या मागणीसाठी 'नागरिक विद्यार्थी कृती समिती, तर्फे ३०,००० (तीस हजार) सहभागांचा ऐतिहासिक प्रचंड मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाने जुलै महिन्यापासून सुरू झालेल्या या आंदोलनाला एकदम वेगळे वळण लागले. या मोर्चात झोपडपट्टीतील स्त्री - पुरुषांपासून ते कॉलेज विद्यार्थी - विद्यार्थिनीं पर्यंत आणि हातगाडीवाल्यापासून प्राध्यापक, प्राचार्य, वकिलांपर्यंत सर्व स्तरातील क्स्त्री - पुरूष सहभागी झाले होते. या मोर्चात अनेकपक्ष कार्यकर्त्यांबरोबर अनेक वरिष्ठ मंडळी हजर होती. कोणत्याही पक्षाचे वा संघटनेचे फलक न लावता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठास द्यावे या घोषणेव्यतिरिक्त कुठलीही घोषणा न देता हा मोर्चा गुलमंडी, सराफा, चेलिपुरा मार्गाने आयुक्तांच्या कचेरीवर गेला व तेथे मोर्चातर्फे एक निवेदन उपायुक्तांना सादर करण्यात आले.

"याच दिवशी विद्यार्थी कृती समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठास देऊ नका अशा नकारात्मक मागणीसाठी साखळी उपोषण सुरू केले. 'मराठवाडा बंद' ची घोषणा केली व त्यातून दलित अणि दलितेतर विद्यार्थ्यांत तेढ निर्माण झाली."[७६]

याच दिवशी नांदेडला दलित पँथरने मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, नवबौध्दांना सवलती द्याव्यात इ. मागण्यांसाठी 'नांदेड बंद' चा कार्यक्रम आयोजीत केला. जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा नेऊन जिल्हाधिकारी साहेबांना वरील मागण्यांचे निवेदन दिले.

उस्मानाबादला दलित पँथरच्या वतीने जाहीर सभा व प्रा. अरुण काबंळे, गंगाधर गाडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला आणि मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे आणि इतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर केले. तसेच बीड, परळी वैजनाथ, सेलू, परभणी, उदगीर इत्यादी ठिकाणी नामांतराच्या आणि इतर मागण्यांसाठी दलित पँथरने मोर्चे काढले.

प्रतिक्रिया म्हणून सवर्णांनी व दलितेतर विद्यार्थी - युवकांनी मोर्चे काढून विद्यापीठाचे नाव बदलू नये अशी मागणी केली.

उस्मानाबाद, बीड, सेलू, परळी वैजनाथ इत्यादी ठिकाणी दलितांनी विद्यापीठाला नाव द्यावे म्हणून मोर्चे काढल्यावर दलितेतरांनी प्रचंड प्रतिमोर्चे काढून निषेध नोंदविला.

उदगीर, अहमदपूर, गंगाखेड येथेही दलितांनी आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून मोर्चे काढल्यानंतर सवर्णांनी व दलितेतरांनी उत्स्फूर्त प्रचंड प्रतिमोर्चे काढून निषेध नोंदवून नामांतरास विरोध दर्शविला.

केवळ मराठवाड्यातच नाही तर मुंबई, पुणे, नागपूर, दिल्ली, नाशिक, वालचंदनगर या ठिकाणी दलित पँथरने नामांतरांच्या मागणीसाठी मोर्चे काढले.

अशा प्रकारे दोन्ही बाजूंनी आंदोलन सुरू होते. वसंतदादा पाटील यांनी सरकार नामांतर प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी विद्यार्थी कृती समितीशी चर्चा करेल असे आश्वासन दिल्यावर १२ ते २६ सप्टेंबरदरम्यान बंद राहिलेली महाविद्यालये उघडण्यात आली.

* दलित पँथरने २ ऑक्टोबर १९७७ रोजी एक चप्पल मोर्चा आयोजित केला. विधानसभेत नामांतराची मागणी करणारी पत्रके वाटण्यात आली. प्रतिनिधी मंडळे, प्रेसला निवेदने, पत्रकांचे वाटप, साखळी उपोषण आणि मोर्चा अशा अनेक अस्त्रानिशी नामांतराचा आग्रह धरणाऱ्या मंडळींनी त्यांचा आंदोलनाचा लढा चालू ठेवला. मात्र ही आंदोलने पूर्णतया शांततेने चालू होती.

* फेब्रुवारी १९७८ मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात वसंतदादा पाटील हे काँग्रेस मंत्रिमंडळात मुख्यमंत्री व नाशिकराव तिरपुडे हे उपमुख्यमंत्री झाले. त्यांनी २५ जून रोजी औरंगाबादला दिलेल्या भेटीत असे जाहीर केले की, त्यांच्या मंत्रिमंडळाने महाराष्ट्रातील कुठल्याही विद्यापीठाचे नाव न बदलण्याचा निर्णय घेतला आहे. या विधानाच्या विरोधात दलित समाजात असंतोष निर्माण झाला. दलित नेत्यांनी लगेच श्री. म. भी. चिटणिसांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेऊन संपूर्ण महाराष्ट्रभर ९ ऑगस्ट पासून पुन्हा आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला.

* जून १९७८ च्या अखेरीस काँग्रेसचे मंत्रिमंडळ गडगडले.

* १९ जुलै १९७८ ला शरद पवारांच्या नेतृवाखाली पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. आपल्या हाती सूत्रे घेतल्यावर मुख्यमंत्री मा. शरद पवारांना विचारलेल्या एका प्रश्नास उत्तर देतांना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र विधानसभेच्या येत्या अधिवेशनात मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या ठरावावर चर्चा करण्यात येईल.

याची प्रतिक्रिया म्हणून विद्यार्थी कृती समितीने मराठवाड्यातील सर्व विद्यार्थ्यांना नामांतराच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी आवाहन केले.

त्यानंतर नामांतर प्रकरणी चर्चा करण्यासाठी मा. श्री. शरद पवारांनी मुंबईत २६ जुलै १९७८ रोजी एक बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी मराठवाड्यातील विधान परिषदेचे सर्व सदस्य, मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू आणि या प्रश्नाशी संबंधित सर्व संघटना आणि नेते

अशा सर्वांना आमंत्रित केले. या बैठकीत मराठवाडा विद्यापीठाचे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे ठेवण्याचे ठरले.

* २६ जुलै १९७८ ला विधिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री शरद पवार, सभापती शिवराज पाटील चाकूरकर, श्री. रा. सू. गवई, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, नाशिकराव तिरपुडे इत्यादी सर्व पक्षांच्या आमदारांनी मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामकरण करण्याचे तत्त्वत: मान्य केले.

* २७ जुलै १९७८ रोजी मराठवाडा विद्यापीठाला'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव देण्याचा प्रस्ताव विधानसभा व विधान परिषदेत सर्वानुमते बिनविरोध संमत झाला. विधानसभेत हा नामांतराचा प्रस्ताव मांडताना मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी अत्यंत स्पष्ट शब्दात घोषित केले की, 'नामांतरामुळे मराठवाडा विद्यापीठ केवळ दलितांचे स्थान होईल ही भीती निरर्थक आहे. मराठवाडा विद्यापीठाची अस्मिता, नावलौकिक आणि धर्मनिरपेक्ष स्वरूप कायम राहील. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निर्णयाने सामाजिक *परिवर्तनाच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले गेले आहे.*

''जनता पक्षाचे आमदार वासुदेवराव देशमुख यांनी सांगितले की, 'नामांतराच्या निर्णयामुळे मराठवाडा विभागात गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. तो सर्व सदस्यांनी दूर करण्याची आवश्यकता आहे.

विधान परिषदेत मंत्री श्री. उत्तमराव पाटील यांनी नामांतराचा ठराव मांडताना 'बहुसंख्य जनतेच्या इच्छेला मान देऊन विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले पाहिजे' असे सांगितले.

श्री. मधुकरराव चौधरी यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला दिल्याने विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढली आहे.'

या ठरावावर बाळासाहेब देसाई, सौ. जयवंतीबेन मेहता, डॉ. कुमार सप्तर्षी, श्री. सुधाकर गणगणे व श्री. पा. ना. राजभोज यांची भाषणे झाली.'' [७७]

सुरुवातीस मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नासाठी मराठवाड्यातील सर्वच संघटनांनी सहभाग घेऊन नामांतर घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले.

विद्यार्थी समन्वय समितीने सुरुवातीच्या संघटित मोर्चाद्वारे आपल्या ११ मागण्यांचे निवेदन कुलगुरूंना सादर केले. १८ जुलैच्या विद्यापीठ कार्यकारिणीच्या बैठकीत वरील मागण्यांवर चर्चा झाली आणि ११ मागण्यांपैकी फक्त मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचे नाव द्यावे ही मागणी मान्य झाली. तरीदेखील इतर समाजातील विद्यार्थ्यांनी त्याबद्दल दुमत व्यक्त केलेले दिसत नाही. परंतु ज्यावेळेस दलित पँथरचे नेते श्री. गंगाधर गाडे यांनी नामांतराचे श्रेय दलित संघटनेकडे घेतले तेव्हा इतर समाजातील विद्यार्थी बिथरले. वास्तविक पाहता या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सर्वच समाजातील विद्यार्थ्यांचा सहभाग

होता. त्यामुळे नामांतराच्या मागणीचे श्रेय सर्वच विद्यार्थी संघटनांना मिळावयास हवे होते. तसे न झाल्यामुळे नामांतराला अनुकूल असणारे व विरोधक असे दोन गट पडले व एवढे मोठे आंदोलन उभे राहिले.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर होऊ नये यासाठी 'नामांतरविरोधी नागरिक समिती' स्थापन करण्यात आली. या समितीने नामांतराला विरोध केला तर 'नागरिक विद्यार्थी कृती समिती'ने नामांतर घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

ब) नामांतर आंदोलनाला हिंसक वळण (दंगलीची सुरुवात) :

"२७ जुलै ७८ ला विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहात ज्यावेळेस नामांतराचा ठराव तत्वत: बिनविरोध संमत करण्यात आला त्यावेळेस मराठवाड्यात असंतोषाची लाट पसरली. 'मराठवाडा महाविद्यालयीन नामांतरविरोधी विद्यार्थी कृती समिती' आणि 'मराठवाडा नागरिक कृती समिती' या दोन्ही संघटनांनी तातडीची बैठक २७ जुलै ७८ ला बोलावली आणि त्या बैठकीत 'ताबडतोब मराठवाडा बंद' चा आदेश दिला आणि आंदोलन सुरू करण्याचे ठरले "[७८]

ज्यावेळी एखाद्या गटाच्या विरोधी कृती घडते त्यावेळी प्रथम शब्दसामर्थ्य वापरून सभा, मोर्चे आदी मार्गांचा अवलंब केला तरी प्रश्नाला वाचा फुटते व प्रश्नाच्या दृष्टीने मदत होते. परंतु येथे एकदम 'मराठवाडा बंद' हा असहकारितेचा मार्ग स्वीकारलेला दिसतो.

विधानसभेत नामांतराचा ठराव पास झाल्यानंतर मराठवाडा कृती समितीने मोठ्या प्रमाणावर आंदोलनाला हिंसक वळण लावले व संपूर्ण मराठवाडा दंगलीने पेटला. या दंगलीचे दोन टप्पे पाडता येतील.

१) २७ जुलै १९७८ ते ३१ जुलै १९७८ :

आंदोलनाच्या या टप्प्यात आंदोलन प्रामुख्याने सरकारविरुध्द होते असे दिसते. या टप्प्यात मराठवाड्यातील महाविद्यालये बंद होती. याशिवाय रेल्वे पटरी उखडणे, रोड तोडणे, फोडणे, नगरपालिकांचे नुकसान, सरकारी वाहने जाळणे, सरकारी ऑफिसेस, बँका, पोस्ट कार्यालये इत्यादी जाळणे या घटना घडल्या. यात सरकारी आणि खाजगी मालमत्तेचे एकूण तीन कोटी रुपयांचे नुकसान झाले.

२) १ ते १० ऑगस्ट १९७८ :

१ ते १० ऑगस्ट १९७८ हा आंदोलनाचा दुसरा टप्पा होय. या टप्प्यात वरील प्रकारांबरोबरच अनेक हिंसक प्रकार मराठवाड्यात घडले. या हिंसाचारात मराठवाड्यातील दलितांवर पूर्वनियोजित हल्ले केले गेले. या हल्ल्याचे स्वरूप

"सवर्णांनी दलितांना ठार मारणे, त्यांच्या झोपड्यांना आगी लावणे, वस्तूंची लुटालूट करणे, दलितांना गावाबाहेर हाकलून निराधार करणे, त्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत विष टाकणे, त्यांच्या गुरांना ठार मारणे, विहिरीवर पाणी भरण्यास विरोध करणे, पिण्याच्या

पाण्याच्या विहिरीत मानवी विष्ठा टाकणे, दलित स्त्रियांचा विनयभंग करणे, डॉ. आंबेडकर आणि भगवान बुध्द यांच्या पुतळ्यांचे नुकसान करण्यात आले. तोडफोड करून पुतळे विद्रूप करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील चार तालुक्यांत आणि परभणी जिल्ह्यातील दोन तालुक्यांत झोपड्या जाळण्याचे प्रकार घडले. हे लोण सर्व मराठवाड्यात पसरले.'' [७१]

दुसऱ्या टप्प्यात आंदोलनाला जातीय स्वरूप प्राप्त झाले. काही ठिकाणी दलितांची हत्या करण्यात आली. त्यात नांदेड जिल्ह्यातील सुगाव, टेंभुर्णी, उस्मानाबाद जिल्ह्यातील जळकोट येथील घटनांचा उल्लेख करता येईल.

वरील दोन्ही टप्प्यात् आंदोलन काळात झालेल्या नुकसानीचा आढावा खालील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आला आहे.

२७ जुलै ते १० ऑगस्ट १९७८ या काळात शासनाचे आणि दलिताचे नुकसान खालील प्रमाणे -

तक्ता क्र. १

जाळलेली किंवा मोडतोड केलेली सार्वजनिक मालमत्ता

१. जवळपास सर्व नगर परिषद हद्दीतील रोड लाईटस् फोडण्यात आले.

२. मराठवाडाभर ठिकठिकाणी सडका आणि पूल यांची मोडतोड करण्यात आली.

३. अनेक ठिकाणी टेलिफोन तारा तोडण्यात आल्या आणि खांब उखडून टाकण्यात आले.

४.	एस. टी. बसेस	पूर्ण जाळल्या	०४
५.	एस. टी. बसेस	अर्धवट जाळल्या	०६
६.	एस. टी. बसेस	मोडतोड	४०
७.	एस. टी. बसेस पिकअप शेड	मोडतोड	११
८.	विश्रामगृहे	जाळली	०२
९.	ऑफिस रेकॉर्ड	जाळले	२६
१०.	सरकारी वाहने	जाळले / मोडतोड	५७
११.	रेल्वे स्टेशन	पूर्णत: जाळले	०३
१२.	रेल्वे स्टेशन	अर्धवट जाळले	०६
१३.	रेल्वे डबे	पूर्ण जाळले	०८
१४.	शाळेच्या इमारती	मोडतोड	२८
१५.	नगर परिषद कार्यालये	मोडतोड	०३
१६.	बँक कार्यालये	मोडतोड	०२
१७.	पोस्ट ऑफिसेस	नासधूस	०२

१८. ऑईल इंजिन्स	नासधूस	०१
१९. शासकीय आणि इतर कार्यालये	जाळली	३७
२०. गोदाम	नासधूस	०१
२१. दूध वाटप केंद्रे	नासधूस	०५

(Source- Why Marathwada University alone p. 35)

वरील तक्त्यावरून शासनाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले हे दिसून येते. नामांतर आंदोलनाच्या काळात नामांतर विरोधकांचा रोख हा प्रामुख्याने सरकारी मालमत्तेवर होता हे दिसून येते.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन काळात शासनाचे जिल्हावार आर्थिक नुकसान तक्ता क्र. २ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्र. २

सरकारी - निमसरकारी मालमत्तेचे आर्थिक नुकसान (रुपयांमध्ये)

अ.क्र.	जिल्हा	सरकारी आणि निमसरकारी घटनांची संख्या	एकूण आर्थिक नुकसान
१.	नांदेड	८५	१४,४४,३२९
२.	बीड	०७	२,६३,८४४
३.	औरंगाबाद	३०	१८,७४,९६१
४.	उस्मानाबाद	५५	५,७६,२३२
५.	परभणी	६७	२९,२०,२०१
	एकूण	२४४	७०,७९,५६७

(Source : Why Marathwada University alone p.35)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन काळात मराठवाड्यातील पाचही जिल्ह्यांमध्ये शासनाचे सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. नांदेड जिल्ह्यात नुकसानीच्या सर्वात जास्त घटना घडल्या तर परभणी जिल्ह्यात आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे असे दिसून येते. मराडवाड्यात नामांतर आंदोलन काळात सरकारी आणि सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीप्रमाणेच दलितांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे त्या नुकसानीचा तक्ता खालीलप्रमाणे

(तक्ता क्र. ३ पुढील पानावर)

तक्ता क्रमांक - ३

दलितांच्या झोपड्या जाळणे आणि दलितांचे आर्थिक नुकसान व मृत्यू

१ अ.क्र	२ जिल्ह्याचे नाव	३ एकूण गावे	४ नुकसान व जाळलेल्या झोपड्या याची संख्या		५ एकूण झोपड्यांचे नुकसान	६ कुटुंबांची संख्या	७ पीडित व्यक्तींची संख्या	८ मृत्यू	९ एकूण नुकसान रुपयात
			पूर्णपणे जाळल्या	नुकसान					
१	नांदेड	५५	३५५	३८३	७३८	७८०	४१११	०२	१०,५९,४१३
२	बीड	०५	-	१३	१३	३७	१८२	-	२४,१३५
३	औरंगाबाद	१७	६४	१३	७७	९९	३८४	-	८७,०४८
४	उस्मानाबाद	१५	२७	७८	१०५	१५९	८४९		२,८७,३८३
५	परभणी	३२	६२	७०	१३२	२८८	८४४	०१	२,९१,३५२
	एकूण	१२४	५०८	५५७	१०६५	१३६३	६३७०	०४	१७,४९,३३१

(Source : Why Marathwada University alone p. 36)

तक्ता क्र. ३ वरून मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन काळात दलितांच्या झोपड्या जाळणे आणि झोपड्यांची मोडतोड करून नुकसान करण्याचे प्रमाण नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक होते असे दिसून येते. बीड जिल्ह्यात आंदोलनकाळात झोपड्यांचे नुकसान करण्याचे प्रमाण कमी होते. आंदोलनकाळात मृत्यू होण्याचे प्रमाणही नांदेड जिल्ह्यात अधिक आहे. नांदेड जिल्ह्यात हिंसक जमावाने दोघांचे खून केले असे दिसून येते.

वरील तक्त्यांचा विचार केला तर मराठवाडा विद्यापीठ आंदोलन हे सुरुवातीच्या टप्प्यात सरकारविरोधी आणि दुसऱ्या टप्प्यात दलितविरोधी होते असे दिसते.

त्याच दरम्यान, मा. शरद पवार यांनी नामांतरविरोधी आणि नामांतरवादी यांची बैठक मुंबईला बोलावली. त्यात त्यांनी खालील निर्णय जाहीर केला.

"That the Assembly resolution was recommendatory that the Government had not taken any decision and that no decision will be imposed upon the people of Marathwada."[80]

मुख्यमंत्री मा. शरद पवार यांनी आश्वासन दिल्यानंतर मराठवाडा कृती समितीने आपले नामांतरविरोधी आंदोलन मागे घेतले.

क) दंगलीनंतरची परिस्थिती :

वरील सर्व घटना घडल्यानंतरसुध्दा नामांतरवाद्यांनी नामांतराची भुमिका सोडली नाही. नामांतराच्या बाजूने आंदोलन चालूच राहिले व नामांतर दंगलीच्या प्रतिक्रिया इतरत्र उमटल्या.

६ ऑगस्ट १९७८ रोजी मराठवाडा नामांतराचा प्रश्न धसास लावण्यासाठी नागपूर येथे मानवी हक्क संरक्षण समितीची स्थापना केली गेली.

नागपूरमध्ये नामांतराच्या मागणीसाठी व मराठवाडा दलित हत्याकांडाच्या निषेधार्थ मोर्चा काढण्यात आला तेव्हा पोलिसांच्या गोळीबारात रतन मेंढे, अब्दुल हमीद, शब्बीर अली, रतन परदेशी, अविनाश डोंगरे हे पाच जण बळी पडले.

९ ऑगस्ट १९७८ ला दलित, पँथर, भा. रि. प., युवक आघाडी, बंडखोर रिपब्लिकन, रिपब्लिकन पँथर्स या सर्वांची एक समिती 'बौद्ध - दलित अन्याय अत्याचार निवारण समिती' या नावाने स्थापन करण्यात आली. परंतु स्थापने व्यतिरिक्त काही खास कार्य या समितीने केलेले दिसत नाही. नवीन नाव १४ एप्रिल १९७९ ला देण्यात यावे अशी सूचना चळवळीतील उग्र आंदोलकांना केली.

नामांतर प्रकरणी एवढी मोठी दंगल झाल्यानंतर समाजातील निरनिराळ्या व्यक्तींनी त्यावर आपली मते व्यक्त करण्यास व शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. मराठवाडा आणि मराठवाड्याबाहेरील सामान्य व्यक्तीपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत आणि साहित्यिकांपर्यंत लोकांनी आपल्या निरनिराळ्या भूमिका नामांतर दंगलीनंतर स्पष्ट केल्या त्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

प्रा. अरुण कांबळे यांनी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले. अशाच प्रकारची आवाहने युवक क्रांती दल, रिपब्लिकन युवक आणि भारतीय विद्यार्थी परिषदेने केली.

अनेक प्रसिध्द व्यक्तींनी अत्याचारग्रस्त खेड्यांना भेटी दिल्या. त्यात बाबा आढाव, अनिल अवचट, अजित सरदार, अविनाश डोळस, प्रकाश सिरसाट, बाबा दळवी, रा.सू. गवई, एस. टी. प्रधान, डी. एल. हिवराळे, बापूराव जगताप, गंगाधर गाडे, दलित पँथर, मास मुव्हमेंटचे कार्यकर्ते आणि साप्ताहिकाचे, मासिकांचे, वर्तमानपत्रांचे वार्ताहर यांचा समावेश होता.

औरंगाबादच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीने प्राध्यापकांच्या विविध तुकड्या खेड्यात पाठविल्या आणि माहिती संकलित केली. 'नामांतरविरोधी अत्याचारी आंदोलन' या नावाने ती माहिती प्रकाशित केली.

शासकीय पातळीवरूनही मराठवाड्यातील दंगलींचा अभ्यास झाला. केंद्र सरकारने खासदार रामधन यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय मंडळ मराठवाड्यातील दंगलींची माहिती गोळा करण्यासाठी पाठविले होते.

महाराष्ट्र शासनाने आमदार एन. एम. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळ चौकशीसाठी पाठविले होते.

"२७ जुलै ते १० ऑगस्ट १९७८ या १५ दिवसांच्या दंगलीची झळ १५,२५० व्यक्तींना बसली. १७३ दलित गंभीररित्या जखमी झाले. दलितांची ७७४ घरे पूर्णत: उद्‌ध्वस्त झाली. १०३७ घरांची अंशत: नासधूस झाली. सुगावचे जनार्दन मोवाडे, टेंभुर्णीचे पोचीराम कांबळे, जळकोटला पी.एस.आय. भुरेवार यांना ठार मारले. बोळसा येथील दोन दलित महिलांवर बलात्कार करण्यात आला. मराठवाड्यातील १६९ खेड्यात दंगल उसळली. २ कोटी ७ लाख ६९ हजार ३९० रुपयांच्या मालमत्तेची होळी झाली अशी माहिती महाराष्ट्र सरकारने रामधन समितीला सादर केली."[८१]

अनुसूचित जाती, जमाती आयोगानेही मराठवाड्याची पाहणी केली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. शरद पवार यांनी दंगलग्रस्त खेड्यांना भेटी देऊन दलित - बौद्धांना दिलासा दिला. अनेक मंत्री, सामाजिक कार्यकर्ते यांनीही भेटी दिल्या व दंगलग्रस्त भागाची पाहणी केली.

"लंडनमधील बौद्धांनी लंडनमधील उच्चायुक्तांच्या कचेरीवर मोर्चा काढला व निषेध नोंदविला. ब्रिटनमधील उच्चायुक्त श्री. ना. ग. गोरे यांनी ही मराठवाड्यातील दंगलग्रस्त भागाची पाहणी केली."[८२]

नामांतराच्या मागणीवर बोलताना तत्कालिन राज्य गृहखात्याचे मंत्री भाई वैद्य यांनी स्पष्टीकरण दिले की, जरी सरकार विधान परिषदेत पास केलेला ठराव अमलात आणण्यास बांधील असले तरी तो प्रत्यक्ष कृतीत आणल्यास त्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिक्रियांच्या

धोक्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. मात्र ज्या दलितांना दंगलीत उपद्रव पाहोचला आहे त्यांचे पुनर्वसन करण्यास सरकार प्राधान्य देईल. शहरातील दलित नेत्यांनी जे नागरी वातावरणात सुरक्षित आहेत अशांनी निर्वाणीचे इशारे देणे सोपे आहे, परंतु या निर्वाणीच्या इशाऱ्याचा परिणाम खेड्यातील दलितांना भोगावा लागतो. अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

२८-२९ जानेवारी १९७९ रोजी नागसेनवन परिसर, औरंगाबाद इथे भरलेल्या तिसऱ्या दलित साहित्य संमेलनात अध्यक्ष श्री. कमलेश्वर यांनीही नामांतराबाबत अनुकूल भूमिका मांडली.

पद्मश्री प्रा. अनंत कानेकर यांनी 'प्रबुद्ध नायक' मधील मुलाखतीत मराठवाड्यात झालेल्या हिंसाचाराबाबत खेद व्यक्त करून डॉ. आंबेडकर यांनी मराठवाड्यात शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. आपल्या अंगच्या गुणामुळे आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविली. अशा विद्वानाचे नाव विद्यापीठाला देण्याइतका दुसरा आंनद नाही असे मत व्यक्त केले.

नामांतरामुळे निर्माण झालेली विषमता कटुता कमी करण्यासाठी लातूरला विषमता निर्मूलन परिषद १८ ते २० मार्च १९७९ ला भरविण्यात आली. त्याप्रसंगी प्रसिध्द साहित्यिक गं. बा. सरदार, थोर समाजसुधारक बाबा आढाव, डॉ. अनिल अवचट, छाया दातार, म. भि. चिटणीस, ना. य. डोळे, अविनाश डोळस, प्राचार्य जनार्दन वाघमारे यांनी विद्यापीठ नामांतरासंबंधी विषमता निर्मूलन परिषदेच्या वतीने मागणी केली.

ते म्हणाले, *"नामांतराच्या संदर्भात मराठवाड्यात अत्याचार झाले. त्यामुळे समाज प्रबोधनाची चळवळ मागे रेटली गेली. दलित-दलितेतर यांच्यातील संवाद तुटला. त्यांच्यातील संवाद संपला. त्यातून अनेक मूलगामी प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न धसास लावण्याखेरीज समतेसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना चैन पडणार नाही. लोकशाही मार्गाने लोकप्रतिनिधी जे निर्णय घेतात, जे निर्णय घेतले आहेत ते जर बदलले तर जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास उडेल. शिवाय शासन हिंसाचाराला शरण जाणार असेल तर तेच हिंसाचाराला पाठीशी घालते असे होईल. त्यातून अनेक गंभीर व गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतील. यासाठी शासनाने विद्यापीठ नामांतराचा निर्णय त्वरित अमलात आणला पाहिजे."* [८३]

'दलित नेतृत्त्व काल, आज आणि उद्या' या लेखात नामांतरासंबंधी बोलताना भा. ल. भोळे यांनी पुढील विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, डॉ. आंबेडकर हे दलितांचे पुढारी होते किंवा त्यांनी औरंगाबादच्या परिसरात दलितांच्या शिक्षणाचे महान कार्य केले म्हणून त्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिले पाहिजे अशा स्वरूपात यापुढे मागणी होणार नाही तर दलित व दलितेतर या तमाम शोषितांच्या न्याय मागण्या धुडकावून लावणे हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांना वा श्रेष्ठींना यापुढे शक्य होणार नसल्याचे प्रतीक म्हणून नामांतर झालेच पाहिजे अशा स्वरूपात ती मागणी मांडली जाईल.

मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या संदर्भात मत व्यक्त करताना प्रा. एकनाथ आबुज यांनी नामांतर आंदोलन किती तीव्र स्वरूपात होते हे स्पष्ट केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार,

"मराठवाड्यात दलितेतरांनी दलितांविरुध्द केलेली निदर्शने ही महाराष्ट्राच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे. पेशवाईनंतर इतक्या मोठ्या प्रमाणात अत्याचार होण्याची ही पहिलीच घटना आहे. मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि मराठवाडा विकास आंदोलन वगळल्यास मराठवाड्यातील लोकांनी आपल्या भावना एवढ्या तीव्र स्वरूपात कधीही व्यक्त केल्या नव्हत्या" [८४]

२७ जुलै १९७९ रोजी 'विद्यार्थी नागरी समिती'ने एक बैठक बोलावून त्यात चळवळीस पुन्हा उजाळा देण्याच्या दृष्टीने ६ डिसेंबर १९७९ रोजी एका सत्याग्रहाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय नामांतराच्या चळवळीस पाठिंबा असलेल्यांचा एक लाँगमार्च संघटित करण्याचे ठरले. लाँगमार्चमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व सदस्यांनी ६ डिसेंबरला सर्व ठिकाणीहून औरंगाबादला यायचे असे ठरले.

लाँगमार्च व सत्याग्रह आयोजित करण्यामागचा उद्देश सरकारने घेतलेला निर्णय अमलात आणण्यास विलंब लावला आहे त्याविरुध्द असंतोष प्रकट करणे हा होता.

युक्रांद, भीमसेना, दलित पँथर्सचे काही गट, सी. पी. एम., लाल निशाण, छात्र युवा संघर्ष वाहिनी, फॉरवर्ड ब्लॉक, जनता पक्षाची युवा आघाडी, भारिप (गवई गट) यासारख्या निरनिराळ्या संघटनांच्या अनेक नेत्यांनी आणि राजकीय पक्षांनी लाँगमार्चला उत्साहाने पाठिंबा दिला. मुंबईतही त्यासाठी नामांतरवादी कृती समिती स्थापन करण्यात आली. या समितीने सर्व संघटनांशी संपर्क ठेवून पाठिंबा मिळविण्याचे प्रयत्न केले.

या शिवाय सी. पी. आय. (आयटक), सी. पी. एम. (सीटू), एच. एम. एस. या ट्रेड युनियन आणि सर्व श्रमीक संघटनांनीदेखील नामांतराच्या आंदोलनात सहभागी होण्याचे ठरविले.

हुसैन दलवाई यांनी पत्रक काढून मुंबईतून लाँगमार्चसाठी चार हजार कार्यकर्ते सहभागी होतील असे जाहीर केले.

नागपूर येथून जोगेंद्र कवाडे यांनी लाँगमार्चसाठी पाठिंबा व्यक्त करून सहभागी होऊ असे आश्वासन दिले.

पुण्यातील बाबा आढाव यांनी लाँगमार्चचे 'समता दिंडी' असे वर्णन केले. तसेच त्यांनी लोकांना या दिंडीत सामील होण्यासाठी आवाहन केले.

महाराष्ट्रातील पहिला लाँगमार्च नागपूर येथून ११ नोव्हेंबर १९७९ रोजी प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला.

२८ नोव्हेंबर १९७९ रोजी पुण्याहून बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली लाँगमार्च निघाला. रस्त्यावरील अनेक गावांतून या लाँगमार्चमध्ये अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

"लाँगमार्चमध्ये ३० ते ३२ संघटनांनी सहभाग घेतला होता. औरंगाबादला येणारे सर्व रस्ते बंद असूनही औरंगाबादेत हजारोंनी सत्याग्रह केला. पँथरचा त्यात सिंहाचा वाटा होता. शेकडो दलितेतरही त्यात सहभागी झाले होते." ८५

"या लाँगमार्चच्या विरोधात नामांतरविरोधी विद्यार्थी कृती समितीने गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली मूकमोर्चा काढला. या समितीने तयार केलेल्या निवेदनात लोकांना त्यांनी अशी विनंती केली होती की, नामांतरास पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींना सहकार्य देऊ नका. त्यानंतर त्यांनी पंचायत समिती, नगरपालिका, ग्रामपंचायती यांना नामांतरविरोधी ठराव पास करण्यास सांगितले." ८६

१९८० नंतर नामांतर लढा थंड पडल्यासारखा झाला होता. अधूनमधून मागणी व्हायची. जोगेंद्र कवाडेंच्या सभा, पत्रकार परिषदा व्हायच्या. गंगाधर गाडे, अरुण कांबळे, रामदास आठवले यांच्याकडून नामांतराची मागणी होत रहायची.

"१९८०-८२ च्या दरम्यान यूवक आघाडी, यूवक क्रांती दल, दलित पँथर संघटनांनी विद्यापीठ नामांतर प्रश्नाबाबतचा संघर्ष पदयात्रा, मोर्चे, सभा घेऊन चालूच ठेवला. परंतु त्यामध्ये पूर्वीसारखा जोश नव्हता. लढ्याची तीव्रता नाहीशी होत चालली होती. तरीही २४ मे ते ३० मे १९८२ या काळात महाराष्ट्रभर 'जेल भरो' सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहाचे निमंत्रक पँथरचे प्रा. अरुण कांबळे व युक्रांदचे सुभाष लोमटे हे होते.

१५ ऑगस्ट १९८२ या दिवशी नामांतरवादी कृती समितीने मुंबईत एक मोठी परिषद भरविली होती. पुन्हा एकदा विधानसभेत नामांतराचे प्रकरण चर्चेसाठी आले. त्यासाठी मतदान घेण्यात आले. परंतु पुरेशा पाठिंब्याअभावी तो प्रस्ताव नामंजूर झाला. त्यादिवशी विरोधी पक्षांचे बरेचसे सदस्य गैरहजर होते (३१ पैकी १२ उपस्थित होते.)" ८७

१९८३ च्या दरम्यान नामांतरासाठी वर्षभरात नामांतर परिषदा घेण्यात आल्या. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथे विभागीय परिषदा घेण्यात आल्या. तसेच प्रत्येक जिल्हा, तालुका पातळीवरही नामांतर परिषदा घेण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनाच्या (उन्हाळी, पावसाळी, हिवाळी) कधी पहिल्या दिवशी तर कधी शेवटच्या दिवशी नामांतरासाठी पँथरने लाखोच्या संख्येने मोर्चे काढले.

सर्व मंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यात प्रवेशबंदी करण्यात यावी असे पत्रक पँथरने काढून कार्यकर्त्यांसाठी प्रत्येक छावणीला पाठवले. परिणामी आमदार, खासदार, मंत्र्यांना मराठवाड्यात घेराव घालण्यात आले. निदर्शने झाली आणि नामांतराची लढाई सुरूच ठेवली गेली.

दलित पँथरच्या अखिल भारतीय पातळीवरील अधिवेशनात दिल्ली १९८०, मुंबई १९८४ नामांतर ठरावाची अंमलबजावणी करावी अशी जोरदार मागणी करण्यात आली. तसेच राज्य पातळीवरील झालेल्या अधिवेशनात या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

१९७८ नंतरच्या प्रत्येक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर कधी माईसाहेब आंबेडकराच्या नेतृत्वाखाली तर कधी रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली पँथरने पाच-पाच हजारांचे मोर्चे काढून साहित्य संमेलनातील इतर ठरावांबरोबर नामांतर ठरावाची अंमलबजावणी करा या मागणीसाठी दबाव आणला तर कधी चर्चा करून यश मिळविले. विशेषत: गं. बा. सरदार, शंकरराव खरात, शंकर पाटील यांनी नामांतराच्या बाजूने कौल दिला.

"२७ जुलै १९८५ रोजी मुंबई प्रदेश दलित मुक्ती सेनेच्या वतीने प्रचंड धडक मोर्चा विधानसभेवर नेण्यात आला. प्रा. जोगेंद्र कवाडे आणि हाजी मस्तान मिर्झा यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात हजारो स्त्री-पुरुष आबालवृध्द सामील झाले होते. नामांतरासाठी संपूर्ण देशात दलित व उपेक्षितांचा उग्र लढा उभा होण्यापूर्वी शासनाने नामांतर घडविण्याचा शहाणपणा दाखवावा असा इशारा यावेळी झालेल्या जाहीर सभेत श्री. कवाडे यांनी दिला."[८८]

"२८ मे १९८६ ला 'राख सांभाळून ठेवा राख झालेल्या घरांची!' सुरू झाली पुन्हा लढाई यार हो नामांतराची' ही जाहीर घोषणा देऊन पन्नास हजारांचा मोर्चा मंत्रालयावर नेऊन नामांतर ठरावाची अंमलबजावणी करावी अशी मागणी शिष्टमंडळाने केली."[८९]

नामांतर ठरावाच्या अंमलबजावणीसाठी पँथरने कधी कायदेशीर तर कधी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब केला. महाराष्ट्र विधानभवनात पँथर्सनी दोन वेळा उड्या टाकल्या होत्या. अनेकवेळा पत्रके उधाळली होती. काही वर्षे सतत विधानभवनात एक प्रकारचा ताण राहत असे.

"२७ जुलै १९८८ रोजी 'दहा वर्षांपूर्वी विधिमंडळाने संमत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी शासनाने करावी, या एकमेव मागणीसाठी दलितांच्या सर्व संघटनांच्या एकजुटीतून निर्माण झालेल्या 'डॉ. बाबासाहेब विचार संवर्धन समिती'च्या वतीने लक्षावधी भीमसैनिकांचा विराट नामांतर मोर्चा अझाद मैदानावरून विधानसभेवर नेण्यात आला. प्रा. जोगेंद्र कवाडे, रामदास आठवले, रा. सू. गवई, डॉ. बाबासाहेब गोपले, नामदेव ढसाळ, भाई संगारे, दलित मुस्लिम सुरक्षा महासंघाचे नेते हाजी मस्तान मिर्झा यांच्या नेतृत्वात निघालेल्या मोर्चात लक्षावधी लोक सामील झाले. होते."[९०]

१९९२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी साजरी झाली. यानिमित्ताने या महापुरुषाच्या अलौकिक कार्याची चर्चा देशभर झाली. त्यांना मरणोपरांत 'भारतरत्न' दिला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव बिहार व आंध्र प्रदेश राज्यांतील विद्यापीठांची नावे बदलून देण्यात आले. महाराष्ट्रात तसे काही झाले नाही. नामांतराचा प्रश्न सुटला नसल्यामुळे या पुढच्या काळात विद्यापीठ नामांतराच्या मागणीसाठी वातावरण तापत गेले.

७ जुलै १९९२ रोजी नामांतर संघर्ष समिती द्वारा विधानभवनाला घेराव घालताना पोलिसांनी कार्यकर्त्यांवर बेछूट गोळीबार केला. त्यात जोगेंद्र कवाडे, गंगाधर गाडे, नामदेव ढसाळ हे गंभीर जखमी झाले.

या घटनेची प्रतिक्रिया दुसऱ्याच दिवशी उमटली. विधान परिषदेत अण्णा डांगे, रा.सू. गवई यांच्या नेतृत्वात भाजपच्या सर्व सदस्यांनी सभात्याग केला.

२७ जुलै १९९२ पासून नामांतर संघर्ष समितीने जेलभरो आंदोलनाचा इशारा दिला. शेकडो कार्यकर्त्यांनी स्वत:ला अटक करवून घेतली.

१५ ऑगस्ट १९९३ पासून रिपब्लिकन पक्षाचे (खो. गट) आमदार उपेंद्र शेंडे यांनी नामांतराच्या मागणीसाठी उपोषण सुरू केले. विविध पक्षांच्या नेत्यांनी उपोषण मंडपास भेट देऊन आपला पाठिंबा व्यक्त केला प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी मा. मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतर ठरावाची अंमलबजावणी करुन पुढील अनर्थ टाळावा असे आवाहन केले.

एकीकडे आमदार उपेंद्र शेंडे यांचे उपोषण तर दुसरीकडे महाराष्ट्र शासनाच्या उदासीनतेबद्दल संताप याचा प्रत्यय म्हणून ठिकठिकाणी उपोषणाला सुरुवात झाली. या तापलेल्या वातावरणात अचानक पक्षाच्या केंद्रीय नेत्यांच्या विनंतीवरून मुख्यमंत्री शरद पवार यांनी १२ सप्टेंबर १९९३ ला नामांतराच्या संदर्भात विचार-विनिमय करण्याकरिता सर्वपक्षीय बैठक बोलाविण्यात येणार असल्याचे सांगितल्यावरून आ. शेंडे यांनी २१ ऑगस्ट १९९३ रोजी आपले उपोषण मागे घेतले.

१२ सप्टेंबर १९९३ रोजी मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलाविली. या बैठकीत नामांतर आणि मराठवाडा विकास या दोन्हीचा विचार करण्यासाठी एक समिती जनता दलाचे खासदार बापूसाहेब काळदाते यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली. या समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची हमी मुख्यमंत्र्यांनी दिली तर नामांतरवादी नेत्यांनी नामांतराचा निर्णय आजच घ्या अशी मागणी केली.

नंतरच्या काळात गणेशोत्सव असल्यामुळे शांतता व सुव्यस्थेच्या प्रश्नामुळे २४ सप्टेंबरला समितीची बैठक होऊ शकली नाही. दरम्यान, ३० सप्टेंबरला मराठवाड्यात भूकंप झाला व भूकंपानंतरच्या पुनर्वसन कामामुळे खा. काळदाते यांची समिती नियोजित काळात आपले कार्य पूर्ण करू शकली नाही.

२५ नोव्हेंबर १९९३ रोजी नांदेड येथे गौतम वाघमारे या तरुणाने नामांतराच्या मागणीसाठी आत्मदहन केले. या घटनेकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. त्याच्यापाठोपाठ महाराष्ट्रात इतर ठिकाणी ही आत्मदहनाचे प्रकार घडले. प्रतिभा तायडे (अकोला), सुहासिनी बन्सोडे (भंडारा), पो. कॉ. नारायण गायकवाड (सोलापूर) इत्यादींनी आत्मदहन केले.

गौतम वाघमारेच्या आत्मदहनाच्या घटनेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे समितीवर सोपविलेले कार्य पूर्ण होईलच असे वाटत नाही असे मत खा. बापुसाहेब काळदाते यांनी व्यक्त केले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी मुख्यमंत्री शरद पवार यांनी व्यापक बैठक घेऊन त्यासाठी योग्य ती कारवाई करावी असे जाहीर केले.

महाराष्ट्रातील आत्मदहनाचे तीव्रतर प्रकार, नामांतरवाद्यांचे भव्य मोर्चे यामुळे या प्रश्नाकडे मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष घातले.

दि. ७ जानेवारी १९९४ रोजी मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्यातील सर्व गावांतील सरपंचांना पत्र पाठवून नामांतराबाबतची भूमिका समजावून सांगितली व सहकार्य करण्याचे आवाहन केले.

ड) नामविस्तार घोषणा :

दि. १३ जानेवारी १९९४ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी ७.४५ वाजता दूरदर्शनवरून जनतेला शांतता, संयम व सामंजस्य राखण्याचे आवाहन केले आणि विद्यापीठ नामविस्ताराची घोषणा केली. विद्यापीठाची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने विद्यापीठात जादा अभ्यासक्रम सुरू करण्याचे ठरले. त्यामध्ये

१) डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, आवश्यक त्या अध्यापक वर्गासह मान्यता.

२) डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, आवश्यक त्या अध्यापक वर्गासह मान्यता.

३) कोर्स ऑफ मास्टर ऑफ टुरिझम, आवश्यक त्या अध्यापक वर्गासह मान्यता.

४) परीक्षा भवन व ड्रामा डिपार्टमेंटस्साठी आवश्यक त्या वास्तूंची उभारणी

५) जात, धर्म यांचा विचार न करता आर्थिकदृष्टया कमकुवत गरीब वर्गातील गुणी विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' योजनेनुसार सहाय्य.

काही विद्यापीठांना आर्थिक सहाय्य, ज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक, अमरावती विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांचा समावेश होता.

नांदेड येथे नवीन विद्यापीठ व त्याला थोर स्वातंत्र्यसेनानी रामानंद तीर्थ यांचे नाव देण्याची घोषणा केली. तसेच दंगल काळात बोलचालीतून दाखल झालेले खटले काढून घेण्यात येतील, मात्र मारहाण, जाळपोळ, अत्याचारापैकी खटले काढले जाणार नाहीत. हे धोरण संपूर्ण राज्याला लावले जाईल व सामाजिक सलोख्यासाठी या धोरणाला सर्व बाजूंनी साथ मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

१४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांच्या सहीनिशी एक अध्यादेश जाहीर करून त्याच दिवशी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करण्यात आला.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नाबाबत नामांतरवादी आणि नामांतर विरोधकांच्या भूमिका :

मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाबद्दल नामांतरास अनकूल असणारे व विरोधकांच्या भूमिकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

सुरुवातीस नामांतराच्या बाजूने २१ युवक संघटनांनी पाठिंबा व्यक्त केला. होता. तसेच साहित्यिकांपैकी, गं. बा. सरदार, विजय तेंडुलकर, कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर, पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नारायण आठवले, मोहन धारिया, मृणाल गोरे या मंडळींनी नामांतरास आपला पाठिंबा व्यक्त केला होता.

62.1



नामविस्तारानंतर विद्यापीठ गेट

एस. एम. जोशी यांनी नामांतराबाबात पुढील मत व्यक्त केले.

"शिवाजी, टिळक, जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही महाराष्ट्राची चार कुलदैवते आहेत. पैकी तिघांची नावे विद्यापीठाला मिळाली आहेत. चौथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास द्यावे ही मागणी नि:संशय योग्य आहे." [११]

प्रा. म. भि. चिटणीस यांच्या मते,

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्यात शिक्षणाच्या विकासाचा पाया घातला. १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयाचे उद्घाटन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर केले होते की, अनुसूचित जाती-जमातींमधील कनिष्ठ, मध्यमवर्गीयास शिक्षणाची दारे खुली व्हावीत यासाठी हे महाविद्यालय उघडण्यात येत आहे. त्यावेळेस त्यांनी या भागात एक विद्यापीठही चालू शकेल अशी भविष्यवाणी केली होती. विद्यापीठ स्थापन झाले तेंव्हा दलित जाती-जमातींचे व इतर मागासवर्गीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रमाण १० ते १२% होते. १९७७-७८ साली हे प्रमाण २२ ते २५% पर्यंत वाढले आहे. दलित व मागासवर्गीय पदवीधरांची संख्या विद्यापीठ स्थापनेच्या काळात अत्यल्प म्हणजे १०० च्या आत होती. ती संख्या आता हजारोंच्या संख्येने मोजण्याइतपत गेली आहे. आज मराठवाड्यातील महाविद्यालयीन दलित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांचे प्रमाण भारतातील इतर कोणत्याही विद्यापीठापेक्षा अधिक आहे." [१२]

प्रसिध्द हिंदी साहित्यिक श्री. कमलेश्वर यांच्या मते,

"तामिळनाडूत मद्रास विद्यापीठाचे नाव 'रामचंद्र नायकर' व मदुराई विद्यापीठाचे नाव 'कामराज' ठेवण्यात आले. हे दोघेही क्षत्रिय वर्गाचे होते. त्यासाठी कोणीही हरकत घेतली नाही. जे तामिळनाडूत घडते ते महाराष्ट्रात का घडू नये? मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करतांना या प्रदेशाची अस्मिता आड येते; पण ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला घटना दिली त्यांच्याबद्दलची अस्मिता या प्रदेशापेक्षा लहान आहे काय?" [१३]

डॉ. विनायकराव मोरे यांच्या मते,

"ज्ञानेश्वरांचा व त्यांच्या भावंडांचा छळ झाला तो याच मराठवाड्यामध्ये, शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला विरोध करण्याचा कट प्रथम इथेच शिजला व आता एका विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साधे नाव देण्यास विरोध करण्यासाठी येथील बहुजन समाज स्वत:ला धन्य समजत आहे. संभाजीचा क्रूरपणे वध करणाऱ्या औरंगजेबाचे नाव औरंगबादला; पण ज्यांच्या महत्प्रयत्नाने ज्या ओसाड भागात ज्ञानगंगा अवतरली त्या डॉ. आंबेडकरांच्या नावाला विरोध हा केवढा दैवदुर्विलास!" [१४]

बा. भ. बोरकर यांनी पुढील मत व्यक्त केले. ते म्हणतात,

"मराठवाड्यातील दंगली या ज्ञानेश्वरांपासून परंपरा असलेल्या मराठी साहित्याचा पराभव आहे. माणसानेही माणसाचा द्वेष करावा ही शरमेची गोष्ट आहे. माणसामाणसांतील ही दरी बुजविण्याचा उपाय साहित्यिकांनी शोधून काढला पाहिजे." [१५]

मु. श. किर्लोस्कर,

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात एवढे मोठे आहे की, त्यांच्या नावाचा लाभ आपणास घडत आहे याचा अभिमान कोणत्याही संस्थेस वाटावा. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देणे हा त्या विद्यापीठाचाच गौरव आहे." [१६]

कवी कुसुमाग्रज यांच्या मते,

"देशातील अनेक विद्यापीठांना आणि तत्सम संस्थांना थोर नेत्यांची आणि विचारवंतांची नावे देण्यात आली आहेत. आजही दिली जातात. अशा परिस्थितीत डॉ. आंबेडकरांच्या बाबतीतच नव्याने हा मुद्दा उपस्थित करणे गैर आहे." [१७]

श्री. ना. ग. गोरे यांच्या मते,

"युवकांनी दोन हजार वर्षांची परंपरा न सांगता नव्या प्रश्नांना - नव्या आव्हानांना सामोरे जावे. खडकीचे औरंगाबाद झाले, देवगिरीचे दौलताबाद झाले, धाराशीवचे उस्मानाबाद झाले, अंबाजोगाईचे मोमिनाबाद झाले तर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर का होऊ शकत नाही?" [१८]

"घरात नाही पीठ आणि मागतात विद्यापीठ' असे नामांतरवाद्यांच्या, दलितांच्या दारिद्र्यावर बोट ठेवण्यात आले. पण तेवढ्याच निर्धाराने आणि स्वाभिमानाने नामांतरवाद्यांनी उत्तर दिले 'नसेल आमच्या घरात पीठ' पण आम्हाला हवं आहे विद्यापीठ." [१९]

जर हिंसाचाराचे-असंतोषाचे कारण दाखवून हळूहळू नामांतराची मागणी डावलण्यात येणार असेल तर दलितांचा घटनात्मक मार्गावरील विश्वास उडेल. नामांतराचा संघर्ष हा समानता, नागरी हक्क आणि मानवतावादी वागणूक मिळावी म्हणून आहे असे नामांतरवाद्यांचे म्हणणे होते. उच्च जातीतील एखाद्या व्यक्तीचे नाव जर विद्यापीठाला ठेवायचे असते तर कोणीही त्यास विरोध केला नसता असेही काहींना वाटत होते.

एकंदरित नामांतरवाद्यांनी निर्धाराने हा लढा लढविला.

याउलट नामांतराच्या विरोधात जे आंदोलन उभे करण्यात आले होते त्यामागे विद्यार्थी कृती समिती उभी होती. या चळवळीच्या अग्रभागी औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या 'मराठवाडा' दैनिकाचे संपादक अनंत भालेराव, मराठवाड्यातील माननीय स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक कार्यकर्ते पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ, नांदेड येथील पीपल्स कॉलेजचे

प्राचार्य नरहरराव कुरुंदकर ही मंडळी होती. त्यांचा विरोध करण्यामागील एक महत्त्वाचा मुद्दा असा होता की, नामांतराचा निर्णय हा सुरुवातीस मराठवाड्यातील लोकांच्या भावनांचा विचार न करता, त्यांना विश्वासात न घेता घेण्यात आला आहे. तसेच या समितीच्या नेत्यांचे असे ही म्हणणे होते की, या भागातील लोकांच्या भावनेचा आदर राखला पाहिजे.

सुरुवातीस असे दिसून येते की, केवळ नामांतराच्या मागणीच्या श्रेयावरून सर्वपक्षीय विद्यार्थी समितीमध्ये फूट पडली, परंतु नंतर नामांतरास अनेक बाजूने विरोध केला गेला. त्यामध्ये दलित पँथर एकीकडे व बाकी सर्व संघटना एकीकडे अशी स्थिती झाली. नामांतरविरोधी मराठवाडा कृती समितीची स्थापना करून जोरदार विरोध करण्यात आला. विरोध करताना व्यक्त झालेल्या मतांचा ऊहापोह खालीलप्रमाणे करता येईल.

मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या मागणीला विरोध करताना नामांतरविरोधी नागरिक कृती समितीचे सदस्य श्री. स. दि. महाजन यांनी खालील प्रमाणे मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात,

"नामांतर ही मागणी केवळ महारांची मागणी आहे, सर्व अस्पृश्यांची नाही. दलितांच्या या मागणीमागे खरा उद्देश आहे भारताची दुसरी फाळणी करून दलितस्थान निर्मिणे म्हणून खरा लढा आहे. दलितांविरोधी अखंड भारताचा, बौध्दविरोधी हिंदू धर्माचा. हा दुसरा पाकिस्तान होऊ द्यावयाचा नसेल तर सर्व दलितेतर जातींनी व सर्व नवबौध्देतर धर्मीयांनी एकत्र होऊन दलितांना धडा शिकवला पाहिजे. नामांतर लादण्याचा प्रयत्न झाल्यास दलितांची शेवटची झोपडीही जळेल." [१००]

मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या संदर्भात बोलतांना श्री. शिवाजी मुंढे यांनी शासन आणि दलितांना दोष दिलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार,

"दलित जनतेने वैचारिक बुध्दीचा किंचितही वापर केलेला नाही. स्त्रीमुक्ती चळवळ आणि शिक्षणाचे मानकरी ज्योतीबा फुले, 'एक गाव एक पाणवठा' चळवळीचे शाहू महाराज यांनी दलितांसाठी केलेल्या सुधारणा यांच्या नावाचा उल्लेख न करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या हा अट्टाहास कशासाठी?

ते पुढे म्हणतात, मराठवाडा हे नाव पाच जिल्ह्यांचे प्रादेशिक नाव आहे. दलितांसाठी डॉ. आंबेडकरांनी ज्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत त्या फक्त मराठवाड्यापुरत्याच नाहीत. त्यामुळे पाच जिल्ह्यांपुरते त्यांचे नाव व्यापक होऊ शकणार नाही. मराठवाडा विद्यापीठ स्थापनेच्या वेळी जे नाव दिले गेले ते आता बदलणे शक्य नाही. मुलाच्या बारशाच्या दिवशी एक आणि म्हातारपणी दुसरे नाव ठेवून कसे चालेल?" [१०१]

दैनिक मराठवाडाचे संपादक अनंत भालेराव यांनी नामांतराला विरोध करताना पुढील मत व्यक्त केले. त्यांच्या मते,

"आंबेडकरांचा जन्म, त्यांचे सार्वजनिक जीवन, चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा राममंदिर प्रवेश, बौद्ध धर्माची दीक्षा इ. महत्त्वाच्या घटना त्यांच्या हयातीत मराठवाड्याबाहेरच घडल्या. शिक्षण प्रसाराच्या कार्याला प्रारभंही त्यांनी मुंबईत सुरू केला. याखेरीज दलित व बौध्द धर्मीयांची अधिक संख्या तुलनेने मराठवाड्यापेक्षा विदर्भात जास्त आहे त्या भागातील लोकांना आंबेडकरांचे ऋण आणि त्यांच्या स्मृतीची काहीच गरज वाटत नाही का?" [१०२]

नामांतराला विरोध करताना असेही प्रतिपादन केले की,

"नामांतराची मागणी व लढा हा मराठवाडा वगळून इतर लोकांनी सुरू केला. आंबेडकर हेदेखील मराठवाड्याचे नव्हते. नामांतराला विरोध करताना त्यांनी असेही स्पष्ट केले की, नामांतराला विरोध करून आम्हाला बाबासाहेबांचा अनादर करायचा नाही. उलट मराठवाड्यात जर एखादे तंत्रशिक्षणाचे विद्यापीठ किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील कायदेशिक्षणाचे अभ्यास केंद्र त्यांचे स्मारक म्हणून उभे राहणार असेल तर त्यासाठी आम्ही पूर्णपणे सहकार्य करू."[१०३]

नामांतरविरोधकांचे असे म्हणणे होते की, आम्ही कुठल्याही नावास विरोध केला असता. कारण त्यामुळे मराठवाड्याची सांस्कृतिक अस्मिता आणि भावनिक ऐक्य यांचा ऱ्हास झाला असता. त्यांच्यादृष्टीने कृषी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी मान्यता देण्यास विलंब लावणे, मराठवाड्यातील व्यक्तीची मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती न होणे, मराठवाड्याच्या विकासाकडे मोठे दुर्लक्ष होणे असे एकावर एक अन्याय मराठवाड्याच्या लोकांवर होतच आहेत. मग त्यात ही भर कशाला? विद्यार्थी समितीच्या नेत्यांनी सरकारला अशींही धोक्याची सूचना दिली होती की, त्यातून जर मोठा संघर्ष उभा राहिला तर तो मराठवाड्याचे लोक आणि महाराष्ट्रातील इतर भागातील लोक व विदर्भ त्यांच्यात होईल.

या समितीच्या नेत्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, नामांतराची मागणी करणारे जे दलित नेते आहेत ते मराठवाड्याच्या बाहेरचे आहेत. खरे पाहता येथील दलित हे नामांतराला विरोध करीत आहेत. नामांतरविरोधकांच्या मते, मराठवाडा विद्यापीठात जे दलित विद्यार्थी आहेत त्यातील बरेचसे विद्यार्थी हे विदर्भातील आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील दलितांना अजूनही शैक्षणिक सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक मराठवाड्याबरोबरच महाराष्ट्रात झाले तर योग्य. कोणतेही स्मारक सर्वानुमते करावे अशी गोविंदभाई श्रॉफ यांची नामांतराला विरोध करतानाची भूमिका होती. या भूमिकेला नामांतरविरोधी समितीचा पाठिंबा होता." [१०४]

अनंत भालेराव यांच्या म्हणण्यानुसार, "दलितांनी वापरलेली अश्लील व निंदाव्यंजक भाषा तसेच त्यांच्या नेत्यांनी हिंदू देवदेवतांविरुध्द काढलेल्या गलिच्छ उद्‌गारांमुळे नामांतरप्रकरणी दलित आणि बिगर दलित यांच्यातील तेढ वाढली."[१०५]

नामांतरविरोधी समितीच्या नेत्यांना विशेषत: काही गटास अशीही भीती वाटत होती की, भविष्यात हे विद्यापीठ बुद्धवादी होईल विद्यापीठात आंबेडकरांचे फोटो लागतील, डिग्रीवरती आंबेडकरांचे फोटो लागतील. असे मत रिपाइं नेते रा.सू. गवई यांनी दिलेल्या एका मुलाखतीत व्यक्त केले.

नामांतरविरोधकांच्या मते,

"दलित नेते हे नागरी हक्क संरक्षण कायद्याचा गैरफायदा घेत आहेत. दलित पँथर्स, मास मुव्हमेंट व भारिपच्या नेत्यांची विचार करण्याची व कार्य करण्याची पध्दत समाजात सामाजिक सुसंवादाचे वातावरण तयार करून त्यांना समानता प्रदान करेल अशा स्वरूपाची नव्हती तर हानिकारक होती." [१०६]

असा निष्कर्ष डॉ. मुरुगकरांच्या अभ्यासातून स्पष्ट झालेला आहे.

२७ जुलै १९७८ ला महाराष्ट्र शासनाने पास केलेला नामांतराचा ठराव आणि मराठवाडा महाविद्यालयीन कृती समितीने दिलेली मराठवाडा बंदची घोषणा या दोन्ही घटना मराठवाड्यातील दंगलीला जबाबदार ठरल्या.

नामांतर मागणीच्या श्रेयावरून दलित आणि दलितेतर संघटनांत निर्माण झालेली फूट ही पण नामांतर आंदोलनाला जबाबदार ठरलेली दिसते.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या बाजूने असणाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देणे कसे योग्य आहे हे सांगण्यासाठी विद्यापीठाच्या नावाची यादी व राज्यांची यादी दिली आहे. तसेच मराठवाडा विभागातील गावांची नावे कशी बदलली गेली? मग विद्यापीठाचे नाव का बदलू नये? असाही प्रश्न उपस्थित केलेला आढळून येतो.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाच्या काळात एस. एम. जोशी आणि खा. बापूसाहेब काळदाते यांना वगळले तर मराठवाड्यात एकही आमदार किंवा खासदार आले नाहीत. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा निर्णय होण्याअगोदर आमदारांनी आणि खासदारांनी मराठवाड्यात फिरून नामांतरास अनुकूल वातावरणनिर्मिती केली नाही.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनासाठी निरनिराळे घटक जबाबदार ठरलेले आहेत. नामांतर न होऊ देण्यासाठीची जेवढी जिद्द दलितेतर समाजात होती तेवढीच जिद्द नामांतर घडवून आणण्यासाठी दलित समाजात होती असे दिसते. सुरुवातीपासून दलितांनी शांततेने आपले आंदोलन चालू ठेवले. कुठेही हिंसा अथवा जाळपोळ लुटालूट केलेली दिसत नाही; परंतु आत्मदहनाचा मार्ग अवलंबिलेला दिसतो.

नामांतरविरोधकांनी काही दिवसच नामांतरविरोधी लढा लढविला; पण जेवढे दिवस लढा सुरू होता तेवढे दिवस प्रचंड प्रमाणात हानी केली असे दिसून येते.

नामांतर लढ्याविषयी राजकीय पक्षांच्या भूमिका :

विद्यापीठ नामांतर लढ्यात सुरुवातीस विद्यार्थी संघटना सहभागी असल्या तरी नंतर अनेक संघटना व राजकीय पक्ष नामांतराच्या बाजूने व विरोधी बाजूने लढ्यात उतरलेल्या दिसतात.

राजकीय पक्ष निरनिराळ्या परिस्थितीत निरनिराळ्या पातळीवर आपली राजकीय उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी वेगवेगळे पवित्रे घेत होते.

"सुरुवातीस सर्वच राजकीय पक्षांनी नामांतरास पाठिंबा दिला असला तरी नंतर काही जण बदलले. काहींनी राज्य पातळीवरून पाठिंबा दिला तर स्थानिक पातळीवरून विरोध केला असे दिसते. नामांतराची मागणी पुढे आली तेव्हा सत्ताधारी पक्षाने (काँग्रेसने) या मागणीला पाठिंबा दिला. त्यानंतर सत्तेवर आलेल्या पक्षाने या मागणीचा स्वीकार केला. सर्वपक्षीय विद्यार्थी संघटनांनीसुध्दा सुरुवातीस मागणीस पाठिंबा दिला, जनता पक्षानेदेखील या मागणीस पाठिंबा दिला. कम्युनिस्ट पक्षाची अवस्था मात्र गोंधळात असल्यासारखी होती. त्यांनी राज्य पातळीवरून पाठिंबा व्यक्त केला होता तर विभागीय पातळीवरून तीव्र विरोध केला. शेतकरी कामगार पक्षानेही असाच दुटप्पीपणा दाखविला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांनी प्रारंभिक अवस्थेत नामांतरास दिलेला पाठिंबा हा त्यांचा तात्कालिक संधीसाधुपणाच होता असे दिसते. कारण दलितविरोधी दंगलीत या गटांनीही दलितांवर आक्रमण घडवून आणण्यास तसेच संघर्ष आणि तणाव पराकोटीला पोहोचविण्यात बराच पुढाकार घेतला. माजी समाजवाद्यांची भुमिका हीसुध्दा दुटप्पीच दिसते. मराठवाड्यातील एका नामवंत समाजवादी नेत्याने नामांतराच्या बाजूने आंदोलनास पाठिंबा दिला आणि दलितांना स्वतंत्र विद्यापीठ द्यावे असेही सुचविले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि लालनिशाण गटाने नामांतर व्हावे अशी भूमिका राज्य पातळीवर घेतली. त्यांनी दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध केला आणि अकार्यक्षमतेबद्दल पोलिस यंत्रणेवर टीका केली. शेतकरी कामगार पक्षाचे नेते श्री. उध्दवराव पाटील यांनी नामांतरास पाठिंबा दिला; मात्र विभागीय पातळीवर त्यांच्यातील एक गट नेहमीच नामांतरविरोधी राहिला."[१०७]

मोइन शाकीर यांनी म्हटल्याप्रमाणे,

"राजकारण्यांनी नामांतराचा प्रश्न मुद्दामच भिजत घोंगडे ठेवला. कारण कुठल्याही प्रकारचा अंतिम निर्णय घेणे आणि प्रकरण संपविणे यामुळे त्यांचे राजकीय हित व निवडणूक व्यूहरचना धोक्यात आली असती."[१०८]

यावरून असे म्हणता येइल की, राजकीय पक्षांनी फायदेशीर वाटतील तशा विविध पातळ्यांवर वेगवेगळ्या भूमिका घेतल्या.

मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनातील दलित पँथरची भूमिका :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे औरंगाबाद येथील शैक्षणिक कार्य लक्षात घेऊन त्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठास द्यावे ही भूमिका दलित पँथरने स्वीकारली. सुरुवातीस महाड येथील संमेलनात ठराव पास करून मागणी करण्यापासून ते नामविस्तार होईपर्यंत ही संघटना नामांतर मागणीचा आग्रह धरून होती.

औरंगाबादला दलित पँथरबरोबर युवक क्रांतीदल, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, दलित युवक आघाडी, कम्युनिस्टांच्या सर्व युवक संघटना, युवक काँग्रेस इत्यादी दलित व दलितेतर युवकाच्या संघटनांनी १८ जुलै १९७७ रोजी विद्यापीठावर मोर्चा नेऊन इतर मागण्यांबरोबर नामांतराची मागणी केली होती. सुरुवातीस सर्वच संघटना एकत्र होत्या; परंतु नामांतर मागणीच्या श्रेयावरून दलित पँथर व दलितेतर इतर संघटना यांच्यात फूट पडली. सुरुवातीस सर्वच दलित नेत्यांनी नामांतराच्या मागणीस पाठिंबा दिला; परंतु जेंव्हा कांबळे गटाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' या नावाला संमती दिली तेव्हा ढाले-ढसाळ यांनी विरोध केला. याप्रकरणी पुढे काय कृती करावी यासबंधी दलित नेतृत्वात मतभेद सुरू झाले. नामांतर ठरावाच्या अंमलबजावणीस उशीर लागत आहे असे लक्षात येताच पँथर गटाचे कांबळे, ननावरे व संगारे हे अस्वस्थ झाले. त्यांनी मुंबईच्या पश्चिम उपनगरात सभा, धरणे, मोर्चा काढून आपल्या मागणीचा पाठपुरावा केला.

१५ ऑगस्ट १९७८ ला पँथरने नामांतराच्या मागणीसाठी मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रचंड मोर्चे काढले. विशेषत: औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड या जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने लोक मोर्चात सहभागी झाले होते.

१५ ऑगस्ट १९७८ रोजीच मुंबई येथे कांबळे यांनी ४ हजार पँथर्ससह राजभवनावर मोर्चा नेला व राज्यपालांना निवेदन सादर केले. या निवेदनात नवबौध्दांना जनावरांपेक्षाही वाईट जीवन जगावे लागते. तेव्हा हजारो नवबौद्ध भारतीय नागरिकत्त्वाचा त्याग करतील असा उल्लेख निवेदनात करून नामांतराची मागणी केली. तसेच निवेदनात अशीही धमकी दिली की, दलित समाज स्वत:करता वेगळे दलितस्थान मागेल.

"पँथर्स नेत्यांनी नामांतराचा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरताच मर्यादित न ठेवता भारतभर नेला. दिल्ली, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, गोवा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू या राज्यांतून नामांतरासाठी मोर्चे काढले." [१०१]

नामांतराचा प्रश्न हा सामाजिक प्रश्न असून तो समतेच्या लढ्याचा एक भाग आहे या भूमिकेतून त्यांनी या प्रश्नाकडे पाहिले व दिल्लीमधील तत्कालीन सत्ताधारी जनता पक्षाच्या सरकारला नामांतर प्रश्नाची दखल घेण्यास भाग पाडले.

१९७९ मध्ये नागपूरच्या नामांतरवादी कृती समितीने प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखाली लाँगमार्च काढला. तसेच मुंबई, पुणे, नाशिक येथूनही लाँगमार्च काढण्यात आले.

१ डिसेंबर १९७९ रोजी संगारे आणि महातेकर या दलित पँथरच्या एका गटाने तत्कालिन मंत्री उत्तमराव पाटील यांच्या केबिनमध्ये शिरून घेराव घातला.

२४ मे ते ३० मे १९८२ या काळात दलित पँथरचे अरुण कांबळे व युक्रांदचे सुभाष लोमटे यांच्या नेतृत्वाखाली नामांतरासाठी महाराष्ट्रभर 'जेलभरो' सत्याग्रह करण्यात आला.

संगारे व महातेकर हे नामांतराचे आग्रही असले तरी नवीन नावामध्ये 'मराठवाडा' शब्द वापरण्यास त्यांचा विरोध होता. त्यांच्या गटानेही नामांतराच्या मागणीसाठी मोर्चे काढून पाठपुरावा केला. तसेच विद्यार्थी कृती समितीच्या जातीयवादी सदस्यांना, जे नामांतरविरोधी अंदोलन पसरवीत होते त्यांना अटक करण्याची मागणी केली.

ढाले-ढसाळ यांनी सुरुवातीस नामांतराच्या मागणीस पाठिंबा दिला; मात्र नंतर आपला पवित्रा बदलला. सरकारने जेव्हा परभणी किंवा कोकण येथे डॉ. आंबेडकर यांच्या नावाने नवीन विद्यापीठ सुरू करण्याचे जाहीर केले तेव्हा त्यास ढालेंनी विरोध करून तसे करण्याची जरूर नसल्याचे म्हटले.

महाराष्ट्र दलित पँथरचे सचिव गंगाधर गाडे यांनी एका वार्ताहर परिषदेत सांगितले की,

"सबंध वर्षभर पँथरने अहिंसक मार्गाने शांततापूर्णरित्या मोर्चे काढले, निदर्शने आयोजित केली आणि सत्याग्रह केला. इतकेच नव्हे तर नवीन नावात 'मराठवाडा' शब्द कायम ठेवण्यासही मान्यता दिली. तरीही सरकार आमची मागणी मान्य करीत नाही. त्यांनी असाही अरोप केला की, नामांतरास विरोध हा केवळ दलितांवर अत्याचार करण्यासाठीचा एक बहाणा आहे. गावातील उच्चवर्गीयांच्या छळाला त्रासून येथील दलित ग्रामस्थ भिऊन शहराकडे स्थलांतर करू लागले आहेत."[११०]

एकूणच नामांतर आंदोलनात सुरुवातीपासून ते नामविस्तार होईपर्यंत दलित पँथरच्या या संघटनेने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली असे दिसते. नामांतर प्रश्नावरून मराठवाड्यात दंगली झाल्या तरी पँथरच्या नेत्यांनी नामांतराची मागणी सोडली नाही. मागणी मान्य करून घेण्यासाठी त्यांनी आपले आंदोलन शांततामय व सनदशीर मार्गाने चालवून सत्ताधारी पक्षाला नामांतर प्रश्नाची दखल घ्यायला भाग पाडले.

नामांतर आंदोलनातील वृत्तपत्रांची भूमिका :

नामांतर आंदोलन काळात प्रसारमाध्यमांची भूमिका काय होती याचा आढावा इथे घेण्यात आलेला आहे.

त्यावेळी मराठवाड्यात औरंगाबादचे मराठवाडा, नांदेडचे गोदातीर व प्रजावाणी ही वृत्तपत्रे बातम्या देण्याचे काम करत होती. या वृत्तपत्रांनी नामांतरविरोधकांची बाजू घेऊन बातम्या पसरविण्याची कामगिरी पार पाडलेली दिसते.

"नामांतराची मागणी करणारे दलित मराठवाड्यातील नाहीत, ही मागणी फक्त नवबौध्दांची आहे, मराठवाड्यातील दलितांचा या मागणीस विरोध आहे अशा अफवा पसरविण्याची कामगिरी या वृत्तपत्रांनी पार पाडली." [१११]

"दैनिक मराठवाडा, गोदातीर समाचार, प्रजावाणी यांनी नामांतराच्या विरोधातील आंदोलनास पाठिंबा दिला. या वृत्तपत्रांनी मोठमोठ्या गावात, शहरात भरपूर प्रसिध्दी दिली आणि खेड्यातील दलितांवर झालेल्या अत्याचाराच्या बातम्या दडपून टाकल्या. या वृत्तपत्रांनी भारिप व दलित पँथर यांचे कोणतेही निवेदन प्रकाशित करण्याचे नाकारले." [११२]

१९७७ - ७८ साली 'दैनिक मराठवाडा' हे सर्वाधिक खपाचे प्रमुख दैनिक होते. त्यामुळे त्यांची नामांतरविरोधी भूमिका त्यावेळी हानिकारक ठरली.

अशा प्रकारे नामांतर आंदोलन काळातील महत्त्वाचे प्रसिध्दीमाध्यम वृत्तपत्रे यांनी एकांगी भूमिका घेतल्याचे दिसून येते.

सारांश :

सामाजिक चळवळ किंवा आंदोलन ही समाजशास्त्राच्या अभ्यासविषयातील एक महत्त्वाची शाखा आहे. सामाजिक संस्था अथवा सामाजिक जीवनात काही नवीन सुव्यवस्था निर्माण करणे या उद्देशाने करण्यात आलेले प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.

'सामाजिक चळवळ' ही संकल्पना वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे उपयोगात आणली आहे. सामाजिक चळवळीच्या उगमासंबंधीच्या सिध्दांतामध्ये तणाव, पुनरुजीवीकरण आणि सापेक्ष वंचिचता या संकल्पनाच्या संदर्भात विश्लेषण केले जाते.

सामाजिक चळवळीचे वर्गीकरण करण्यासाठी एखादा विशीष्ट असा निकष उपलब्ध नाही त्यामुळे सामाजिक चळवळीवरील साहित्यामध्ये अभ्यासकांनी वेगवेगळ्या निकषाच्या आधारे वर्गीकरण केले असल्याचे आढळते.

सामाजिक चळवळीसाठी विचारसरणीची आवश्यकता असते. सामाजिक चळवळीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी पुढील तीन पध्दतींचा वापर केला जातो. १) संरचनात्मक कार्यात्मक पध्दती. २) मार्क्सवादी पध्दती ३) सांकल्पनिक पध्दती.

सामाजिक परिवर्तनात एक प्रभावी प्रक्रिया म्हणून सामाजिक चळवळीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

दलित चळवळीचा उगमच मुळात सापेक्ष वंचिततेतून झालेला आहे. इतर समुहाचा विचार करतांना आपण नागवले जात आहोत, आपली पिळवणूक होत आहे ही जाणीव दलितांना अस्वस्थ करीत होती.

सापेक्ष वंचितता, निषेधात्मक विचारप्रणाली, विरोधी संदर्भगट आणि दलित या संकल्पना दलित चळवळीचे विश्लेषण करतांना महत्वाच्या ठरतात. गेली अनेक शतके अस्पृश्यांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठेपासून वंचीत रहावे लागले आहे. या

वंचीततेतूनच दलित चळवळीचा उगम झाला. दलित चळवळीचे तीन भागात विश्लेषण केले आहे.

१८९० नंतर दलित समाजातील काही व्यक्तींनी आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडून उन्नती साधण्यासाठी संघटन करण्याचे प्रयत्न सुरू केले. शिक्षण, नोकरी आणि सन्मानाचे जीवन यासाठीचे हे प्रयत्न फारसे यशस्वी झाले नाहीत. तरी पुढील काळातील जागृतीची पायाभरणी या प्रयत्नामुळे झाली.

गोपाळबाबा वलंगकर, शिवबा जानबा कांबळे, किसन फागुजी बंदसोडे या व्यक्तींनी आपल्या समाजाच्या उन्नतीसाठीच्या प्रयत्नांचा आरंभ केला.

संपूर्ण भारतात दलित समाजाला दिशा दिली ती आंबेडकरांच्या लेखन आणि राजकीय नेतृत्वाने त्यासाठी दलित समाजाचे वेगळे संघटन करून समाजजागृती करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ही संघटना, मूकनायक हे वर्तमानपत्र आणि ब्रिटिश सरकारशी होणाऱ्या वाटाघाटी, दलित समाजाच्या स्वतंत्र प्रतिनिधीचा आग्रह यातून आंबेडकरांची चळवळ उभी राहिली. महाड येथील दलितांना चवदार तळ्यातून पाणी भरण्याचा हक्क मिळवून देण्यासाठीच्या आंदोलनाने चळवळीला गती प्राप्त झाली. त्यानंतर नाशिक येथील राममंदिरात 'अस्पृश्यांना' प्रवेश मिळावा यासाठी आंदोलन झाले. येथून पुढे ही चळवळ आणखी विकसित झाल्याचे आढळते.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेविरुध्द लढा देऊन दलित समाजाचे संघटन घडविले. राजकीय सत्तेतील दलितांच्या वाट्यासाठी आग्रह धरला. केवळ अस्पृश्यता व दलित समाज एवढ्यापुरते त्यांचे तत्त्वज्ञान मर्यादित नव्हते.

राजकीय पातळीवर प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. दलित, शेतमजूर आणि कष्टकरी यांचा राजकीय पक्ष उभारणे हा त्यांमागील हेतू होता. १९४२ नंतर स्वातंत्र्यासाठीच्या वाटाघाटीमध्ये धर्म, जातीसमूह यांना महत्त्व प्राप्त झाल्यामुळे दलित समाजाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आंबेडकरांनी 'शेड्युल्ड कास्ट फेडरनशन'ची स्थापना केली.

समता व बंधुत्व या तत्त्वाचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी गौतम बुध्दाचा विचार स्वीकारला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी औपचारिकपणे बुध्द धम्माचा अंगीकार केला व लाखो अनुयायांना धम्मदीक्षा घेण्यास प्रवृत्त केले.

समता, लोकशाही व लोककल्याणाचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या निर्मितीचा आराखडा तयार केला होता.

१९५७ च्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला मोठे यश प्राप्त झाले. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाने भूमिहीन शेतमजुरांची चळवळ उभी केली. जमीन वाटपाच्या प्रश्नावर भर देऊन दलित राजकारण दलित जातीच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न केला. तरीही भूमिहीनांच्या चळवळीच्या मुद्यावरून दलितेतर समाजाचा पाठिंबा

मिळविणे रिपब्लिकन पक्षाला शक्य झाले नाही.

धर्मत्याग, शिक्षण, राखीव जागा इ. सर्व घडूनही सामाजिक विषमतेचा अनुभव कमी झाला नाही. त्यामुळे सांस्कृतिक चौकट बदलणे गरजेचे आहे याची जाणीव झालेल्या तरुण दलितांनी साहित्य निर्मिती करून सांस्कृतिक हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. यातून महाराष्ट्रात दलित साहित्याची परंपरा उदयाला आली.

दलितांवरील वाढते अत्याचार व राजकिय नेत्यांचे बेजबाबदार वर्तन या अवस्थेमुळे आक्रमक विचारांच्या 'दलित पँथर्स' या संघटनेचा उदय झाला. पँथरने दलित कोण? हा प्रश्न विचारून 'दलित' शब्दाला व्यापक अर्थ दिला. सवर्ण समाजाला धक्का बसेल अशा भूमिका पँथरने घेतल्या. त्याचप्रमाणे दलित समाजाच्या वेगळ्या सांस्कृतिक विश्वाचा आग्रह धरला. संस्कृती, प्रतीके आणि विचारप्रणाली या तीनही बाबतीत दलित समाजाने स्वयंपूर्ण बनावे असा पँथरचा आग्रह होता; परंतु आर्थिक शोषण, ग्रामीण दलितांची होणारी कोंडी यावर आधारित कार्यक्रम नेटाने चालू राहिले नाहीत. वैचारिक भूमिकेवरून फूट पडल्यानंतर भिन्न भिन्न गट निर्माण झाले.

मराठवाड्यात औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून शैक्षणिक क्रांतीचे बीजारोपण केले. त्यामुळे शिक्षणाची दारे दलित जाती - जमातींना खुली झाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने त्यांच्या नावाचे विद्यापीठ असावे ही मागणी पुढे आली. या मागणीस सुरुवातीस सर्व विद्यार्थी संघटनांनी पाठिंबा दिला व मागणी मान्य करून घेण्यासाठी मोर्चे, धरणे, निदर्शने अशा सनदशीर मार्गांचा अवलंब करण्यात आला. या सर्व मागण्यांचा विचार करून विद्यापीठ कार्यकारिणीने नामांतराचा ठराव पास केला. पुढे नामांतराच्या मागणीच्या श्रेयावरून विद्यार्थी संघटनांत फूट पडली व नामांतर आंदोलन नामांतराच्या बाजूने व विरोधी अशा दोन्ही बाजूने उभे राहिले.

२७ जुलै १९७८ रोजी नामांतराचा ठराव विधानसभा व विधान परिषदेत बिनविरोध संमत झाला. त्याचा परिणाम मराठवाड्यात दंगलीला सुरुवात झाली. या दंगलीत नामांतरविरोधकांनी सरकारी मालमत्तेचे प्रचंड प्रमाणात नुकसान करून दलितांवर अत्याचार केले. २७ जुलै ते १० ऑगस्ट १९७८ या काळात दंगल सुरू होती. मा. मुख्यमंत्र्यांनी आवाहन केल्यानंतर नामांतर विरोधकांनी आपले विरोधी आंदोलन मागे घेतले.

अत्याचारग्रस्त दलितांचे सरकारतर्फे पुनर्वसन करण्यात आले. समाजकार्यकर्ते, विचारवंत, प्राध्यापक, वकील, सरकारी अधिकारी, मंत्री यांनी अत्याचारग्रस्त भागाची पाहणी करून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

दलितांवर अत्याचार होऊनदेखील नामांतराची मागणी सुरूच ठेवण्यात आली. त्यासाठी मोर्चे, निदर्शने, घेराव, बंद अशा मार्गांचा अवलंब करण्यात आला.

वेगवेगळ्या पक्षसंघटनांनी नामांतराबाबत वेगवेगळ्या भूमिका घेतल्या; परंतु दलित पँथर ही संघटना मागणीपासून ते नामाविस्तारापर्यंत बाजूने लढ्यात उभी होती असे दिसते.

१४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करण्यात आला.

संदर्भ ग्रंथ सूची

1) Paul Wilkinson, 'Social Movement' *The Macmillan Press Ltd. London, 1971, P. 26*
2) Rao M.S.A., 'Social Movement in India', Manohar Publication, New Delhi, 1984, P.3
3) Blumer Herbert, 'Collective Behaviour', In Lee A.M. Ed. Principles of Sociology Barnes & Noble, Newyork, 1951, P.167
4) Thedorson George A. & Thedorson A. G., 'A Modern Dictionary of Sociology,' Thomas Publication Company, Newyork, 1969, P. 390
5) Fairchaild, H.P. ,'Dictionary of Sociology,' Philosophical Library, Newyork , 1944, P.88
6) लोटे रा. ज., 'समाजशास्त्र मूलभूत संकल्पना' पिंपळापुरे अॅण्ड पब्लिशर्स, नागपूर, १९९६,पृ.२३९
7) Rao M.S.A., Ibid, P.5
8) Rao M.S.A., Ibid, P.5
9) Rao M.S.A., Ibid, P.6
10) Rao M.S.A., Ibid, P.4
11) Rao M.S.A., Ibid, P. 1, 2
12) मुरूगकर लता, 'दलित पँथर चळवळ', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. १३
13) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. १६,१७
14) लोटे रा.ज., उपरोक्त, पृ. २४५
15) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. १३
16) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. १४
17) Oommen T. K., 'Sociological Issues In the Analysis of Social Movements In India' Sociological Bulletin, Vol. 26, No.1, March 1977, P.14
18) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. २१
19) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. २१
20) ढसाळ नामदेव, 'दलित पँथर सिध्दांत आणि व्यवहार', लिंबाळे शरणकुमार संपादित 'दलित पँथर', सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. ८५
21) Jogdand P. G., 'Dalit Movement in Maharashtra', Kanak Publications, New Delhi, 1991, P.16
22) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. ५३
23) कुलकर्णी मा. गु., 'भारतीय समाजव्यवस्था', परिमल प्रकाशन ,औरंगाबाद, १९८७, पृ.२९८
24) Ghurye G. S., 'Caste, Class & Occupation', Popular Prakashan, Bombay, 1961, P.137

25) Ketkar S. V., 'History of caste in India', Itcha Newyork ,1909,P.27
26) अत्रे त्रि. ना., 'गावगाडा', ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती १९५९, पृ.१५
27) आंबेडकर बाबासाहेब, 'हिंदुची जातीप्रथा व ती तोडण्याचा मार्ग', मराठी भाषांतर, राजेश प्रकाशन, प्रकाशन तारीख नाही. पृ. ४
28) कठारे अनिल, 'शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास', कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२, पृ. ५९
29) जोशी महादेवशास्त्री संपादित, 'भारतीय संस्कृती कोश', खंड-३, भारतीय संस्कृती मंडळ, पुणे, १८८७, पृ. ५८४
30) आंबेडकर बी. आर., 'शूद्र पुर्वी कोण होते.?', मराठी अनुवाद खैरमोडे चां. भ., सुगत प्रकाशन, नागपूर, १९७४, पृ. ५
31) कुलकर्णी मा. गु., उपरोक्त, पृ. ३३५
32) Ghurye G. S., Ibid, P.307
33) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा इतिहास', प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, १९७२, पृ.२५८,२५९
34) शिंदे वि. रा., 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', महाराष्ट्र शासन समाजकल्याण सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग, मुंबई, १९३३, पृ. १२
35) आंबेडकर बी. आर., 'अस्पृश्य मूळचे कोण व ते अस्पृश्य कसे बनले'?, मराठी भाषांतर गाजरे मा. फ., अशोक प्रकाशन, नागपूर, १९७५, पृ.१२
36) कुलकर्णी मा. गु., उपरोक्त, पृ. ३६५
37) शिंदे वि. रा., 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', उपरोक्त, पृ. १९८
38) आंबेडकर बी. आर., 'अस्पृश्य मूळचे कोण व ते अस्पृश्य कसे बनले', उपरोक्त,पृ. १९८
39) शर्मा आर. एस., 'शूद्रोंका प्राचीन इतिहास', राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, १९९२, पृ.३८
40) कुलकर्णी मा. गु., उपरोक्त, पृ. ३६७
41) गारे गोविंद आणि लिमये हरिभाऊ, 'महाराष्ट्रातील दलित: शोध आणि बोध', सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, १९७३, पृ. १७३ ते १७७
42) शेख शब्बीर, 'आंबेडकरपुर्वकालीन महाराष्ट्रातील दलित चळवळ', समाजशास्त्र संशोधन पत्रिका-वर्ष ३, अंक-३, डिसेंबर १९८९, प्रकाशित १९९४, कोल्हापूर, पृ. ३३
43) कसबे रावसाहेब, 'दलित चळवळीची वाटचाल', केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मुंबई, १९८३ , पृ. २०,२२
44) फडके भालचंद्र, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. ४५
45) इंगळे रामचंद्र,'महारांचा सांस्कृतिक इतिहास', अभिजीत प्रकाशन, नागपूर, १९८७, पृ. १०
46) कोसारे एच. एल., 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास', प्रदीप प्रकाशन, नागपूर, १९८४ , पृ. २६
47) जोगदंड पी. जी., उपरोक्त, पृ. ४७-४९
48) शेख शब्बीर, उपरोक्त, पृ. ३३
49) फडके भालचंद्र, उपरोक्त, पृ. १०६
50) मेणसे कृष्णा, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर: सामाजिक व राजकीय चळवळी', न्यू एज प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९९८, पृ. १९

51) गायकवाड आर. डी., 'आंबेडकरी चळवळीच्या आठवणी', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. ३०१
52) फडके य. दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड-४ श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९९२, पृ. ८४
53) फडके भालचंद्र, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', उपरोक्त, पृ. १९६
54) फडके भालचंद्र, उपरोक्त, पृ. ९२
55) खैरमोडे चांगदेव, 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', चरित्र, खंड-७ सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.८६
56) फडके भालचंद्र, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', उपरोक्त, पृ. २११
57) खैरमोडे चांगदेव, 'डॉ. भिमराव रामजी आंबेडकर', चरित्र, खंड-९ सुगावा प्रकाशन, १९९८, पुणे, पृ.८६,८७
58) पवार ऊर्मिला आणि मून मीनाक्षी, 'आम्हीही इतिहास घडविला' (समतेसाठी संघर्ष), सुगावा प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ८२
59) खैरमोडे चांगदेव, उपरोक्त, खंड-९, पृ.३११
60) फडके भालचंद्र, 'फुले: आंबेडकर शोध आणि बोध', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८५ पृ. १४७
61) खैरमोडे चां. भ., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', चरित्र, खंड-१० सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.१४९
62) खैरमोडे चां. भ., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', चरित्र, खंड-१०, पृ.२५८
63) फडके य. दि., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', उपरोक्त, पृ.२६०
64) साळवे दिनकर, '१९५६ नंतरची दलित चळवळ', दिग्नाग प्रकाशन , पुनर्मुद्रण जानेवारी २००१, पृ. ६,७,११
65) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ.७१
66) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ.१४५
67) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ.४७
68) ढसाळ नामदेव, 'आंबेडकरी चळवळ आणि सोशॅलिस्ट कम्युनिस्ट आंबेडकर', प्रबोधिनी प्रकाशन, मुंबई, १९८१ पृ.७
69) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ.४९
70) ढसाळ नामदेव, 'दलित पँथरची भूमिका', पँथर प्रकाशन, १९७३, पृ.४
71) लिंबाळे शरणकुमार संपादित, दलित पँथर, उपरोक्त, पृ.९६
72) कांबळे इ. बी., 'सामाजिक एकात्मतेची वाटचाल' राहुल प्रकाशन, औरंगाबाद, १९८० पृ. ७२
73) गव्हाणे सुधीर, 'नामांतर लढा : एक शोधयात्रा', परिवर्तन प्रकाशन, मुंबई, १९९६, पृ.२०,२२

74) कांबळे इ. बी., 'सामाजिक एकात्मतेची वाटचाल', राहुल प्रकाशन, औरंगाबाद, १९८०, पृ.२७.
75) गव्हाणे सुधीर, उपरोक्त, पृ. २५.२६
76) दळवी म. य., 'नामांतर-धर्मांतर आणि राष्ट्रांतर' आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८३, पृ. ३३,३४
77) कांबळे इ. बी., उपरोक्त, पृ. ५३,५४,५५
78) भालेराव अनंत संपादित 'दैनिक मराठवाडा', २८ जुलै १९७८, औरंगाबाद
79) व्हाईस, 'मराठवाड्यातील जातीय दंगली', शाकीर मोईन व शिंदे ज. रा. संपादित, 'वर्ग आणि जाती', जागृती ट्रस्ट, औरंगाबाद, १९७९, पृ. ३१
80) Shroff G. M. and Others, 'Why Marathwada University Alone', Published, Marathwada Nagrik samiti, Aurangabad., P.26 प्रकाशन तारीख नाही.
81) गायकवाड नरेंद्र, 'मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैदराबादचा मुक्तिसंग्राम', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०, पृ. ९८
82) कांबळे इ. बी., उपरोक्त, पृ. ७३
83) कांबळे इ. बी., उपरोक्त, पृ. ८३
84) क्षिरसागर नामदेव, 'चंपावती पत्र', दिवाळी अंक, चंपावती प्रकाशन, बीड, १९७८, पृ.१७
85) गव्हाणे सुधीर, 'नामांतर लढा: एक शोधयात्रा', उपरोक्त, पृ. १५७
86) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. २१०
87) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. २११
88) 'नामांतर संघर्ष', प्रा. जोगेंद्र कवाडे, गौरव अंक, नागरी सत्कार समिती, बडनेरा, अमरावती, जून १९८८, पृ. ३६
89) लिंबाळे शरणकुमार संपादित, 'दलित पँथर', उपरोक्त, पृ. १४७-१४८
90) नामांतर संघर्ष, उपरोक्त, पृ. ३६-३७
91) दळवी म. य., 'चौफेर', साप्ताहिक विशेषांक ,३० ऑक्टोबर, १९७८, पृ. ३-५
92) चिटणीस म. भी., यांची मुलाखत, इ. बी. कांबळे, उपरोक्त, पृ. ४०
93) 'दैनिक अजिंठा', संपादक पोतनीस अ. द., दैनिक अजिंठा प्रकाशन, औरंगाबाद, दि. २९ जानेवारी, १९७९ ii) कांबळे इ. बी., उपरोक्त, पृ. ४०
94) कवाडे जोगेंद्र, 'जयभीम', जयभीम प्रकाशन, नागपूर, २३ सप्टेंबर, १९७८
95) 'दैनिक लोकसत्ता', इंडियन एक्स्प्रेस प्रकाशन, मुबंई, गुरुवार, दि. १४ सप्टेंबर, १९७८
96) किर्लोस्कर मु. श., 'साप्ताहिक मनोहर', किर्लोस्कर प्रकाशन, पुणे, २ ते ८ डिसेंबर, १९७९, पृ.२
97) किर्लोस्कर मु. श., 'साप्ताहिक मनोहर', उपरोक्त, पृ. १०

98) 'दैनिक अजिंठा', गुरुवार, दि. १० जानेवारी, १९७९
99) मूल-जाधव सुशीला 'नामांतर आणि औरंगाबाद शहरातील स्त्रियांचा सहभाग', नामांतर शहीद गौरव ग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृतज्ञता प्रतिष्ठान, औरंगाबाद, २०००, पृ. १७५
100) 'साधना', मुख्य संपादक साने गुरुजी, १५ ऑगस्ट १९८०, पृ. १४
101) क्षीरसागर नामदेव, 'चंपावती पत्र', उपरोक्त, पृ. १८-१९
102) 'दैनिक मराठवाडा', २३ सप्टेंबर १९७७ मधील अग्रलेख, 'मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा वाद' ii) भालेराव अनंत, 'आलो याची कारणाशी', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. १११,११२
103) भालेराव अनंत यांची मुलाखत, 'विद्यापीठ नामांतर आणि आम्ही', दि.१६ ऑक्टोबर १९७८, महाराष्ट्र टाइम्स, पृ. ५
104) 'दैनिक मराठवाडा', २४ सप्टेंबर, १९७८ ii) भालेराव अनंत, 'आलो याची कारणाशी', उपरोक्त, पृ. ११५
105) भालेराव अनंत यांची मुलाखत, उपरोक्त, पृ. ६
106) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. २१४
107) व्हाईस, 'मराठवाड्यातील जातीय दंगली', उपरोक्त, पृ. ३४
108) उपरोक्त, पृ. ३५
109) लिंबाळे शरणकुमार, उपरोक्त, पृ. १४५
110) मुरूगकर लता, उपरोक्त, पृ. २१८
111) व्हाईस, उपरोक्त, पृ. ३६
112) मुरूगकर लता,उपरोक्त, पृ. २१४.

❑❑❑❑